गुरुवार दि.९ मे २०२४

# दलित व उपेक्षितांचे उध्दारक राजर्षी छ.शाहू महाराज: प्रा. मोरे

**मालेगाव ।**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज दिनांक ६ मे २०२४ रोजी १०२ वी पुण्यतिथीनिमित्त महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात साजरी करण्यात आली ,या प्रसंगी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनातून व उपप्राचार्य डॉ अनिल सावळे व इतर मान्यवरांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयात पुण्यतिथीनिमित्त कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे प्रमुख वक्ते होते त्यांनी याप्रसंगी शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला त्यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी राज्यातील निरक्षर, गरीब ,अस्पृश्य व दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतीगृहे काढली शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे त्यासाठी मुलींना त्याकाळी ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली ६ जुलै १९०२ ला कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक म्हणतात व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्या काळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण ,उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य क्षेत्रामध्ये जे कार्य केले आहे ते आजवर कोणीही केले नाही असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले अध्यक्षीय मनोगत उपप्राचार्य डॉ मनीष सोनवणे यांनी याप्रसंगी अस्पृश्य नष्ट करण्यासाठी महाराजांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळा शाळा भरविण्याची दृष्ट पध्दत रद्द केली अस्पृश्यांशी समतेने वागावे त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला व समाजासमोर एक आदर्श ठेवला याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल सावळे कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे लेखापाल डॉ राजेश निकम आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते सूत्रसंचालन डॉ बी एम सोनवणे यांनी केले तर आभार डॉ नरेंद्र ढोके यांनी मानले.

नाशिक, मंगळवार, ७ मे २०२४
www.eloknama.com
नाशिक

## » महत्त्वाचे



### मसगा महाविद्यालयात राजर्षी शाहूंना अभिवादन

**मालेगाव :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १०२व्या पुण्यतिथीनिमित्त महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात लोकराजाला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे व मान्यवरांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयात पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे प्रमुख वक्ते होते. त्यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कटारे, लेखापाल डॉ. राजेश निकम, पत्रकार गजानन पाटील आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नरेंद्र डोखे यांनी आभार मानले.

# मसगा कॉलेजातील खेळाडूला रौप्यपदक



मालेगांव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत टी सी महाविद्यालय बारामती येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल मुली स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाला रौप्य पदक मिळाले सदर संघामध्ये मालेगाव येथील मसगा महाविद्यालयातील खेळाडू कु. मोहिनी शेवाळे हिने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतांना उत्कृष्ट कामगिरी करत संघाला यश प्राप्त करून दिले.

सदर खेळाडूला महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. संतोष जाधव व संदीप कोडुलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर म स गा महाविद्यालयाची खेळाडू मोहिनी शेवाळे हिला महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ सी. जी. दिघावकर उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील सर्व प्रशासकीय कर्मचारी व प्राध्यापकांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

शनिवार दि.४ मे २०२४

# मसगा महाविद्यालयात कामगार दिन साजरा

**मालेगांव ।**

गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ अनिल सावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी डॉ सावळे यांनी महाराष्ट्र निर्मितीच्या राजकीय इतिहासाला उजाळा दिला. तसेच कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी वेगवेगळ्या कामगार नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांचे स्मरण यावेळी त्यांनी करून दिले. तसेच महाराष्ट्र निर्मितीसाठी १०५ हुतात्म्यांना स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, एमसीव्हीसी विभागाचे प्रा. अजिक्य ठाकरे, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे, डॉ.राजेश निकम आमच्या सह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग व क्रीडा विभाग तर्फे करण्यात आले.

## क महाराष्ट्र दिन साजरा



NEWS HIGHLIGHTS

## 1st May, 2024

# मसगा कॉलेजात महाराष्ट्र दिन साजरा

मालेगांव । येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन महाविद्यालया चे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ अनिल सावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी डॉ सावळे यांनी महाराष्ट्र निर्मितीच्या राजकीय इतिहासाला उजाळा दिला. तसेच कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी वेगवेगळ्या कामगार नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांचे स्मरण यावेळी त्यांनी करून दिले. तसेच महाराष्ट्र निर्मितीसाठी १०५ हुतात्म्यांना स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, एमसीवीसी विभागाचे प्रा. अजिक्य ठाकरे, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे, डॉ.राजेश निकम आमच्या सह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-



भगिनी व शिक्षके तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्या लयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग व क्रीडा विभाग तर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सुर्यभान सांगळे यांनी तर आभार प्रा संतोष जाधव यांनी मानले.

## NEWS HIGHLIGHTS

# Maharaja Sayajirao Gaikwad

## Arts, Science & Commerce Jr. College, Malegaon



लोकमत

# मालेगावच्या मसगा महाविद्यालयाचे खेळाडू राज्यस्तरावर विजयी

### टेनिस बॉल क्रिकेटमध्ये मिळवले यश : संस्थेकडून सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालेगाव** : अमरावती येथे झालेल्या क्रीडा व युवक संचालनालय आयोजित टेनिस बॉल क्रिकेट क्रीडा स्पर्धेत म. स. गा. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने अत्यंत चुरशीच्या सामन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळविला.



यात संघनायक सार्थक पवार व खेळाडू आदित्य राजपूत, मेहुल सोनवणे, पृथ्वीराज चव्हाण, दर्शन पाटील व इतर खेळाडूंनी संघास साथ देत उत्कृष्ट कामगिरी बजावली. मुलांमध्ये प्रथम क्रमांक घेऊन होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंची निवड झालेली आहे. खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. प्रशांत हिरे, डॉ. अपूर्व हिरे, डॉ. अद्वय हिरे-पाटील, संपदा हिरे, डॉ. व्ही. एस. मोरे, डॉ. हरीश आडके, डॉ. दिनेश कराड, प्रा. अक्षय घोरपडे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवी मोरे यांनी कौतुक केले. खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक संदीप कोठुरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

Hello Nashik Gramin
Page No. 5 Apr 21, 2024
Powered by: erelego.com

# Maharaja Sayajirao Gaikwad



## Arts, Science & Commerce Jr. College, Malegaon

## म.स.गा.कनिष्ठ महाविद्यालयाचे खेळाडू टेनिस बॉल क्रिकेट मुले क्रीडा प्रकारात राज्यस्तरावर विजयी



**मालेगाव ।**

दि. १५/४/२०२४ ते १७/४/२०२४ रोजी अमरावती येथे झालेल्या क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक व अमरावती , जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित टेनिस बॉल क्रिकेट क्रीडा स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल, अमरावती येथे संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेत विविध विभागीय महाविद्यालयांच्या संघाने सहभाग नोंदवला. त्यामध्ये म. स. गा. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने अत्यंत चुरशीच्या सामन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत संघनायक सार्थक पवार व खेळाडू आदित्य राजपूत मेहुल सोनवणे पृथ्वीराज चव्हाण दर्शन पाटील व इतर खेळाडूंनी संघनायका साथ देत उत्कृष्ट कामगिरी बजावली.

मुलांमध्ये प्रथम क्रमांक घेऊन होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धासाठी खेळाडूंची निवड झालेली आहे.या सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक डॉ. अपूर्वभाऊ हिरे, समन्वयक मा. डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील, विश्वस्त संपदादिदी हिरे, संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे , उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड, प्रा. अक्षय घोरपडे तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी , पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक संदिप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# Maharaja Sayajirao Gaikwad
## Arts, Science & Commerce
## Jr. College, Malegaon





## 'मसगा'चे खेळाडू टेनिस बॉलमध्ये अव्वल

लोकनामा प्रतिनिधी

**मालेगाव** : अमरावती येथे झालेल्या क्रीडा व युवक संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक व अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा विभागीय क्रीडासंकुल, अमरावती येथे झाल्या. या स्पर्धेत विविध विभागीय महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग नोंदवला. त्यात मसगा कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने चुरशीच्या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली.

संघनायक सार्थक पवार, खेळाडू आदित्य राजपूत, मेहुल सोनवणे, पृथ्वीराज चव्हाण, दर्शन पाटील व इतरांनी साथ देत उत्कृष्ट कामगिरी केली. मुलांच्या गटात प्रथम क्रमांक मिळवून राष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंची निवड झाली.

या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक मा. आ. डॉ. अपूर्वभाऊ हिरे, डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील, विश्वस्त संपदादीदी हिरे, महासचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरिष आडके, क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड, प्रा. अक्षय पोरपडे, तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिवाकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक संदीप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



मालेगाव शहर : क्रिकेटमध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याबद्दल येथील मसगा महाविद्यालयातील खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिवाकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे व शिक्षक.

## 'मसगा'च्या क्रिकेटपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता. १९ : क्रीडा व युवक संचालनालयातर्फे अमरावती येथे झालेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत मसगा" कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने अत्यंत चुरशीच्या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला. संघनायक सार्थक पवार व खेळाडू आदित्य राजपूत, मेहुल सोनवणे, पृथ्वीराज चव्हाण, दर्शन पाटील व इतर खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. राष्ट्रीय स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झालेली आहे.

या सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, समन्वयक डॉ. अद्वय हिरे, संपदा हिरे, संस्थेचे महासचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड, प्रा. अक्षय पोरपडे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिवाकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक संदीप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

हळहळ व्यक्त होत आहे.



# 'मसगा'चे खेळाडू टेनिस बॉलमध्ये अव्वल

**लोकनामा प्रतिनिधी**

**मालेगाव** : अमरावती येथे झालेल्या क्रीडा व युवक संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक व अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा विभागीय क्रीडासंकुल, अमरावती येथे झाल्या. या स्पर्धेत विविध विभागीय महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग नोंदवला. त्यात मसगा कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने चुरशीच्या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली.

संघनायक सार्थक पवार, खेळाडू आदित्य राजपूत, मेहुल सोनवणे, पृथ्वीराज चव्हाण, दर्शन पाटील व इतरांनी साथ देत उत्कृष्ट कामगिरी केली. मुलांच्या गटात प्रथम क्रमांक मिळवून राष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंची निवड झाली.

या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक मा. आ. डॉ. अपूर्वभाऊ हिरे, डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील, विश्वस्त संपदादीदी हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरिष आडके, क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड, प्रा. अक्षय घोरपडे, तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक संदीप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



**मालेगाव शहर** : क्रिकेटमध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याबद्दल येथील मसगा महाविद्यालयातील खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे व शिक्षक.

# 'मसगा'च्या क्रिकेटपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

■ **सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव शहर, ता.१९ : क्रीडा व युवक संचालनालयातर्फे अमरावती येथे झालेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत मसगा'' कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने अत्यंत चुरशीच्या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला. संघनायक सार्थक पवार व खेळाडू आदित्य राजपूत, मेहुल सोनवणे, पृथ्वीराज चव्हाण, दर्शन पाटील व इतर खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. राष्ट्रीय स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झालेली आहे.

या सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, समन्वयक डॉ. अद्वय हिरे, संपदा हिरे, संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड, प्रा. अक्षय घोरपडे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक संदीप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# मसगा महाविद्यालयात दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन

लोकनामा प्रतिनिधी



**मालेगाव :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती झाली. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील म्हणाले, की डॉ. आंबेडकरांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संविधान निर्मितीचे महान कार्य केले. त्यांना समाजातील सामाजिक विषमता नष्ट करायची होती. त्यासाठी त्यांनी सामाजिक न्याय व कायदामंत्री असताना देशातील दुर्लक्षित, वंचित समाजातील महिलांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. यामुळे आज भारतातील महिला या पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांत आपल्या ज्ञानाचा ठसा उमटवत असल्याचे दिसते.

उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी, डॉ. आंबेडकरांचे कार्य केवळ भारतातच नाही, तर विदेशातील बहुतांश देशांत अनुसरले जाते. डॉ. आंबेडकरांनी देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, समता व बंधुता या दृष्टिकोनातून कार्य केले आहे. ग्रंथपाल प्रा. डॉ. नीलेश नागरे यांच्या संकल्पनेतून व प्राचार्य दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने मध्यवर्ती ग्रंथालयात डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्यावर आधारित ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित केले. त्याचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील शिक्षक, कर्मचारी, तसेच विद्यार्थी उपस्थित होते. हे प्रदर्शन पुढील एक महिन्यापर्यंत विद्यार्थ्यांसाठी खुले ठेवण्यात येईल. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथपालांनी केले.

कार्यक्रमास कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नरेंद्र डोखे यांनी आभार मानले.

# मसगा महाविद्यालयात डॉ. आंबेडकरांच्या दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन



**मालेगाव ।**

येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यानंतर महाविद्यालयाचे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यावर माहिती देताना असे सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संविधान निर्मितीचे महान कार्य केले आहे. त्यांना समाजातील सामाजिक विषमता नष्ट करायची होती. त्यासाठी त्यांनी सामाजिक न्याय व कायदामंत्री असताना देशातील दुर्लक्ष,वंचित समाजातील महिलांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. यामुळेच आज भारतातील महिला या पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा ठसा उमटवित असल्याचे दिसून येते. असे प्रतिपादन डॉ. प्रविण पाटील यांनी केले. यानंतर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनिष सोनवणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यासंदर्भात सखोल माहिती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ भारतातच नाही तर विदेशातील बहुतांश देशांमध्ये देखील अनुकरले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी दूरदृष्टीने शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, समता व बंधुता या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. असे मनोग्मन डॉ. मनिष सोनवणे यांनी व्यक्त केले. या नंतर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. डॉ निलेश नागरे यांच्या संकल्पनेतून व प्राचार्य दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने मध्यवर्ती ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यावर आधारित दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाला महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. हे ग्रंथ प्रदर्शन पुढील एक महिन्यापर्यंत विद्यार्थ्यांसाठी खुले ठेवण्यात आले आहे. याचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. निलेश नागरे यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमास कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा मिलिंद कुलकर्णी पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे , एमसीव्हीसी चे उपप्राचार्य प्रा अजिक्य ठाकरे , तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नरेंद्र डोखे यांनी मानले. राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

दैनिक
लोकनामा
सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक

# महात्मा फुलेंनी समाजातील अज्ञानाचा अंधार दूर केला

## प्रा. रवींद्र मोरे यांचे प्रतिपादन

लोकनामा प्रतिनिधी



**मालेगाव कॅम्प :** येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिक्षावकर होते. कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे हे प्रमुख वक्ते होते. त्यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुलेंनी समाजातील अज्ञानाचा अंधार दूर केला, समाजाला मानसिक धार्मिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता हवी असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. गुलामगिरी नष्ट करण्याचे माध्यम आहे. समाजात बदल व परिवर्तन घडवायचे असेल तर स्त्रियांसह सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांवर प्रचंड प्रेम महात्मा फुले यांचे होते. ते स्वतः शेतकरी होते. महात्मा फुले यांचे महान कार्य आहे ते आजच्या पीढीने अंगीकारले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा.रवींद्र मोरे यांनी याप्रसंगी केले. त्याचप्रमाणे उपप्राचार्य प्रा .डॉ. अनिल सावळे यांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या जीवन कार्य सांगताना महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाची जी चळवळ उभी केली त्यामुळेच स्त्रियांना समाजामध्ये मानाचे स्थान आहे असे सांगितले. मात्र, फुले,शाहु व आंबेडकर ह्या सर्व महापुरुषांचे कार्य आपल्यासाठी दिपस्तंभासमान आहे. मात्र, हे महापुरुष आपण वाटून घेतले, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. बबन सोनवणे यांनी तर आभार प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी मानले. कार्यक्रमाला शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ.प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, प्रा. अजिंक्य ठाकरे, कुलसचिव रघुनाथ शेलार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर



**मालेगाव ।**

म.स.गा.कनिष्ठ महाविद्यालयात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. सदर रॅली ही मालेगाव कॅम्प, सोमवार बाजार,रावळगाव नाका या परिसरात काढण्यात आली.मतदानासाठी जनजागृती व्हावी हा शासनाचा उद्देश आहे. सदर रॅली विद्यार्थ्यांच्या हातात फलक घेऊन रॅली काढण्यात आली. रॅली मध्ये विविध घोषणा देण्यात आल्या.

''मतदार राजा जागा हो
लोकशाहीचा धागा हो'',
''निर्भय होऊन मतदान करा
देशाचा सन्मान करा'',
''नवे वारे नवे दिशा मतदानच
आहे उद्याची आशा''
''चला मतदान करूया देशाची
प्रगती घडवूया''

अशा विविध घोषणांच्या माध्यमातून रॅली काढण्यात आली. घोषणांनी परिसर दणाणून सोडला व सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना,नातेवाईकांना पत्र टाकून दिनांक २० मे २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजवावा. असा असे आवाहन पत्रात करण्यात आले.

सदर कार्यक्रमा समारंभाप्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी आपल्या मनोगतातून ''मतदान करणे हे पुण्याचे काम आहे ''सर्वांची नैतिक जबाबदारी आहे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे, त्या दिवशी सुट्टी म्हणजे आराम करण्यासाठी नाही तर जसे आपण दिवाळी साजरी करतो आदल्या दिवशी सर्व कामकाज आटोपत असतो तसे कामकाज मतदानाच्या दिवशी करावे. व आपले आई-वडील व नातेवाईकांना सांगून मतदान आपल्या हक्काचे आहे असे आवाहन केले.त्याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी यांनीही तरुण मतदारांनी आपल्याला दिलेल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करावा असे सांगितले.त्यानंतर पर्यवेक्षक प्रा.रवींद्र मोरे यांनी मतदारांनी मतदान ह्या लोकशाहीच्या महाउत्सवात सहभागी व्हावे असे सांगितले तसेच घरातील प्रौढ व्यक्तींना मतदान करण्याचा आग्रह धरावा. असे सांगितले याप्रसंगी प्रा.पंकज पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.मिलिंद पवार प्रा.तेजराज सोनवणे , प्रा.शशिकांत भदाणे प्रा.हेमराज भामरे , प्रा. एस.आर. पानपाटील प्रा.चंद्रशेखर कन्नोर प्रा. हितेश पवार , प्रा.अशोक खांडेकर प्रा. संदीप सावंत , प्रा. विजय पाटील आभार प्रा किरण खैरनार यांनी मानले.आदी शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# मसगा कॉलेज रसायन शास्त्र विभागाची औद्योगिक भेट संपन्न



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मालेगाव येथील रसायनशास्त्र विभागाने नाशिक, मोहाडी येथील सह्याद्री फार्म लिमिटेड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल सावळे, डॉ मनिष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने औद्योगिक भेट दिली. सदर औद्योगिक भेटीमध्ये रसायनशास्त्र विभागातील एमएस्सी भाग -१ व २ च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या बदलत्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना स्कील बेस शिक्षण कसे उपयोगी पडेल तसेच ते कसे आत्मसात करता येईल या उद्देशाने विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त झाले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना सहयाद्री फार्म लिमिटेड येथे आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कशाप्रकारे, माती परिक्षण केले जाते, फळांचे एक्सपोर्ट केले जाते, त्याचप्रमाणे द्राक्ष, आंबे, डाळिंब, मका यांची आधुनिक पद्धतीने होणारी लागवड आणि उत्पादन व त्यापासून तयार होणारी विविध उत्पादने, या उत्पादनांना स्टोअर करून ठेवण्याची पद्धत त्याचप्रमाणे या उत्पादनामध्ये टाकले जाणारे प्रिझर्व्हेटिव्हज याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी प्रा.डॉ. नरेंद्र डोखे, प्रा.भाग्यश्री वाघमारे, प्रा कुलदिप पडयार, प्रा अविनाश नेरकर, प्रा.डॉ. नंदकिशोर शिरसाठ हे विद्यार्थ्यांन समवेत होते.

# 'स्पुक्टो' अध्यक्षपदी डॉ. निकम



डॉ. चंद्रशेखर निकम



डॉ. राजेंद्र पवार



डॉ. अर्जुन नेरकर



डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे

■ **सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव शहर, ता. १ : येथील मसगा महाविद्यालयात स्थानिक स्पुक्टो कार्यकारणीची बिनविरोध करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी डॉ चंद्रशेखर निकम तर सचिवपदी डॉ. राजेंद्र पवार यांची, विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. अर्जुन नेरकर, उपाध्यक्ष म्हणून डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांची बिनविरोध निवड झाली.

कार्यकारिणीमध्ये जिल्हा प्रतिनिधी डॉ. किशोर निकम, खजिनदार डॉ. विजय मिस्तरी, उपाध्यक्ष डॉ. कैलास अहिरे, हिशोब तपासणीस डॉ. बबन सोनवणे यांचा समावेश आहे. सदर निवडणूक अधिकारी म्हणून उपप्राचार्य व स्पूक्टो कार्यकारणीचे मावळते सचिव डॉ. अनिल सावळे यांनी कामकाज पाहिले. डॉ. अर्जुन नेरकर यांनी आपल्या मनोगतातून संघटनेचे कामकाज व येणाऱ्या काळात संघटनेची जबाबदारी याविषयी माहिती विशद केली.

आपण सर्व सभासदांनी जो आमच्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला तडा जाणार नाही अशी निश्चितच कामगिरी करण्याचा प्रयत्न करू. संघटनेपुढे फार मोठी आव्हाने आहेत या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपल्या मदतीची खूप गरज असल्याचे सांगितले. डॉ.निकम म्हणाले की, नवीन कार्यकारिणी जोमाने काम करून आपला सर्वांचा विश्वास संपादन करेल अशी आशा व्यक्त केली. डॉ.कैलास अहिरे यांनी सर्व सभासदांचे आभार मानले.

# म.स.गा. महाविद्यालयात स्थानिक स्पुक्टो कार्यकारणीची बिनविरोध निवड

**मालेगाव ।**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे स्थानिक स्पुक्टो कार्यकारणीची बिनविरोध निवड झाली. सदर निवडणूक अधिकारी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य व स्थानिक स्पूक्टो कार्यकारणीचे माजी सेक्रेटरी डॉ. अनिल सावळे यांनी विशेष कामगिरी केली.

डॉ.अनिल सावळे यांनी संघटनेत केलेले कामकाज व संघटनेची वाटचाल याविषयी सविस्तर माहिती दिली.

सदर कार्यकारिणी खालील प्रमाणे

१. डॉ चंद्रशेखर माधवराव निकम-अध्यक्ष

२. डॉ.आर.के.पवार-सेक्रेटरी

३. डॉ. किशोर निकम- जिल्हा प्रतिनिधी

४. डॉ. अर्जुन नेरकर - विद्यापीठ प्रतिनिधी

५. डॉ. विजय मिस्तरी - खजिनदार

६. डॉ. कैलास अहिरे- उपाध्यक्ष

७. डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे उपाध्यक्ष-

८. डॉ. बबन सोनवणे- अंतर्गत हिशोब तपासणीस

वरील कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. या प्रसंगी डॉ.अर्जुन नेरकर यांनी आपल्या मनोगतातून संघटनेचे कामकाज व येणाऱ्या काळात संघटनेची जबाबदारी याविषयी माहिती विशद केली. तसेच आपण सर्व सभासदांनी जो आमच्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला तडा जाणार नाही अशी निश्चितच कामगिरी करण्याचा प्रयत्न करू. संघटने पुढे फार म ोठी आव्हाने आहेत या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपल्या मदतीची खूप गरज आहे.नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.चंद्रशेखर निकम यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून नवीन कार्यकारणी जोमाने काम करेल आणि आपला सर्वांचा विश्वास संपादन करेल अशी आशा व्यक्त केली शेवटी डॉ.कैलास अहिरे यांनी सर्व सभासदांचे आभार मानून निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

# मसगा वनस्पती शास्त्र विभागाची शैक्षणिक भेट संपन्न



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माले-गाव कॅम्प येथील वन स्पती शास्त्र विभागाने गुरुवार दिनांक २८/०३/२०२४ रोजी व्यंकटेश्वरा ग्रुप ऑफ पॉवर अँड एग्रीकल्चर लिमिटेड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने शैक्षणिक भेटीचे आयोजन केले. सदर शैक्षणिक भेटीमध्ये वनस्पती शास्त्र विभागातील तृतीय वर्ष विज्ञान पदवी व प्रथम व द्वितीय वर्ष विज्ञान पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. नवीन शैक्षणिक धोर ण २०२० च्या बदलत्या अभ्यास क्रमानुसार विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण कसे उपयोगी पडेल तसेच ते कसे आत्मसात करता येईल या उद्देशाने विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त झाले.

याप्रसंगी व्यंकटेश्वरा ग्रुप ऑफ पॉवर अँड एग्रीकल्चर लिमिटेड चे चेअरमन श्री.शिवाजी डोळे व व्यवस्थापक राकेश सूर्यवंशी यांनी सेंद्रिय शेती आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कशा प्रकारे अमलात आणता येईल तसेच गिर गायीचे संगोपन व व्यवस्थापन, गांडूळ खत निर्मिती व्यवसाय व त्याचे फायदे, जिरेनियम ची लागवड आणि उत्पादन व त्यापासून तयार होणारी उत्पादने याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. वनस्पतीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. डी.जी. जाधव त्याचबरोबर प्रा. डॉ. जे .टी. जाधव, डॉ. पी.एस.पाटील, डॉ. अतुल वाघ, प्रा. प्रविण निकम, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी व्यंकटेश्वरा ग्रुपचे आभार मानले.

# हिंदी भाषा कौशल विषयावर व्याख्यान संपन्न



मलेगांव कॅम्प:- महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने हिंदी भाषा कौशल या विषयावर व्याखानाचे आयोजन करण्यात आले होत.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनिष सोनवणे हे प्रमुख मार्गदर्शक होते. या प्रसंगी त्यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की हिंदी विषय घेऊन विद्यार्थ्यांनी जर भाषा कौशल आत्मसात केले तर त्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. परंतु यासाठी विद्यार्थ्यांनी चिकाटी, जिद्द व परिश्रम करणे गरजेचे आहे, असे विधान येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा. डॉ.मनिष सोनवणे यांनी केले.

ते हिंदी भाषा कौशल विषयावर हिंदी संशोधन केंद्र आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते . या कार्यक्रमा साठी प्रमुख अतिथी वक्ता म्हणून डॉ. शैलजा जायसवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी संशोधन केंद्र प्रमुख प्रो. डॉ. अनिता नेरे यांनी केले तर आभार प्रदर्शन एम.ए. द्वितीय वर्ष चा विद्यार्थी अमोल सोनजे याने केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही.डी. सूर्यवंशी यांनी केले .

# सॉफ्ट स्किल व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक- डॉ. किशोर निकम



मालेगाव । येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनाने हिंदी संशोधन केंद्राने दि. १४ ते १६ मार्च, २०२४ या कालावधीत अतिथी व्याख्यान मालेचे आयोजन केले.

या प्रसंगी तिसरे व्याख्यान सॉफ्ट स्किल चे महत्व या विषयावर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सॉफ्ट स्किल चे महत्व विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास साठी खूप गरजेचे आहे. जीवनात पुढे जाण्यासाठी अध्ययना बरोबरच सॉफ्ट स्किल आत्मसात करणे आवश्यक आहे. सॉफ्ट स्किलमुळे विद्यार्थी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करू शकतात. यात नेतृत्व आणि कम्युनिकेशन स्किल आत्मसात केल्याने विद्यार्थी आपल्या करिअर क्षेत्रात नावलौकिक मिळवू शकतील.

या तिसऱ्या पुष्प चे प्रमुख वक्ते डॉ. किशोर निकम यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी आपले विचार स्पष्ट करताना आधी ते विचार साफ आणि स्पष्ट शब्दात मांडले पाहिजे. त्याचबरोबर समोरच्या व्यक्तीचे म्हणणे देखील ऐकून घेतले पाहिजे. परिस्थितीनुसार आवाजाचा टोन ठेवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे बॉडी लँग्वेज, टीम वर्क, लीडरशिप स्किल, योग्य निर्णय घेणे, समस्येचे निराकरण करणे या गोष्टी सुद्धा आत्मसात करणे गरजेचे आहे.

या व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प प्रा. कोमल शिंदे यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर गुंफले तर द्वितीय पुष्प अमोल सोनजे व श्री. नकुल भावसार यांनी क्रमशः सोशल मीडियाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी व सायबर सिक्युरिटी या विषयावर गुंफले.

या तीनही व्याख्यानांचे प्रास्ताविक विभाग प्रमुख व संयोजक प्रो.डॉ. अनिता गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन अमोल सोनजे, रविना भावसार व सिमरन गवळी या पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. व्ही डी सूर्यवंशी यांनी केले. याप्रसंगी डॉ. अरुण पाटील, डॉ. विनोद गोरवाडकर व प्रा. एन. डी. पवार उपस्थित होते. हिंदी विभाग व संशोधन केंद्राच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या व्याख्यानमालेस मिळाला.

# सायबर सुरक्षा अतिशय महत्वाची- डॉ. सोनवणे

मालेगाव । महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय माले-गाव येथील महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने हिंदी संशोधन केंद्राकडून सायबर सुरक्षा या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी आजच्या जगात, काही सुरक्षा धोक्यांमुळे आणि सायबर हल्ल्यांमुळे सायबर सिक्युरिटी खूप महत्त्वा ची आहे. आपल्या कंपनीची माहिती चोरी होण्यापासून वाचण्यासाठी अनेक कंपन्या सॉफ्टवेअर विकसित करतात. हे सॉफ्टवेअर तुमच्या माहिती चे संरक्षण करते. सायबर सुरक्षा महत्त्वाची आहे. कारण ती केवळ माहितीच नाही तर आपल्या सिस्टमला व्हायरस च्या हल्ल्यापासून सुरक्षित ठेवण्यास मदत करते, असे उद्गार महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा. डॉ. मनिष सोनवणे यांनी काढले.

प्रमुख अतिथी प्रा.कोमल शिंदे (संगणक विभाग, म. स. गा. महाविद्यालय) यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर अतिशय सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले याप्रसंगी त्यांनी अनेक




दाखले देत विद्यार्थ्यांनी आणि विशे षतः विद्यार्थिनींनी सोशल मीडिया चा वापर करत असतांना कशाप्रकारे सावध राहिले पाहिजे याची माहिती सांगितली. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की संगणक, इंटरनेट, मोबाईल किंवा इतर तांत्रिक उपकरणे इत्यादींचा वापर करून एखाद्या व्यक्तीने किंवा एखाद्या गटा कडून तुमच्या माहितीशी छेडछाड करणे याला सायबर क्राईम किंवा सायबर गुन्हा म्हणतात. असे हे हल्लेखोर सायबर गुन्हे करण्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून असंख्य सॉफ्टवेअर आणि कोड वापरतात. तसे पाहिले गेले तर जगात अमेरिका आणि चीननंतर भारतात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे सर्वांनी खूप सावध राहून सोशल मीडिया चा वापर केला पाहिजे. जर आपला मोबाईल हरवला तर सर्वात आधी पोलीस स्टेशनला त्याची तक्रार दाखल केली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग व संशोधन केंद्र प्रमुख प्रो. डॉ. अनिता नेरे यांनी केले तर आभार प्रदर्शन एम.ए. हिंदी प्रथम वर्ष ची विद्यार्थीनी रुचिता वाघमारे हिने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही.डी. सूर्यवंशी यांनी केले.

11/3

मोक्षिणी वार्ता

गुरुवार, दि. १४ मार्च २०२४

३

# हिंदी भाषा कौशल्य विषयावर व्याख्यान संपन्न...



# महाराजा सयाजीराव गायकवाड यांची जयंती साजरी

**मालेगाव ।** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त व बडोदा संस्थानचे अधिपती महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ऊपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, रजिस्ट्रार आर. एच. शेलार, जयवंत कटारे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



महाविद्यालयाची पदव्युत्तर वर्गाची विद्यार्थिनी समीक्षा वाघ यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जीवन कार्याविषयी माहिती देताना असे सांगितले की, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी अनेक लोकोपयोगी काम केले. देशातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. बडोदा संस्थान हे देशातील पहिले असे संस्थान होते की ज्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. व शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. महाराजा सयाजीराव गायकवाड हे कलागुणांना वाव देणारे राजे होते असे गौरवोद्गार समीक्षा वाघ यांनी काढले. तसेच वाणिज्य शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी समीक्षा शिंदे हिने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची माहिती सांगितली. छत्रपती संभाजी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा वसा पुढे चालवला. छत्रपती संभाजी महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य हिंदवी स्वराज्यासाठी अर्पण केले होते. परंतु स्वत यांनी केलेल्या दगाबाजीमुळे त्यांना आपल्या जीवनाचे बलिदान द्यावे लागले.

याप्रसंगी प्राचार्य दिघावकर यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे जीवन कार्य सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीराजे व महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे जीवन कार्य समाजापर्यंत पोहोचवावे असे आव्हान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एन. ए. डोखे यांनी मानले.

सकाळ

# अथक परिश्रम केल्यास नेट-सेट अवघड नाही : कन्नोर

■ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता. ८ : नेट-सेटचे अध्ययनासाठी संदर्भ साहित्याचा वापर करावा. अथक परिश्रम, सातत्य व चिकाटीने अभ्यास केल्यास आपण नक्की नेट-सेट परीक्षा पास होऊ शकतो, असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख डॉ. संतोष कन्नोर यांनी केले.

येथील मसगा महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. अर्जुन नेरकर होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, मराठी संशोधन केंद्रप्रमुख डॉ. अरुण पाटील, डॉ. गजानन भामरे, डॉ. विनोद गोरवाडकर, डॉ. सपना सोनवणे, प्रा. वर्षा अहिरे, प्रा. उज्वला अहिरे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ.सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.नेरकर यांनी मराठी विभागाची भूमिका मांडली. डॉ.अरूण पाटील यांनी प्रास्ताविक केले. जया खेडकर यांनी सूत्रसंचालन केले. मयुरी सोनवणे हिने वक्त्यांचा परिचय करून दिला.



**मालेगाव शहर** : नेट-सेट कार्यशाळेत बोलताना डॉ. अरुण पाटील. शेजारी उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, डॉ. संतोष कन्नोर, डॉ. अर्जुन नेरकर आदी.

Nashik, District-Today
09/03/2024 Page No. 5

# मसगा महाविद्यालय आवर्तसारणी दिन साजरा



मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर व उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे ६ मार्च रोजी आवर्तसारणी दिन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने प्रा.निलेश माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना या दिवसाचे महत्त्व व इतिहास सांगितला व आवर्त सारणी कशा पद्धतीने तयार केले हे सांगताना सांगितले की, आवर्त सारणी (पिरॉडीक टेबल) ही रासायनिक मूलद्रव्यांना तक्त्याच्या रूपात दर्शवण्याची एक पद्धत आहे. मूलद्रव्यांना कोष्टकरूपात दाखवण्याच्या काही पद्धती जुन्या काळी प्रचलित होत्या जसे की डोबेरायनरची त्रिके, न्यूलँड्ची अष्टके या पद्धतींद्वारे केली जाणारी मांडणी सर्व ज्ञात मूलद्रव्यांना लागू करता येत नसे. ६ मार्च १८६९ साली रशियन शास्त्रज्ञ दिमित्री मेंडेलीव याने प्रथम ही आवर्त सारणी आधुनिक पद्धतीने मांडली. मेंडेलीवने मूलद्रव्यांना त्यांच्या अणु-वस्तुमानाच्या चढत्या क्रमाने मांडले. त्यानंतर मेंडेलीवने मूल द्रव्यांची आडव्या ओळीत मांडणी करण्यास सुरूवात केली. जर त्याला आधी मांडलेल्या मूल द्रव्याशी साधर्म्य असलेले दुसरे मूलद्रव्य सापडले, तर ते त्याने नवीन ओळीत पहिल्या मूलद्रव्याच्या खाली मांडले. मेंडेलीवला अश्या सारणीतून मूलद्रव्यांच्या गुणधर्मांमधील आवर्तानुसारी कल ठळक पणे दाखवायचे होते.

काळागणिक जसजशी नव्या मूलद्रव्यांची भर पडत गेली, तसतशी मेंडेलीवच्या मूळ सारणीची रचना वाढत बदलली गेली. मेंडेलीवची आवर्त सारणी जरी तत्कालीन ज्ञात मूलद्रव्यांची मांडणी करण्यात यशस्वी ठरली, कालांतराने, तिच्यामधील काही त्रुटी समोर त्यानंतर त्याच आवर्तसारणीचा उपयोग करून. १९१३ मध्ये हेनरी मोस्ले या ब्रिटिश शास्त्रज्ञाने असे शोधून काढले की, अणुवस्तुमान हा मूलद्रव्यांचा मूलभूत गुणधर्म नसून, तो अणुअंक हा आहे.

मोस्लेने मेंडेलीवच्या सारणीत अणु अंकानुसार मूलद्रव्यांची फेरमांडणी केली आणि आज वापरली जाणारी आधुनिक आवर्तसारणी तयार केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी तर आभार प्रा. विनोद आयनोर यांनी मानले या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनिष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक . डॉ प्रवीण पाटील यांच्यासह डॉ. पंकज पवार डॉ.चंद्रकांत आहेर, डॉ रमेश निर्वाण, डॉ. संदीप पठाडे, प्रा .राजेंद्र पवार, प्रा. अविनाश नेरकर, डॉ. नवानंद वडवळे ,प्रा. कुलदीप पडियार, डॉ.नंदकिशोर शिरसाट, प्रा. सागर शिंदे, प्रा. निखिल ठाकरे, प्रा गोकुळ सुर्यवंशी यांच्यासह रसायन शास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# मसगा कॉलेजात आवर्तसारणी दिन साजरा

मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे महाविद्याल याचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर व उपप्राचार्य डॉ अनिल सावळे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयातील रसायन शास्त्र विभागातर्फे ६ मार्च, आवर्तसारणी दिन साजरा करण्यात आला या निमित्ताने प्रा. निलेश माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना या दिवसाचे महत्त्व व इतिहास सांगितला व आवर्त सारणी कशा पद्धतीने तयार केले हे सांगताना सांगितले की आवर्त सारणी (पिरॉडीक टेबल) ही रासायनिक मूलद्रव्यांना तत्त्याच्या रूपात दर्शवण्याची एक पद्धत आहे. मूलद्रव्यांना कोष्टकरूपात दाखवण्याच्या काही पद्धती जुन्या काळी प्रचलित होत्या जसे की डोबेरायनरची त्रिके, न्यूलँडची अष्टके या पद्धतीं द्वारे केली जाणारी मांडणी सर्व ज्ञात मूलद्रव्यांना लागू करता येत नसे. ६ मार्च १८६९ साली रशियन शास्त्रज्ञ दिमित्री मेंडेलीव याने प्रथम ही आवर्त सारणी आधुनिक पद्धतीने मांडली. मेंडेलीवने मूलद्रव्यांना त्यांच्या अणु-वस्तुमानाच्या चढत्या क्रमाने मांडले. त्यानंतर मेंडेलीवने मूलद्रव्यांची आडव्या ओळीत मांडणी करण्यास सुरूवात केली. जर त्याला आधी मांडलेल्या मूलद्रव्याशी साधर्म्य असलेले दुसरे मूलद्रव्य सापडले, तर ते त्याने नवीन ओळीत पहिल्या मूलद्रव्याच्या खाली मांडले. मेंडेलीवला अश्या सारणीतून मूलद्रव्यांच्या गुणधर्मांमधील आवर्तानुसारी कल ठळकपणे दाखवायचे होते. काळागणिक जसजशी नव्या मूलद्रव्यांची भर पडत गेली, तसतशी मेंडेलीवच्या मूळ सारणी-ची रचना वाढत बदलली गेली. मेंडेलीवची आवर्त सारणी जरी तत्कालीन ज्ञात मूलद्रव्यांची मांडणी करण्यात यशस्वी ठरली, कालांतराने, तिच्यामधील काही त्रुटी समोर, त्यानंतर त्याच आवर्तसारणीचा उपयोग करून. १९१३ मध्ये हेनरी मोस्ले या ब्रिटिश शास्त्र ज्ञाने असे शोधून काढले की, अणुवस्तुमान हा मूलद्रव्यांचा मूलभूत गुणधर्म नसून, तो अणुअंक हा आहे. मोस्ले-ने मेंडेलीवच्या सारणीत अणुअंकानुसार मूलद्रव्यांची फेरमांडणी केली आणि आज वापरली जाणारी आधुनिक आवर्तसारणी तयार केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी तर आभार प्रा. विनोद आयनोर यांनी मानले याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनिष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ प्रवीण पाटील यांच्यासह डॉ. पंकज पवार डॉ.चंद्रकांत आहेर, डॉ रमेश निर्वाण, डॉ. संदीप पठाडे, प्रा. राजेंद्र पवार, प्रा. अविनाश नेरकर, डॉ. नवानंद वडवळे, प्रा. कुलदीप पडियार, डॉ.नंदकिशोर शिरसाट, प्रा. सागर शिंदे, प्रा. निखिल ठाकरे, प्रा गोकुळ सुर्यवंशी यांच्यासह रसायन शास्त्र विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म स गा महाविद्यालयात जागतिक महीला दिवस साजरा

**मालेगांव ।**

महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालयात मालेगांव कॅम्प येथे जागतिक महीला दिनानिमित्त स्त्री-पुरूष समानता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत करण्यात आले.

उदघाटन सत्रात अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर यांनी महीला दिन साजरा करण्यामागचा हेतू व गरज विद्यार्थ्यांना समजावून सांगितला . प्रमुख वक्ते इतिहास विभाग प्रमुख प्रा एम.डी. पवार के. टी. एच. एम. महाविद्यालय ,नाशिक यांनी स्त्री पुरुष समानता याबद्दल आपले मत व्यक्त केले. जोपर्यत आपण मध्ययुगीन विचारसरणी सोडत नाही तोपर्यत स्त्री- पुरूष समानतेवर बोलणे हे उपयोगी ठरणार नाही. आपल्याला आपल्या घरापासूनच स्त्री- पुरूष समानतेचे धडे मुलांना देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे स्त्रीयांनी याबाबतीत पुढाकार घेतला तर सर्व शक्य आहे . आज स्त्री-पुरूष समानतेचे धडे शाळा, महाविद्यालयांमध्ये अशा कार्यक्रमाचे औच्यित्य साधून दिले जात आहे ते पण फायद्याचेच आहे असे प्रमुख वक्त्यांनी आपल्याला बोलण्यात विशद केले. कार्यक्रम चे सूत्रसंचालन व आभार श्रीमती लीना पगारे यांनी केले. प्रास्ताविक महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष प्रा वैशाली साळुंके यांनी केले . या कार्यक्रम प्रसंगी म हाविद्यालयाचे उपप्राचार्य डा. अनिल सावळे, डा. मनिष सोनवणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मि लिंद कुलकर्णी , पर्यवेषक रविंद्र मोरे समवेत, प्राध्यापक, महाविद्यालयाचा सर्व महिला प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

साप्ताहिक
प्रकाशदूत
दि. ४ ते १० मार्च २०२४

# नवीन धोरणात गुणवत्तेचा स्तर उंचावण्यास मदत : डॉ. अपुर्व हिरे

**सा. प्रकाशदूत**

**मालेगाव :** आपल्या देशाला ज्या शिक्षण पद्धतीची गरज आहे. त्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून २०२३ पासून सुरु झाली आहे. हे शैक्षणिक धोरण प्राथमिक वर्गापासून महाविद्यालयापर्यंत टप्प्याटप्प्याने लागू होणार आहे. या बदलास विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही सामोरे जावे लागणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणात शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन डॉ. अपुर्व हिरे यांनी केले.



येथील मसगा महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. आपल्या देशामध्ये ३५ वर्षानंतर शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. जगाच्या बरोबरीने जाण्यासाठी व महासत्ता बनण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. म्हणून भविष्यातील शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना सज्ज राहणे आवश्यक असल्याचे ही डॉ. हिरे म्हणाले. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कल्याण कोकणे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे, डॉ. प्रविण पाटील, प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, प्रा. अजिक्य ठाकरे आदींसह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



मालेगाव शहर : मसगा महाविद्यालयातर्फे आयोजित शैक्षणिक धोरण कार्यशाळेत बोलताना माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर. डॉ. सुभाष निकम.

# गुणवत्ता विकासासाठी नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वपूर्ण : डॉ. अपूर्व हिरे

**सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव शहर, ता. ४ : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून २०२३ ला सुरु झालेली आहे. शैक्षणिक धोरण प्राथमिक वर्गापासून महाविद्यालयापर्यंत टप्प्याटप्प्याने लागू होणार असून, यामधील बदलास विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही सामोरे जावे लागणार आहे. या धोरणामुळे गुणवत्ता विकासासाठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, प्रा. अजिंक्य ठाकरे उपस्थित होते.

डॉ. दिघावकर म्हणाले, विद्यार्थी, पालक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून, येणाऱ्या काळात सर्वांना त्याची गरज आहे. महाविद्यालयास नुकत्याच झालेल्या नॅक मूल्यांकनामध्ये ३.२६ सीजीपीएस एवढा स्कोर मिळाला असून, महाविद्यालयास 'अ प्लस' नामांकन मिळाल्याचे त्यांनी सांगितले. नॅक कॉर्डिनेटर डॉ. कल्याण कोकणे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी



मालेगाव : मसगा महाविद्यालयातील कार्यशाळेत बोलताना डॉ. अपूर्व हिरे.

# नवीन धोरणात गुणवत्तेचा स्तर उंचावण्यास मदत : हिरे

**मालेगाव : पुढारी वृत्तसेवा**

आपल्या देशाला ज्या शिक्षण पद्धतीची गरज आहे. त्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून २०२३ पासून सुरू झाली आहे. हे शैक्षणिक धोरण प्राथमिक वर्गापासून महाविद्यालयापर्यंत टप्प्याटप्प्याने लागू होणार आहे. या बदलास विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही सामोरे जावे लागणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणात शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन डॉ. अपूर्व हिरे यांनी केले.

येथील मसगा महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. आपल्या देशामध्ये ३५ वर्षांनंतर शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. जगाच्या बरोबरीने जाण्यासाठी व महासत्ता होण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. म्हणून भविष्यातील शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना सज्ज राहणे आवश्यक असल्याचेही डॉ. हिरे म्हणाले.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी प्रास्ताविक, डॉ. कल्याण कोकणे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, प्रा. अजिंक्य ठाकरे आदींसह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

My Nashik Edition
Mar 4, 2024 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# नवीन शैक्षणिक धोरणात गुणवत्तेचा स्तर उंचावण्यास मदत– डॉ. अपुर्व हिरे



मालेगाव । नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून २०२३ पासून सुरु झालेली आहे. हे शैक्षणिक धोरण प्राथमिक वर्गापासून महाविद्यालयापर्यंत टप्प्याटप्प्याने लागू होणार असून, यामधील बदलास विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही सामोरे जावे लागणार आहे. आपल्या देशामध्ये ३५ वर्षानंतर शिक्षण पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत, पूर्वीची शिक्षण पद्धती ही ब्रिटिशांनी लागू केलेली शिक्षण पद्धती होती परंतु आज आपल्या देशाला ज्या शिक्षणात पद्धतीची गरज आहे त्या पद्धतीने हे नवीन शैक्षणिक धोरण अमलात येणार आहे. त्यामुळे गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी मदत होईल. तसेच नवीन शैक्षणिक धोरणाला आपल्याला सर्वांना सामोरे जावे लागेल व जगाच्या बरोबरीने जाण्यासाठी व महासत्ता बनण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. म्हणून भविष्यातील शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना सज्ज राहणे आवश्यक आहे असे प्रतिपादन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय आयोजित कार्यशाळेला संबोधित करतांना डॉ.अपूर्व हिरे यांनी मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी प्रास्ताविक करतांना सांगितले की विद्यार्थी, पालक व आपली सर्व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून येणाऱ्या काळात सर्वांना त्याची गरज आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयास नुकत्याच झालेल्या नॅक मूल्यांकनामध्ये ३.२६ सीजीपीएस एवढा स्कोर मिळाला असून महाविद्यालयास 'अ प्लस ' असे नामांकन मिळाले आहे त्याबद्दल डॉ. अपुर्व हिरे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, नॅक कमिटी मेंबर व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उप प्राचार्य डॉ मनिष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ प्रविण पाटील प्रा. मिलिंद कुलकर्णी,पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, प्रा अजिक्य ठाकरे सर्व प्राध्यापक, ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी सूत्रसंचालन व आभार नॅक कॉर्डिनेटर डॉ. कल्याण कोकणे यांनी केले.

# जिल्हास्तरीय केमियाड २०२४ चे म.स.गा महाविद्यालयात पारितोषिक वितरण



मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग आयोजित केमीड्राय २०२४ जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी जिल्ह्यातील १६ महाविद्यालयातील १३७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला या परीक्षेमध्ये प्रत्येक महाविद्यालयातून प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा संघ तयार करण्यात आला व त्यांच्यासाठी महाविद्यालयात क्विज कॉम्पिटिशन (प्रश्नमंजुषा)चे आयोजन करण्यात आले होते.

या प्रश्नमंजुषा मध्ये मसगा महाविद्यालय मालेगाव कॅम्प यांनी प्रथम क्रमांक पटकावला त्यांच्या संघाला फिरता चषक, प्रत्येकी ७५१ रुपये रोख प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली. त्याचप्रमाणे जे.ए.टी महिला महाविद्यालय मालेगाव या द्वितीय संघास प्रत्येकी ५०० रुपये रोख प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली. तसेच तृतीय महिला रत्न श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय मालेगांव या संघास प्रत्येकी ३०० रुपये रोख , प्रमाणपत्र, व ट्रॉफी देण्यात आली व ज्या संघाने या प्रश्नमंजुषेमध्ये सहभाग नोंदविला त्या संघातील प्रत्येकास २०० रुपये रोख प्रमाणपत्र व ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून निमगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यु.बी कदम हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा प्रकारच्या परीक्षा आपल्याला ह्या पुढील शिक्षणा साठी दिशा दर्शक म्हणून काम करत असतात व भविष्यात नक्कीच कामात पडतील असे सांगितले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी आजचे शिक्षण पद्धती व प्रणाली याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल सावळे, डॉ मनिष सोनवणे, डॉ प्रविण पाटील, केमीयाडचे कॉर्डिनेटर आर. के .पवार ,ऑर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ.सी. एस. आहेर, डॉ. पंकज पवार उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. सी एस.आहेर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले तर पारीतोषीकांची उद्घोषणा प्रा. डॉ. संदीप पठाडे यांनी केली तर आभार प्रा आर .के. पवार यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी रसायनशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हास्तरीय वकृत्वस्पर्धेत मसगाचे यश



मालेगाव । जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, नाशिक –जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धे मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु कोमल शेलार या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक आणि कु वरुण घरटे याने व्दितीय क्रमांक पटकवला.

महाविद्यालयाचे नाव गाजवणाऱ्या या गुणी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ मनीष सोनवणे, डॉ प्रविण पाटीलआणि महाविद्यालयीन परिवारातर्फे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना प्रा डी बी सोनवणे, डॉ रमेश निकम आणि प्रा सुधा मोरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# मसगा कॉलेजात सामाजिक न्यायदिन साजरा



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सामाजिक न्याय दिन, महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत साजरा करण्यात आला. उद्घाटन सत्रात अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर यांनी सामाजिक न्याय दिवसाचे महत्व विशद केले प्रमुख वक्ते डॉ सलामा सत्तार (जे ए टी महिला महाविद्यालय, माले- गाव) यांनी स्त्री पुरुष समानता आणि पॉश कायदा २०१३ यावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमात १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कु शीतल दैतकर या विद्यार्थिनीने केले प्रास्ताविक महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष प्रा वैशाली साळुंके यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते

# मसगा कॉलेजात अभिरुप संसदेचे आयोजन



मालेगांव । महात्मा गांधी विद्या मंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिक महाविद्यालयात, मालेगांव कॅम्प येथे राज्यशास्त्र विभाग व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिरूप संसद हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून जे टी महिला महाविद्यालयाच्या डॉ. सलमा सत्तार व डॉ. कनिज लोधी तसेच चांदवड महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रदीप वेताळ यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना संसदीय कामकाज विरोधी पक्षाची भूमिका इत्यादी विविध विषयांवर मार्गदर्शन केले तसेच अभिर संसदेचे कामकाज त्याचे प्रारूप विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून अनुभवला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी भूषविले उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील तसेच विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. पंकज पवार उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. चंद्रसिंग राजपूत प्रा.अशोक वाकचौरे. प्रा. एन डी पगार प्रा चेतन शेवाळे प्रा. अमृत मोरकर इत्यादींनी प्रयत्न केले कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

3/3

-व्यवस्थापक

शिवछत्रपती प्रतिष्ठान, पुणे निर्मित अलौकिक वारसा

सर्वांपर्यंत करण्यात आला आहे.

# जिल्हास्तरीय केमियाड २०२४ चे म.स.गा. महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**मालेगाव ।**

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य म हाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग आयोजित केमीडाय २०२४ जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी जिल्ह्यातील १६ महाविद्यालयातील १३७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला या परीक्षेमध्ये प्रत्येक महाविद्यालयातून प्रथम ,द्वितीय, व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा संघ तयार करण्यात आला, व त्यांच्यासाठी महाविद्यालयात क्विज कॉम्पिटिशन ( प्रश्नमंजुषा) चे आयोजन करण्यात आले होते.

या प्रश्नमंजुषा मध्ये मसगा महाविद्यालय मालेगाव कॅम्प यांनी प्रथम क्रमांक पटकावला त्यांच्या संघाला फिरता चषक ,प्रत्येकी ७५१ रुपये रोख प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली. त्याचप्रम णे जे. ए .टी महिला महाविद्यालय मालेगाव या द्वितीय संघास प्रत्येकी ५०० रुपये रोख प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली . तसेच तृतीय महिला रत्न श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय मालेगांव या संघास प्रत्येकी ३०० रुपये रोख , प्रमाणपत्र, व ट्रॉफी देण्यात आली व ज्या संघाने या प्रश्नमंजुषेमध्ये सहभाग नोंदविला त्या संघातील प्रत्येकास २०० रुपये रोख प्रमाणपत्र व ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली .याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून निमगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यु.बी कदम हे होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा प्रकारच्या परीक्षा आपल्याला ह्या पुढील शिक्षणा साठी दिशा दर्शक म्हणून काम करत असतात व भविष्यात नक्कीच कामात पडतील असे सांगितले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी आजचे शिक्षण पद्धती व प्रणाली याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल सावळे, डॉ मनिष सोनवणे , डॉ प्रविण पाटील, केमीयाडचे कॉर्डिनेटर आर. के .पवार ,ऑर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ.सी. एस. आहेर, डॉ. पंकज पवार उपस्थित होते .प्रास्ताविक प्रा. डॉ. सी एस .आहेर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले तर पारीतोषीकांची उद्घोषणा प्रा. डॉ. संदीप पठाडे यांनी केली तर आभार प्रा आर .के. पवार यांनी मानले. कार्यक्रम ासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी रसायनशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक ,विद्यार्थी यांनी परिश्रम. घेतले.

# मसगात पीसीबी डिझाईन विषयाची कार्यशाळा संपन्न




मालेगाव । महात्मा गांधी विद्या मंदिर संचालित म स गा महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक सायन्स विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळ, एस पी पी यु, पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पी सी बी डिजाईन विषयाची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

उदघाटन सत्रात अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल सावळे यांनी पी सी बी डिजाईन हे तंत्रज्ञान इलेक्ट्रॉनिक विश्वाचा मुख्य भाग आहे हे विशद केले कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते डॉ साजिद नईम (एम एम ए एन टी सी अभियांत्रिकी महाविद्यालय, मालेगाव) आणि अली अकबर (इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर, इंडिया इ एस वाय एस कंपनी, मालेगाव) यांनी मार्गदर्शन केले तसेच हॅन्ड्स ऑन ट्रेनिंग घेतले कार्यशाळेमध्ये १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा डी बी सोनवणे यांनी केला प्रास्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक डॉ सुषमा कुलकर्णी यांनी केले आणि तसेच आभार प्रदर्शन प्रा वैशाली साळुंके यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी डॉ पंकज पवार आई क्यू एस सी चे समन्वयक प्रा सईद अन्सारी तसेच भौतिक शास्त्र विभागाचे प्रा चेतन येवले उपस्थित होते.

# म.स.गा. महाविद्यालयात शिक्षण व सहकार महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांना जयंतीनिमित्त अभिवादन



मालेगाव कॅम्प:-भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील लढवय्ये सेनानी, मुंबई सह संयुक्त महाराष्ट्राचे प्रणेते, बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद उराशी बाळगून,गोरगरीब आदिवासी दिन सामान्यांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोहोचवणारे भागीरथ , शिक्षण व सहकार महर्षी कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांची ११९ वी जयंती महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी. दिघावकर व इतर मान्यवरांच्या हस्ते कर्मवीरांच्या समाधीस्थळी व पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महा विद्यालयात जयंती निमित्ताने कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांचे कर्मवीरांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी प्रा.मोरे यांनी कर्मवीरांच्या स्वतंत्र लढ्यातील योगदान, शैक्षणिक, कृषी, सहकार क्षेत्रातील योगदाना विषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिघावकर यांनी कर्मवीरांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे , उपप्राचार्य डॉ.मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.मिलिंद कुलकर्णी, एम.सी व्ही.सी विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे यांच्यासह प्राध्यापक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी तर आभार प्रा. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी मानले.




# नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनाची भूमिका मोलाची

**म. टा. वृत्तसेवा,** मालेगाव

## प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांचे प्रतिपादन

येत्या शैक्षणिक वर्षापासून शिक्षण व्यवस्थेत नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त झाले आहे. यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांनी सिद्ध होणे अनिवार्य आहे. नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनाची भूमिका मोलाची आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी केले.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित तीन दिवसीय अभ्यास व्याख्यानमालेप्रसंगी डॉ. दिघावकर बोलत होते. पुढे ते म्हणाले की, शासनाने संपूर्ण देशासाठी नवीन शैक्षणिक प्रणाली निर्माण केली असून, त्यामध्ये सर्व स्तरावर झालेले बदल आपल्याला अंगीकारावे लागणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास व्हावा अशी अपेक्षा आहे.

या व्याख्यानमालेच्या निमित्ताने प्रमुख वक्ते म्हणून मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. रमेश निकम यांनी संशोधन कसे करावे, संशोधनाच्या मूलभूत पद्धती कोणत्या, संशोधनाला मानसशास्त्रीय आधार कसा असायला हवा, संशोधन हे माणसासाठी कसे उपयुक्त ठरले पाहिजे, याविषयी अत्यंत सुसूत्रपणे विवेचन मांडले. ते म्हणाले की, संशोधन आणि माणूस यांचे नाते एकजीव आहे. त्यामुळे संशोधनाची मांडणी करताना, त्यामध्ये माणूस हा केंद्रभूत असावयास हवा, म्हणजे त्या संशोधनाचा समाजाला उपयोग होईल. डॉ. निकम यांनी अनेक ग्रंथांचे दाखले देऊन उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. अरुण पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनोद गोरवाडकर यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी मंचावर मराठी विभाग प्रमुख डॉ. ए. जी. नेरकर, डॉक्टर जी. जे. भामरे, डॉ. एस. एल. अहिरे उपस्थित होते. डॉ. सपना सोनवणे, प्रा. वर्षा अहिरे व प्रा. उज्वला अहिरे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**सकाळ**

# नव्या शैक्षणिक धोरणात संशोधन महत्त्वाचे

## डॉ. चंद्रकांत दिघावकर : 'मसगा' मराठी संशोधन केंद्र व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव शहर, ता. २९ : शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे आता शिक्षण व्यवस्थेमध्ये क्रम प्राप्त झाले असून यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांनी सिद्ध होणे अनिवार्य झाले, त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात संशोधनाची भूमिका मोलाची असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी केले.

''मसगा'' मराठी संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या तीन दिवसीय अभ्यास व्याख्यानमालेत डॉ. दिघावकर बोलत होते.

शासनाने संपूर्ण देशासाठी नवीन शैक्षणिक प्रणाली निर्माण केली असून त्यामध्ये सर्व स्तरावर झालेले बदल आपल्याला अंगीकारावे लागणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास व्हावा अशी अपेक्षा असल्याने याकडे अत्यंत लक्षपूर्वक बघावे लागणार असल्याचे देखील डॉ. दिघावकर यांनी पुढे सांगितले.




**मालेगाव शहर :** येथील मसगा महाविद्यालय मराठी संशोधन केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, डॉ. अरुण पाटील, डॉ. अर्जुन नेरकर आदी.

व्याख्यानमालेच्या निमित्ताने प्रमुख वक्ते म्हणून मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. रमेश निकम यांनी संशोधन कसे करावे, संशोधनाच्या मूलभूत पद्धती कोणत्या, संशोधनाला मानसशास्त्रीय आधार कसा असायला हवा, संशोधन हे माणसासाठी कसे उपयुक्त ठरले पाहिजे, याविषयी अत्यंत सुसूत्रपणे आपले विवेचन मांडले. प्रास्ताविक डॉ. अरुण पाटील यांनी तर सूत्रसंचालन डॉ. विनोद गोरवाडकर यांनी केले. मंचावर मराठी विभाग प्रमुख डॉ. अर्जुन नेरकर, डॉ. गजानन भामरे, डॉ. एस. एल. अहिरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. सपना सोनवणे, प्रा. वर्षा अहिरे, प्रा. उज्ज्वला अहिरे यांनी पुढाकार घेतला.

Nashik, District-Today

# महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्य आत्मसात करावे- प्राचार्य दिघावकर



मालेगाव । येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा द्वारा राबविण्यात येणाऱ्या डॉ. एम. आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटक व प्रमुख वक्ते म्हणून बँक ऑफ महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान सेलचे झोनल मॅनेजर श्री. मंदार खराडे हे उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्याल याचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना वरील उद्गार काढले.

महाविद्यालयात पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यां मध्ये रोजगारक्षम कौशल्य वृद्धिंगत व्हावे या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून डॉ. एम. आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांत केले जाते. मसगा महाविद्यालयात या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांमध्ये नव्या शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच रोजगारक्षम कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. रोजगारक्षम कौशल्य विकसित झालेल्या विद्यार्थ्यांना भविष्य काळात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध राहतील म्हणून विद्यार्थ्यांनी आपली व्यावसायिक क्षमता व आवडीचे क्षेत्र विचारात घेऊन रोजगारक्षम कौशल्य विकसित करावीत असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी उद्घाटक व प्रमुख वक्ते मालेगाव कॅम्प येथील बँक ऑफ महाराष्ट्राचे आयटी सेलचे झोनल मॅनेजर श्री. मंदार खराडे यांनी वित्तीय साक्षरतेच्या कौशल्या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी कोणत्याही विद्या शाखेचा असेल परंतु भविष्यात आपण ज्या आवडीच्या क्षेत्रात कार्यरत राहाल त्यावेळी आपल्याला आर्थिक व्यवहारासाठी बँकेशी जोडूनच घ्यावे लागते. अशावेळी बँकेकडून ग्राहकांना वेगवेगळ्या वित्तीय सुविधा व्यवहार करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या जातात. जसे की, ऑनलाइन बँकिंग, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग व यूपीआय आधारित वित्तीय व्यवहार करावे लागतात या सुविधा बँकेकडून ग्राहकांना दिल्या जातात. या सुविधांबरोबरच ग्राहकांची फसवणूक करणारी यंत्रणा ही सक्रिय असते. अशावेळी सुरक्षित बँकिंगचे व्यवहार कसे करावेत या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू डॉ. एम. आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य विकास कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. सुषमा कुलकर्णी मॅडम यांनी प्रास्ताविकात स्पष्ट केला. सूत्रसंचालन या कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. यु. के. टेके यांनी केले कार्यक्रमास एकूण साठ विद्यार्थी उपस्थित होते.

26/2

# मसगा कॉलेजात शिवजन्मोत्सव साजरा



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर महाविद्याल याचे प्राचार्य यांनी मार्गदर्शन करताना शिवजन्मोत्सव आपण का साजरा करतो तसेच आपण महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी का साजरी करतो याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी महाराजां जाज्वल इतिहास सांगतांना सांगितेले के जगात अनेक राजे महाराजे होऊन गेले परंतु साडेतीनशे वर्षांनंतरही स्मरणात राहणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय त्याचे कारण म्हणजे महाराजांनी राज्य हे स्वतःसाठी निर्माण केले होते, महाराजांकडे धार्मिक भेद भाव, स्त्री -पुरुष भेदभाव, अंधश्रद्धा या गोष्टींना कधीच थारा दिला नाही महाराज हे विज्ञानवादी होते तर दुसरे प्रमुख वक्ते कार्यालयीन अधी क्षक जयवंत कट्यारे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि जनतेला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करण्याच्या योगदानावर प्रकाश टाकला ना छत्रपती शिवाजी महाराजांनी मोघलांच्या ताब्यातील अनेक किल्ले जिंकून घेतले जनते चे अन्याय, अत्याचार यापासून रक्षण केले. उत्तम प्रशासन करताना जनतेचा राजा स्वतेचा राजा म्हणून लौकिक मिळवला असे सांगितले. उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल साबळे यांनीही याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जडणघडण हिंदवी स्वराज्याची स्थापना व आजच्या पिढीने त्यांचा आदर्श घेऊन स्वतः च्या पायावर उभे राहून आदर्श नागरिक व्हावे असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी.एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी मानले. याप्रसंगी प्रा.डॉ प्रविण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे, एमसीव्हीसी चे उप प्राचार्य प्रा.अजिंक्य ठाकरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19/2

# म.स.गा. महाविद्यालयात शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव कॅम्प येथे महाराष्ट्रा चे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉचंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी मार्गदर्शन करताना शिवजन्मोत्सव आपण का साजरा करतो तसेच आपण महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी का साजरी करतो याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी महाराजांचा जाज्वल इतिहास सांगातांना सांगितेले के जगात अनेक राजे महाराजे होऊन गेले परंतु साडेतीनशे वर्षानंतरही स्मरणात राहणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. त्याचे कारण म्हणजे महाराजांनी राज्य हे रयतेसाठी निर्माण केले होते, महाराजांकडे धार्मिक भेद भाव, स्त्री-पुरुष भेदभाव, अंधश्रद्धा या गोष्टींना कधीच थारा दिला नाही.

महाराज हे विज्ञानवादी होते तर दुसरे प्रमुख वक्ते कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि जनतेला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करण्याच्या योगदानावर प्रकाश टाकताना छत्रपती शिवाजी महाराजांनी मोघलांच्या ताब्यातील अनेक किल्ले जिंकून घेतले जनतेचे अन्याय, अत्याचार यापासून रक्षण केले. उत्तम प्रशासन करताना जनतेचा राजा रयतेचा राजा म्हणून लौकिक मिळवला असे सांगितले.

उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल सावळे यांनीही याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जडणघडण हिंदवी स्वराज्याची स्थापना व आजच्या पिढीने त्यांचा आदर्श घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून आदर्श नागरिक व्हावे असे आवाहन याप्रसंगी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी.एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.नरेंद्र डोखे यांनी मानले. या प्रसंगी प्रा.डॉ.प्रविण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे, एमसीव्हीसी चे उपप्राचार्य प्रा.अजिंक्य ठाकरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मसगा महाविद्यालयात शिवजयंती

**मालेगाव कॅम्प :** महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्राचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आला. प्राचार्यांनी शिवजन्मोत्सव आपण का साजरा करतो, याविषयी मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. डॉ. प्रवीण पाटील, प्रा. मिलिंद कुलकर्णी, प्रा. रवींद्र मोरे, एमसीव्हीसीचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे उपस्थित होते.

३

# मसगाच्या युवाकवींची सावित्री फुले विद्यापीठ काव्य संमेलनासाठी निवड




मालेगाव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी माननीय कुलगुरू घटित अनुदान वाटप समितीच्या बैठकीतून शिफारशीनुसार पुणे, अहमदनगर व नाशिक महाविद्यालया तील विद्यार्थी स्वयंसेवकांकरिता देशभक्तीपर व पर्यावरण पर विषयांसाठी आधारित मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये स्वरचित काव्यसंमेलन स्पर्धांचे जिल्हानिहाय पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. जिल्हास्तरीय वाणिज्य आणि संगणक शास्त्र महाविद्यालय ,नाशिक येथे दि. ७ फेब्रुवारी रोजी झालेल्या काव्यसंमेलन स्पर्धेत विविध तालुक्यातील अनेक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. नाशिक विभागातून महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचा प्रथम वर्ष विज्ञानचा विद्यार्थी कु. महाले चेतन सुनील याने इंग्रजी भाषेतून तृतीय क्रमांक मिळवला. तसेच तृतीय वर्ष विज्ञान ( इलेक्ट्रॉनिक्स) विभागाची विद्यार्थिनी कु. दैतकार शितल भाऊसाहेब हिने मराठी भाषेतून चतुर्थ क्रमांक पटकावला. या दोन्ही युवाकवींची १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठस्तरीय काव्यसंमेलनासाठी निवड झाली आहे. महाविद्यालयातील अनमोल मार्गदर्शनानेमुळेच हे विद्यार्थी यश मिळवू शकले. याप्रसंगी मसगा महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ.सी.जी दिघावकर सरांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत पुढील स्पर्धेसाठी प्रोत्स-हन दिले. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. जी. नेरकर सर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी.बी. सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल सहकार्य करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# हिरे आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत धुळे कॉलेजचा संघ सर्वोत्कृष्ट



मालेगाव । येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या लोकनेते व्यंकटरावजी हिरे २७ व्या अंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत धुळ्याच्या के. डब्ल्यू. एस. कॉलेजचा संघ विजेता ठरला या संघास फिरता चषक व रोख २१००१ रुपये सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे ही स्पर्धा झाली. वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण लोकमत पुणे आवृत्तीचे संपादक संजय आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे होते. प्रमुख अतिथी म्हणून नामको बँकेचे चेअरमन राजेंद्र भोसले, संस्थेचे विश्वस्त राजेश शिंदे, मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष निकम, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी पाटील, के बीएच विद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रफुल निकम, आर बी एच कन्या विद्यालयाच्या प्राचार्य देसले मॅडम यांच्यासह मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, स्पर्धेचे संयोजक डॉ . ज्ञानेश्वर सोनवणे, स्पर्धेचे परीक्षण डॉ. शिवाजी हुसे, डॉ. संजय बोरुडे, डॉ. रूपा शहा, जगदीश देवपूरकर व डॉ. मोहम्मद नरूरउल्लाह अन्सारी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ. मनीष सोनवणे यांनी करून दिला. पारितोषकांचे उद्घोषणा डॉ.डी .बी. सोनवणे यांनी केली. सूत्रसंचालन डॉ. अनिता नेरे व डॉ. विनोद गोरवाडकर यांनी केले. आभार वादविवाद संयोजन समितीचे प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे यांनी मानले.

सर्वोत्कृष्ट संघ : फिरता चषक रोख २१००१ सन्मान चिन्ह ठाकूर रोहित सुकलाल व हिरे धर्मेश साहेबराव के. डब्ल्यू. एस कॉलेज धुळे, सर्वोत्कृष्ट पारितोषिक : (अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय) शेलार कोमल (५००१) जाधव कावेरी (४५०१) शम सुदोहा अब्दुल कय्युम (४००१). भाषा निहाय वरिष्ठ महाविद्यालयीन गट (अनुक्रमे, प्रथम, द्वितीय व तृतीय प्रत्येकी ४००१, ३००१ व २००१ रुपये रोख), उर्दुभाषा: नम्रा मोहम्मद आसीम, हुस्ना फिरदोस कलीम खान, मोमीन निखत फिरदोस मुस्दहारीफ, अहिराणी भाषा : सोनवणे ईशा, देवरे रोशनी अशोक, निकम तेजल राजेंद्र. इंग्रजी भाषा : मोमीन साराह, निकम मानसी विलास, शेख फिरदोशी इस्माईल. हिंदी भाषा: तिवारी आशुतोष, तिवारी रितेश, त्रिभुवन आदर्श, मराठी भाषा: खरात स्वप्निल सोपान, घरटे वरुन प्रकाश, देवरे राजश्री संतोष. कनिष्ठ महाविद्यालयीन गट : प्रशांत चिंतामण बेले, अन्सारी अर्सल अतिक अहमद, समृद्धी संजय मोराणकर.

दोन दिवसीय स्पर्धा: हिंदी, मराठी, इंग्रजी, अहिराणी व उर्दू अशा पाच भाषांमध्ये घेतली जाणारी ही स्पर्धा या स्पर्धेत राज्यभरातील विविध ४६ महाविद्यालयातील १७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आरक्षण हे आर्थिक निकषावर असणे गरजेचे आहे हा वादविवाद स्पर्धेसाठी प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता या दोन दिवसीय स्पर्धेचा निकाल शनिवारी सायंकाळी घोषित करून पारितोषिक वितरण करण्यात आले.

# राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत धुळे संघ विजेता

## हिरे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा: राज्यभरातून १७० स्पर्धकांचा सहभाग

**मालेगाव : पुढारी वृत्तसेवा**

महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या लोकनेते व्यंकटरावजी हिरे २७ व्या आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत धुळ्याच्या के. डब्ल्यू. एस. कॉलेजचा संघ विजेता ठरला. वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. विजेता संघास फिरता चषक व रोख २१ हजार १ रुपये, सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.



मालेगाव : हिरे आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेतील विजेत्या संघास पारितोषिक वितरण करताना मान्यवर.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे होते. प्रमुख अतिथी म्हणून मामको बँकेचे संचालक राजेंद्र भोसले, संस्थेचे विश्वस्त राजेश शिंदे, प्राचार्य डॉ. सुभाष निकम, प्राचार्य डॉ. रजनी पाटील, प्राचार्य प्रा. प्रफुल निकम, प्राचार्य कल्पना देसले, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी प्रास्ताविक केले.

सर्वोत्कृष्ट संघ : फिरता चषक रोख २१ हजार १ रुपये, सन्मानचिन्ह - रोहित सुकलाल ठाकूर व धर्मेश साहेबराव हिरे (के. डब्ल्यू. एस. कॉलेज, धुळे), सर्वोत्कृष्ट पारितोषिक : (अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय) कोमल शेलार (५ हजार १), कावेरी जाधव (४ हजार ५०१), शमसुदोहा अब्दुल कय्युम (४ हजार १). भाषानिहाय वरिष्ठ महाविद्यालयीन गट : (अनुक्रमे , प्रथम, द्वितीय व तृतीय प्रत्येकी ४ हजार १, ३ हजार १ व २ हजार १ रुपये रोख), उर्दू भाषा : नम्रा मोहम्मद आसीम, हुस्ना फिरदोस कलीम खान, मोमीन निखत फिरदोस मुस्दहारीफ. अहिराणी भाषा : सोनवणे ईशा, देवरे रोशनी अशोक, ऊ निकम तेजल राजेंद्र. इंग्रजी भाषा : मोमीन साराह, मानसी विलास निकम, फिरदोशी इस्माईल शेख. हिंदी भाषा : आशुतोष तिवारी, रितेश तिवारी, आदर्श त्रिभुवन. मराठी भाषा : स्वप्निल सोपान खरात, वरुण प्रकाश घरटे, राजश्री संतोष देवरे. कनिष्ठ महाविद्यायीन गट : प्रशांत चिंतामण बेले, अर्सल अतिक अहमद अन्सारी, समृद्धी संजय मोराणकर.

दैनिक लोकनामा
सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक

# राज्यस्तरीय स्पर्धेत 'केडब्ल्यूएस'चा संघ सर्वोत्कृष्ट

लोकनामा प्रतिनिधी

**मालेगाव कॅम्प** : येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात लोकनेते व्यंकटरावजी हिरे २७ वी आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा नुकतीच झाली. त्यात धुळ्याच्या केडब्ल्यूएस महाविद्यालयाचा संघ विजेता ठरला. या संघाला फिरता चषक व रोख २१ हजार एक रुपये, सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात ही स्पर्धा झाली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण 'लोकमत'च्या पुणे आवृत्तीचे संपादक संजय आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे अध्यक्षस्थानी होते.

प्रमुख अतिथी नामको बँकेचे चेअरमन राजेंद्र भोसले, संस्थेचे विश्वस्त राजेश शिंदे, मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रजनी पाटील, केबीएच विद्यालयाचे प्राचार्य प्रफुल्ल निकम, आरबीएच कन्या विद्यालयाच्या प्राचार्या कल्पना देसले, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण पाटील, स्पर्धेचे संयोजक डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, व्होकेशनल विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे उपस्थित होते.

या स्पर्धेचे परीक्षण डॉ. शिवाजी हुसे, डॉ. संजय बोरुडे, डॉ. रूपा शहा, जगदीश देवपूरकर व डॉ. मोहम्मद नरूरउल्लाह अन्सारी यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. मनीष सोनवणे यांनी करून दिला. पारितोषकांची उद्घोषणा डॉ. डी. बी. सोनवणे यांनी केली. डॉ. अनिता नेरे व डॉ. विनोद गोरवाडकर यांनी सूत्रसंचालन केले. वादविवाद संयोजन समितीचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी आभार मानले.



**स्पर्धेचा निकाल असा :**


सर्वोत्कृष्ट संघ : फिरता चषक, रोख २१ हजार एक रुपये, सन्मानचिन्ह- रोहित सुकलाल ठाकूर व धर्मेश साहेबराव हिरे (केडब्ल्यूएस महाविद्यालय, धुळे). सर्वोत्कृष्ट पारितोषिक (अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय) : कोमल शेलार (पाच हजार एक रुपये), कावेरी जाधव (चार हजार ५०१), शाम सुदोहा अब्दुल कय्युम (चार हजार एक रुपये). भाषानिहाय वरिष्ठ महाविद्यालयीन गट (अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय. प्रत्येकी चार हजार एक, तीन हजार एक व दोन हजार एक रुपये रोख) : उर्दू भाषा : नम्रा मोहम्मद आसीम, हुस्ना फिरदोस कलीम खान, मोमीन निखत फिरदोस मुस्दहारिफ. अहिराणी भाषा : ईशा सोनवणे, रोशनी देवरे, अशोक निकम, तेजल राजेंद्र. इंग्रजी भाषा : मोमीन साराह, मानसी विलास निकम, शेख फिरदोशी इस्माईल. हिंदी भाषा : आशुतोष तिवारी, रितेश तिवारी, आदर्श त्रिभुवन. मराठी भाषा : स्वप्नील सोपान खरात, वरुण प्रकाश घरटे, राजश्री संतोष देवरे. कनिष्ठ महाविद्यालयीन गट : प्रशांत चिंतामण बेले, अन्सारी अर्सल अतिक अहमद, समृद्धी संजय मोराणकर.

# वादविवाद स्पर्धेतून उत्कृष्ट वक्तृत्वपटू : आयुक्त जाधव

## मसगात राज्यस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन

लोकनामा प्रतिनिधी

**मालेगाव कॅम्प** : सत्वीस वर्षांपासून लोकनेते व्यंकटराव हिरे आंतरमहाविद्यालय राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा यशस्वी होत आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असतो, त्यांच्या सुप्त कलागुणांना चालना देण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाचा वाटा उचलत असतात. या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक उत्कृष्ट वक्तृत्वपटू घडतात, असे प्रतिपादन महापालिकेचे आयुक्त रवींद्र जाधव यांनी केले.



महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आयोजित दोनदिवसीय राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त राजेश शिंदे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी पाटील, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, केबीएच विद्यालयाचे प्राचार्य प्रफुल्ल निकम, प्रा. अजिंक्य ठाकरे, प्रा. रवींद्र मोरे, रघुनाथ शेलार, जयदीप कट्यारे, राजेश निकम व परीक्षक उपस्थित होते. जाधव म्हणाले की, स्पर्धकांनी विषयावर मत मांडताना विचारपूर्वक व विषयाला अनुसरून मुद्दा स्पष्ट करावा. मसगाममधील वादविवाद स्पर्धेचा आढावा घेत त्यांनी स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले. प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी संस्थेच्या माध्यमातून हे अतिशय उत्कृष्ट व देश पातळीवरील एकाच वेळी पाच भाषांमध्ये घेतली जाणारी एकमेव स्पर्धा असून, स्पर्धेसाठी राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या.

वादविवाद संयोजन समितीचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अनिता नेरे, प्रा. डॉ. विनोद गोरवाडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अंकुश मायाचार्य यांनी आभार मानले.

सकाळ

# विचारांचा वारसा सांभाळत संस्थेची प्रगती

## संजय आवटे : 'हिरे' वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**स्पर्धेतील विजेते असे :**
**(प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे)**

**भाषानिहाय महाविद्यालयीन गट (वरिष्ठ)**



सकाळ

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अनुभवली साखरेची निर्मिती

मालेगाव, ता. १० : देशातील खाजगी क्षेत्रातील रावळगाव हा पहिला साखर कारखाना आहे. रावळगावची महती सर्वदूर आहे. काही कारणामुळे तीन वर्षांपासून कारखाना बंद होता. सध्या कारखान्याचा गळीत हंगाम जोमात सुरू आहे. त्यामुळे कारखाना सर्वांना पाहण्यासाठी खुला आहे. महाशिवरात्रीनिमित्त आलेल्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही कारखाना पाहता येईल. विद्यार्थ्यांसोबतच इतर पालकांनाही कारखाना पाहण्याची मुभा असल्याचे कारखान्याचे अध्यक्ष बबनराव गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान, कारखाना स्थळावर विविध शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी भेट देऊन साखर उत्पादनाची माहिती जाणून घेत आहेत.

## रावळगाव कारखाना पाहण्यास सर्वांना मुभा





- बबनराव गायकवाड



+

सकाळ

# वादविवाद स्पर्धेची समृद्ध परंपरा प्रेरक

## रवींद्र जाधव : मसगा महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचे उद्‌घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता. १० : महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असतो. त्यांच्या सुप्त कलागुणांना चालना देण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या वाटा उचलत असतात. या स्पर्धांच्या माध्यमातून अनेक उत्तम वक्तृत्वपटू घडतात, असे प्रतिपादन मालेगाव महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांनी केले.

येथील मसगा महाविद्यालयातर्फे आयोजित लोकनेते व्यंकटराव हिरे राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे होते. मंचावर संस्थेचे विश्वस्त राजेश शिंदे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, महिला महाविद्यालय प्राचार्य डॉ. रजनी पाटील, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, प्रफुल्ल निकम, प्रा. अजिंक्य ठाकरे, प्रा. रवींद्र मोरे, रघुनाथ शेलार, जयवंत कटारे, राजेश निकम व परीक्षक उपस्थित होते.

श्री. जाधव म्हणाले, की स्पर्धकांनी विषयावर मत मांडताना विचारपूर्वक व विषयाला अनुसरून मुद्दा स्पष्ट करावे. नव्या तंत्रज्ञानाचा वापर व वाचन, चिंतनशीलता विषयावर बोलण्यासह खंडन करण्यास उत्सुक ठरत असते. लोकनेते हिरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेल्या वादविवाद स्पर्धेचा आढावा घेत सातत्य व अखंड स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले.

प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी स्पर्धेसाठी राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या. स्पर्धा संयोजन समितीचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी प्रास्ताविक करत स्पर्धेची भूमिका मांडली. सूत्रसंचालन डॉ. अनिता नेरे, डॉ. विनोद गोरवाडकर यांनी केले, तर आभार प्रा. अंकुश मायाचार्य यांनी मानले. या स्पर्धेसाठी संयोजन समितीचे डॉ. डी. एम. निकम, डॉ. आर. एन. निकम, प्रा. डी. बी. सोनवणे, प्रा. राज त्रिभुवन, प्रा. अजय अहिर, प्रा. मिलिंद पवार, प्रा. अभिजित पाटील आदी पुढाकार घेत आहेत.



मालेगाव शहर : येथील मसगा महाविद्यालयातर्फे आयोजित वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना महापालिका आयुक्त रवींद्र जाधव. शेजारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर आदी.

Nashik, Malegaon

---



# उत्कृष्ट वकृत्वपटू वादविवाद स्पर्धेतून तयार होतात–आयुक्त जाधव

**मालेगाव कॅम्प:–गेल्या २६ वर्षांपासून लोकनेते व्यंकटराव हिरे अंतरमहाविद्यालय राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा यशस्वी होत आहे. महाविद्यालयातील शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा असतो त्यांच्या सुप्त कलागुणांना चालना देण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाचा वाटा उचलत असतात. या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक उत्तोमोत्म वकृत्वपटू घडतात असे प्रतिपादन मालेगाव महानगरपालिकेचे आयुक्त श्री.रवींद्र जाधव यांनी केले.**

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आयोजित दोन दिवशीय राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वाद विवाद स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव डॉ.व्ही. एस.मोरे हे होते, मंचावर संस्थेचे विश्वस्त राजेश शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सी.जी.दिघावकर, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, केबीएच विद्यालयाचे प्राचार्य प्रफुल्ल निकम, प्रा.अजिक्य ठाकरे, प्रा.रवींद्र मोरे, रघुनाथ शेलार, जयवंत कटारे, राजेश निकम व परीक्षक उपस्थित होते.



पुढे श्री जाधव म्हणाले की स्पर्धकांनी विषयावर मत मांडताना विचारपूर्वक व विषयाला अनुसरून मुद्दा स्पष्ट करावा मसगांमधील वादविवाद स्पर्धेचा आढावा घेत त्यांनी स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी.जी दिघावकर यांनी संस्थेच्या माध्यमातून ही अतिशय उत्कृष्ट व देश पातळीवरील एकाच वेळी पाच भाषांमध्ये घेतली जाणारी एकमेव स्पर्धा असून स्पर्धेसाठी राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक वादविवाद संयोजन समितीचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी तर सूत्रसंचालन. डॉ. अनिता नेरे प्रा.डॉ. विनोद गोरवाडकर यांनी केले ,तर आभार प्रा. अंकुश मायाचार्य यांनी मानले. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा दि.१० फेब्रुवारी रोजी सां.५ संजय आवटे संपादक दै.लोकमत पुणे आवृत्ती व सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा संस्थेचे समन्वयक डॉ.अपूर्व हिरे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

महत्त्वाचे

# म. स.गा. महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

**नाशिक : वार्ताहर**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे दिनांक ९ व १० फेब्रुवारी २०२४ रोजी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, हे स्पर्धेचे २७ वे वर्ष असून या वादविवाद स्पर्धेसाठी ,आरक्षण आर्थिक निकषावर असणे आवश्यक आहे हा विषय ठेवण्यात आला आहे. स्पर्धक आपले मत विषयाच्या बाजूने किंवा विषयाच्या विरुद्ध बाजूने मांडू शकतात. संबंधित स्पर्धा ही मराठी ,हिंदी, इंग्रजी, उर्दू व अहिराणी अशा पाच भाषांमध्ये घेतली जाणार आहे ही देश पातळीवरील एकमेव अशी वादविवाद स्पर्धा आहे की ज्या ठिकाणी पाच भाषांमधून ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेसाठी येणाऱ्या स्पर्धकांची भोजनाची व निवासाची व्यवस्था महाविद्यालयामार्फत केली जाणार आहे. प्रत्येक भाषेच्या संघासाठी प्रवेश शुल्क २०० रुपये इतका असून ही रक्कम प्राचार्य म.स.गा महाविद्यालय या नावाने दिनांक ८ फेब्रुवारी पूर्वी डीडी ने किंवा डॉ. उदय टेके (९९७०२४२०४१) या नंबर वर ऑनलाईन पद्धतीने फोन पे किंवा गुगल पे ने पाठवू शकतात. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास रोख २१,००१ रुपये व फिरता चषकाने सन्मानित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक भाषेमधील , प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या स्पर्धकाला रोख रक्कम प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन दि. ९/०२/२०२४ रोजी ठीक सकाळी १० वाजता, तर बक्षिस वितरण दि. १० फेबुवारी रोजी सायंकाळी संस्थेचे समन्वयक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपुर्व हिरे व ज्येष्ठ पत्रकार श्री संजय आवटे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तरी इच्छुक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी म.स. गा महाविद्यालय मालेगाव येथे व डॉ.डि.एन सोनवणे यांना ८२०८३४७५२२ यांच्याशी संपर्क साधावा व स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने व या स्पर्धेत सहभागी व्हावे असे संस्थेच्या जनसंपर्क विभागामार्फत कळविण्यात आलेले आहे.

आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# म. स. गा. महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन

✦ **नाशिक** । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे ९ व १० फेब्रुवारी २०२४ रोजी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे २७ वे वर्ष असून, या वादविवाद स्पर्धेसाठी आरक्षण आर्थिक निकषावर असणे आवश्यक आहे हा विषय ठेवण्यात आला आहे. स्पर्धक आपले मत विषयाच्या बाजूने किंवा विषयाच्या विरुद्ध बाजूने मांडू शकतात.

संबंधित स्पर्धा ही मराठी ,हिंदी, इंग्रजी, उर्दू व अहिराणी अशा पाच भाषांमध्ये घेतली



जाणार आहे, अशी देश पातळीवरील एकमेव वादविवाद स्पर्धा आहे. या स्पर्धेसाठी येणाऱ्या स्पर्धकांची भोजनाची व निवासाची व्यवस्था महाविद्यालयामार्फत केली जाणार आहे.

स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास रोख २१,००१ रुपये व फिरता चषकाने सन्मानित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक भाषेमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या स्पर्धकाला रोख रक्कम प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता आणि बक्षिस वितरण १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी संस्थेचे समन्वयक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपूर्व हिरे व ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. इच्छुक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी म. स. गा. महाविद्यालय मालेगाव येथे व डॉ. डी. एन. सोनवणे यांना ८२०८३४७५२२ यांच्याशी संपर्क साधावा व स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने व या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे संस्थेच्या जनसंपर्क विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# म.स.गा. महाविद्यालयात शुक्रवारपासून वादविवाद स्पर्धा

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे दि. ९ व १० फेब्रुवारी २०२४ रोजी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, हे स्पर्धेचे २७ वे वर्ष असून या वादविवाद स्पर्धेसाठी, "आरक्षण आर्थिक निकषावर असणे आवश्यक आहे" हा विषय ठेवण्यात आला आहे. स्पर्धक आपले मत विषयाच्या बाजूने किंवा विषयाच्या विरुद्ध बाजूने मांडू शकतात.

संबंधित स्पर्धा ही मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू व अहिराणी अशा पाच भाषांमध्ये घेतली जाणार आहे. ही देश पातळीवरील एकमेव अशी वादविवाद स्पर्धा आहे की, ज्या ठिकाणी पाच भाषांमधून ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेसाठी येणाऱ्या स्पर्धकांची भोजनाची व निवासाची व्यवस्था महाविद्यालयामार्फत केली जाणार आहे. प्रत्येक भाषेच्या संघासाठी प्रवेश शुल्क २०० रुपये इतका असून ही रक्कम प्राचार्य म.स.गा महाविद्यालय या नावाने दिनांक ८ फेब्रुवारी पूर्वी डीडीने किंवा डॉ. उदय टेके (९९७०२४२०४१ ) या नंबर वर ऑनलाईन पद्धतीने फोन पे किंवा गुगल पेने पाठवू शकतात. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास रोख २१,००१ रुपये व फिरता चषकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

या व्यतिरिक्त प्रत्येक भाषेमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या स्पर्धकाला रोख रक्कम प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहाला, तर बक्षीस वितरण दि. १० फेबुवारीला सायंकाळी संस्थेचे समन्वयक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. अपुर्वभाऊ हिरे व संजय आवटे संपादक, लोकमत पुणे आवृत्ती यांच्या हस्ते होणार आहे. इच्छुक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी म.स. गा महाविद्यालय मालेगाव येथे व डॉ. डी. एन. सोनवणे यांना ८२०८३४७५२२ या क्रमांकावर संपर्क साधावा. स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने व या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे संस्थेच्या जनसंपर्क विभागामार्फत कळविण्यात आलेले आहे.

२

# मराठी भाषेत रोजगाराच्या खूप संधी– डॉ. विनोद गोरवाडकर



मालेगांव । सध्या प्रत्येक प्रादेशिक भाषेला खूप महत्त्व आले असून मराठी भाषा देखील त्याला अपवाद नाही. मराठी भाषेमध्ये स्पर्धा परीक्षा देऊन अनेक अधिकारपद प्राप्त होण्याची संधी असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम लेखक डॉ. विनोद गोरवाडकर यांनी केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. मराठी भाषा ही अत्यंत डौलदार असून तिची अनेक रूपे महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या भागात अनुभवता येतात. या भाषेमध्ये प्रचंड गोडवा असून ती माणसाला आपलेसे करते. त्यामुळे या भाषेविषयीची कृतज्ञता मराठी माणसाने सातत्याने मनामध्ये ठेवून ठेवली पाहिजे, असे आवाहनही डॉ. गोरवाडकर यांनी केले. या व्याख्यानात त्यांनी मराठी भाषेच्या संदर्भातील अनेक उदाहरणे तसेच भाषेतील गमती जमती विशद करून सांगितल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झालेल्या या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे व डॉ. मनीष सोनवणे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. ए. जी. नेरकर हे होते. आपल्या मनोगतात त्यांनी मराठी भाषेचा गौरव करीत अनेक साहित्यिकांच्या योगदानाचे मर्म उलगडून दाखविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग संशोधन केंद्राचे संचालक डॉ. अरुण पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन डॉक्टर जी. जे. भामरे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. उज्वला अहिरे यांनी केले. या पंधरवड्यात मराठी विभागातर्फे निबंध लेखन, काव्य लेखन व उत्तम हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमास डॉ. सपना सोनवणे, प्रा. वर्षा अहिरे तसेच विविध विभागातील शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.देवेंद्र मगर यांचे नेट-सेट परिक्षेत यश



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विषयाचे प्रा. देवेंद्र मगर यांनी सी .एस. आय. आर. नेट , सेट तसेच गेट या तीनही परिक्षेत यश संपादन केले. त्याबद्दल महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सदर प्रसंगी उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, प्राणीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील पाटील व सहकारी उपस्थित होते. प्रा देवेंद्र मगर यांचे महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

30/1

# महात्मा गांधींचे विचार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्याची गरज-प्राचार्य डॉ. दिघावकर



**मालेगाव:-महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी. दिघावकर यांनी वरील विचार व्यक्त केले.**

आपल्या मनोगतात पुढे बोलताना ममहात्मा गांधींनी स्वातंत्र्या पूर्वी सत्य, शांती आणि अहिंसा या त्रिसूत्रीचा वापर करून बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध आवाज उठविला. महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांना भारतातून चलेजावचा नारा दिला. गांधीजींना भारतात राम राज्याची संकल्पना रुजवायची होती. त्यासाठी ग्रामीण भागाला अधिक समृद्ध व सक्षम करायचे होते. स्वातंत्र्यानंतर ७७ वर्ष उलटल्यानंतरही महात्मा गांधीजींचे विचार प्रभावी ठरतात म्हणून महात्मा गांधीजींचे विचार हे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कट्यारे यांनी महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कार्याचा आढावा घेतला. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधी यांनी पारतंत्र्यातील भारतीय जनतेचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोन अभ्यास करून येथील समाज व्यवस्था समजावून घेतली. येथील जनतेच्या व्यथा व गरजा जाणून घेतल्या यामुळेच भारतीय जनतेच्या स्वातंत्र्याचे यशस्वी

# गांधीजींचे विचार शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्याची गरज: प्राचार्य डॉ. दिघावकर

**मालेगाव ।**

येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी वरील विचार व्यक्त केले. आपल्या मनोगतात पुढे बोलताना 'महात्मा गांधींनी स्वातंत्र्यापूर्वी सत्य, शांती आणि अहिंसा या त्रिसूत्रीचा वापर करून बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध आवाज उठविला. महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांना भारतातून चलेजावचा नारा दिला. गांधीजींना भारतात राम राज्याची संकल्पना रुजवायची होती. त्यासाठी ग्रामीण भागाला अधिक समृद्ध व सक्षम करायचे होते. स्वातंत्र्यानंतर ७७ वर्ष उलटल्यानंतरही महात्मा गांधीजींचे विचार प्रभावी ठरतात म्हणून महात्मा गांधीजींचे विचार हे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे' असे प्रतिपादन विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी केले.



या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कट्यारे यांनी महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कार्याचा आढावा घेतला. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा

# म.स.गा. महाविद्यालयाच्या वाणिज्य विद्यार्थ्यांची मोरगन दुध डेअरीला भेट



**मालेगाव ।**

येथील म.स.गा. कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांची आघार (ता.मालेगांव)येथील मोरगन दुध व डेअरी औद्योगिक क्षेत्रास भेट दिली स्वयंरोजगार व कौशल्य विकास यावर भर देण्यातसाठी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनातून भेट देण्यात आली.

म.स.गा. कनिष्ठ महाविद्यालयात करियर मार्गदर्शन कार्यक्रम व इतर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. नीट, जेईई, सीईटी तसेच इतर स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केले जाते.विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या वाटचालीसाठी स्वयंरोजगार, व्यवसाय,व्यापार, उद्योग करिअर घडविण्यासाठी विशिष्ट कौशल्यावर आधारित व्यवसाय शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करत असतात तसेच नुकतीच बॅक ऑफ बडोदा बँकेत ही विद्यार्थ्यांना घेऊन जावून प्रत्यक्ष कामाची पाहणी केली .आघार येथील मोरगन दुध डेअरीचे व्यवस्थापक बाळा बोरसे यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले पॅकीग, दैनंदिन उत्पादन दुधापासून प्रकिया करून पदार्थ कसे बनवतात सर्व सखोल अशी माहीती दिली. उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले, पर्यवेक्षक प्रा.रवींद्र मोरे यांनी आपल्या मनोगतातून त्यांनी सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार मेळावे, ऑनलाईन वेबिनार, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येत आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा जितेंद्र पाटील. प्रा शांताराम पानपाटील प्रा कामीनी पवार प्रा लीना शेलार प्रा जितेंद्र पाटील यांनी सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# संस्थेला राज्यस्तरीय पुरस्कार



# मसगा कॉलेजात प्रजासत्ताकदिन साजरा



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे भारताचा अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे .प्राचार्य डॉ.सी.जी दिघावकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उच्च शिक्षण विभाग डायरेक्टर कार्यालय पुणे येथील शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रशांत मगर हे उपस्थित होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी संचालन केले. प्राचार्यांनी मार्गदर्शन करत प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी संविधानाचे देशासाठी व नागरिकांसाठी महत्त्व विशद केले.याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध ध्वज क्षेत्राचे सादरीकरण केले.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, उप प्राचार्य डॉ.मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम एस कुलकर्णी, शैक्षणिक पर्यवेक्षक प्राध्यापक रवींद्र मोरे, शैक्षणिक समन्वयक ज्युनिअर विभाग प्रा.प्रवीण पवार एमसीव्हीसी विभागाचे उपप्राचार्य प्रा.अजिंक्य ठाकरे, कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधी क्षक जयवंत कट्यारे, राजेश निकम, राष्ट्रीय छात्र सेनेच्या लेफ्टनंट भाग्यश्री वाघमारे, सी टी ओ सूर्यभान सांगळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ.अर्जुन नेरकर, डॉ.चंद्रसिंग राजपूत, प्रा.वैशाली साळुंखे, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मसगा महाविद्यालयाचे यश



मालेगांव । नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव येथील विद्यार्थिनी कु. कोमल नरेंद्र शेलार या विद्यार्थिनीने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. महाविद्यालयाचे नाव राज्यपातळीवर गाजवणाऱ्या या गुणी विद्यार्थिनीचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील व महाविद्यालयीन परिवारातर्फे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.प्रा.डी. बी सोनवणे, प्रा.डॉ रमेश निकम व प्रा.डॉ भारती खैरनार ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

# प्रथम राज्य क्रिडा दिन मसगा कॉलेजात साजरा



मालेगाव । शासनाच्या परिपत्रका प्रमाणे भारताचे पहिले वैयक्तीक ऑलम्पिक पदक विजेते (कुस्ती) स्व.खाशाबा दादा साहेब जाधव यांचा जन्मदिवस हा महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन म्हणून विविध क्रीडा प्रकारांच्या आयोजनातून साजरा करण्यात यावा त्याच अनुशंघाने म.स.गा. महाविद्यालयात देखील हा राज्य क्रीडा दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. आजच्या ह्या राज्य क्रीडा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात भव्य बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश कराड यांनी कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या जीवनकार्याचा उजळा करून सर्व उपस्थीत खेळाडूंना आपल्या खेळाप्रतीची निष्ठा व चिकाटी कशी असावी हि आवल्या प्रमुख अतिथी भाषणात करून दिली त्याच बरोबर अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे क्रीडाप्रेमी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी खेळाडूंच्या अंगी असणारी जिद्द, चपळता, व घेतलेले कार्य तडीस नेण्यासाठी सर्वतोपरी श्रम घेण्याची तयारी असावी असे खेळाडूंना संबोधित केले. बास्केट बॉल क्रीडा स्पर्धामध्ये विविध महाविद्यालयातील संघांनी सहभाग नोंदविला. प्रथम द्वितीय स्थानावर विजय संपादित केलेल्या महाविद्याल याच्या खेळाडूंना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांक म.स.गा. महाविद्यालय तर द्वितीय क्रमांक मालेगाव तालुका बास्केटबॉल असोसिएशनच्या संघाने पटकावला. क्रीडा स्पर्धाप्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर उप प्राचार्य डॉ. टी. एस. साळवे डॉ. मनीष सोनवणे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे होते. क्रीडा स्पर्धासाठी पंच म्हणून सैफ अन्सारी व जुबेर सर लाभले. महाविद्यालयातील आजी माजी माजी बास्केटबॉल खेळाडूंचे सदर स्पर्धा यशस्वीतेसाठी बहुमोल सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार क्रीडा मार्गदर्शक संदिप कोंडुरकर यांनी मानले.

# शरीर हीच खरी धनसंपदा- डॉ. सीमा राणे



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयातील समाजश्री प्रशांत दादा हिरे निरामय आरोग्य केंद्र मार्फत आरोग्य जागृती शिबिरात बोल ताना डॉ. सीमा राणे यांनी वरील उद्गार काढले. महाविद्यालयातील निरामय आरोग्य केंद्र मार्फत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यासाठी आरोग्य हीच धनसंपदा या विषयावर आरोग्य जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात निरामय केंद्र उरुळी कांचन पुणे येथील आरोग्य सल्लागार डॉ. सीमा राणे ,डॉ. अक्षय शेवाळे व डॉ. अभिषेक पवार यांनी मोफत नाडी परीक्षण करून विविध आजारावरील नैसर्गिक उपचार पद्धतीची माहिती दिली डॉ. सीमा राणे यांनी शरीराची काळजी, दैनंदिन आहार, पुरेशी झोप न घेणे, वाढता ताण तणाव, तासंतास बैठक, एकाच ठिकाणी उभे राहून काम करण्याच्या कृतीमुळे आपण अनेक आजारांना निमंत्रण देत असतो ,त्यावरील उपाय म्हणजे स्वयंपाक घरातील अनेक घटकांचा वापर करून आजारांना दूर करता येऊ शकते त्यासाठी नैसर्गिक उपचार पद्धती कशी प्रभावी आहे व नैसर्गिक उपचारांमध्ये विविध औषधी वनस्पती यांचा उपयोग कसा करता येतो याची सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी निसर्गोपचार पद्धती अतिशय प्राचीन पद्धत असल्याचे सांगितले तसेच त्यांनी निरामय आरोग्य केंद्राच्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले .महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे यांनी आरोग्य जागृती शिबिराचे महत्त्व सांगितले तर डॉ. मनीष सोनवणे यांनी या उपक्रमाबद्दल संयोजन समितीचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक निरामय आरोग्य केंद्राच्या संचालिका डॉ. भारती खेळणार केले तर, डॉ. अतुल वाघ यांनी सूत्रसंचालन तर प्रा. किरण शेळके यांनी आभार मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. डी. यु. अहिरे, प्रा निलेश माळी यांनी परिश्रम घेतले या शिबिरात एकूण २०० हून अधिक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

10/1

# मसगाचे राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीराचा समारोप



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर, संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव कॅम्प मालेगाव, राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे दिनांक १ जानेवारी ते ७ जानेवारी २०२२ या कालावधीत विशेष हिवाळी शिबिर लेंढाणे या दत्तक गावी तालुका मालेगाव येथे संपन्न झाले. या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावासाठी उपयुक्त असे विविध उपक्रम आयोजित केले. या उपक्रमात स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, नेत्र तपासणी शिबिर, सावित्रीच्या लेकी आदर्श माता सत्कार, रक्तदान शिबिर, स्मशान भूमी ची स्वच्छता, रस्ता दुरुस्ती शाळेचे,मैदान तयार केले. वरील सत्रात विविध विषयांवर तज्ञ व्यक्तींचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यात श्री राजेंद्र दिघे, प्रा डॉ .संजय खैरनार, धुळे, श्री.सुधाकर पवार धुळे, प्रा डॉ बबन सोनवणे, भारती खैरनार, अशा विविध तज्ञांनी सेवकांसाठी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले. पथनाट्य व करमणुकीचे कार्यक्रममाचे आयोजन करण्यात आले होते.

या सात दिवशीय शिबिराच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर मनमाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, म.स.गा. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ मनीष सोनवणे, लेंडाणे गावच्या सरपंच सौ. नीलिमा अहिरे उपसरपंच नंदकिशोर काशीद पोलीस पाटील लंकेश म्हसदे सामाजिक कार्यकर्ते ह भ प अशोकराव बाबा उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री बरेलीकर ग्रामसेवक वसावे व ग्रामस्थ स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वरील विविध उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉक्टर दिखाव कर डॉक्टर सुभाष निकम सर्व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. आचारी डॉक्टर चंद्रकांत देगावकर यांनी आपल्या मनोग तात स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले व जीवनात यशस्वी व्हा अशी सदिच्छा व्यक्त केली. तर प्राचार्य डॉक्टर सुभाष निकम यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात युवा पिढी वाईट मार्गाकडे चालली आहे संस्कार राहिले नाहीत वडीलधाऱ्यांचा आदर्श बाळगा असा मोलाचा सल्ला दिला.

तसेच यापुढेही असेच उपक्रम राबवून गावाचा विकास करावा असा आग्रह केला तसेच गावा तील सर्व नागरिकांनी शिबिरा च्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

या समारंभ प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अर्जुन नेरकर यांनी केले तर आभार प्रा.डॉ. चंद्रसिंग राजपूत यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन प्राध्यापिका वैशाली साळुंखे यांनी केले गावा-तील नागरिक व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून समाधान व्यक्त केले.

सकाळ

# देशाच्या विकासासाठी संस्कारक्षम युवकांची गरज

## प्राचार्य डॉ. दिघावकर : आजच्या युवकांनी संस्कार, संस्कृती जपणे महत्त्वाचे



पेज ३

शनिवार, दि.६ जानेवारी २०२४

# मसगा महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**मालेगाव ।**

म.स.गा. कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या हस्ते विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, आर. एच. शेलार, जयवंत कठ्यारे, वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व काबरा महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्राध्यापिका सारिका हिरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात स्त्री शिक्षणा संदर्भात सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. सावित्रीबाई फुले यांनी प्रस्थापित पुरुष प्रधान संस्कृतीच्या विरुद्ध जाऊन महिलांना शैक्षणिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी अविरत प्रयत्न केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सक्षम पाठिंब्यामुळे सावित्रीबाईंनी मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरू केले. तत्कालीन उच्चभ्रू समाजाच्या लोकांनी सावित्रीबाईंना प्रचंड विरोध केला. परंतु हा विरोध झुगारून सावित्रीबाईंनी मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प सत्यात उतरविला हे ज्ञानाचे क्रांतिकारक कार्य सावित्रीबाईंनी केली म्हणून त्यांना ज्ञानज्योती तसेच क्रांतीज्योती म्हणून संबोधले जाते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिघावकर सरांनी अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाई फुले यांच्या विषयी आपले विचार व्यक्त केले. सावित्रीबाई फुले यांनी ज्ञानदानाच्या कामाबरोबरच अनाथ मुलांसाठी अनाथ आश्रम चालविला व अनाथ आश्रमातील यशवंत नावाच्या मुलाला शिकवून डॉक्टर केले. तसेच यशवंत आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात प्लेगच्या साथीदरम्यान मोठ्या प्रमाणात रुग्ण सेवा केली. याच दरम्यान सावित्रीबाईंना प्लेग आगाजराची लागण झाली व यात त्यांना आपल्या जीवनाचे बलिदान द्यावे लागले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एन. ए. डोखे यांनी मानले.

सायं. दैनिक
मोक्षिणी वार्ता

# देशाच्या विकासासाठी सक्षम युवकांची गरज- प्राचार्य दिघावकर



मालेगाव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय योजना श्रम संस्कार शिबिराचे लेंडाणे गावी उद्घाटन संपन्न झाले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन गावच्या सरपंच नीलिमा अरुण अहिरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून गाव पातळी-वर कोणत्या कामाची अपेक्षा आहे यासंदर्भात प्रा. डॉ .डी एन सोनवणे यांनी सविस्तर माहिती दिली. अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिखावकर म्हणा-ले की या स्वयंसेवकांच्या हातात देशाचे भवितव्य आहे. शिबिराचे ब्रीदवाक्य आहे लोकसंख्या नियंत्रण जागृती यासंदर्भात युवकांची फार मोलाची जबाबदारी आहे. गावा चा देशाचा विकास करायचा असेल तर लोकसंख्या नियंत्रण करणे गरजेचे आहे. युवकांनी ध्यास घेतला तर ग्राम आणि शहर विकास होणार आहे. हे सगळं करत असताना आजच्या युवकांनी संस्कार त्यांनी संस्कृती जपणं ही तेवढेच महत्त्वाचे आहे असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

सदर उद्घाटन प्रसंगी उप प्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, सरपंच सौ नीलिमा अहिरे, अरुण अहिरे, उपसरपंच नंदकिशोर काशीद, पोलीस पाटील लंकेश म्हसदे, माजी सरपंच श्री कारभारी भीमराव काशीद, माजी चेअरमन अरुण अहिरे, मुख्याध्यापक बरलीकर, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन दिलीप अहिरे, समाज कार्यकर्ता हिम्मत सोनवणे, माजी सरपंच मच्छिंद्र जगताप, शिवाजी दगडू सोनवणे, व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्र संचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्जुन नेरकर यांनी केले तर आभार डॉ. चंद्रसिंग राजपूत यांनी मानले

सायं.दैनिक
मोक्षिणी वार्ता

# देशाच्या विकासासाठी सक्षम युवकांची गरज- प्राचार्य दिघावकर




मालेगाव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय योजना श्रम संस्कार शिबिराचे लेंडाणे गावी उद्घाटन संपन्न झाले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन गावच्या सरपंच नीलिमा अरुण अहिरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून गाव पातळी- वर कोणत्या कामाची अपेक्षा आहे यासंदर्भात प्रा. डॉ .डी एन सोनवणे यांनी सविस्तर माहिती दिली. अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिखावकर म्हणा- ले की या स्वयंसेवकांच्या हातात देशाचे भवितव्य आहे. शिबिराचे ब्रीदवाक्य आहे लोकसंख्या नियंत्रण जागृती यासंदर्भात युवकांची फार मोलाची जबाबदारी आहे. गावा चा देशाचा विकास करायचा असेल तर लोकसंख्या नियंत्रण करणे गरजेचे आहे. युवकांनी ध्यास घेतला तर ग्राम आणि शहर विकास होणार आहे. हे सगळं करत असताना आजच्या युवकांनी संस्कार त्यांनी संस्कृती जपणं ही तेवढेच महत्त्वाचे आहे असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

सदर उद्घाटन प्रसंगी उप प्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, सरपंच सौ नीलिमा अहिरे, अरुण अहिरे, उपसरपंच नंदकिशोर काशीद, पोलीस पाटील लंकेश म्हसदे, माजी सरपंच श्री कारभारी भीमराव काशीद, माजी चेअरमन अरुण अहिरे, मुख्याध्यापक बरलीकर, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन दिलीप अहिरे, समाज कार्यकर्ता हिम्मत सोनवणे, माजी सरपंच मच्छिंद्र जगताप, शिवाजी दगडू सोनवणे, व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्र संचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्जुन नेरकर यांनी केले तर आभार डॉ. चंद्रसिंग राजपूत यांनी मानले

# मसगा कॉलेजात रेणूका आजी हिरे जयंती निमित्त अभिवादन



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे दिनांक ३०/१२/२०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुका आजी हिरे यांची ११६ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य दिघावकर यांच्या हस्ते रेणुका आजी यांच्या प्रतिमेस व समाधी स्थळाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले , त्यानंतर महाविद्यालयात महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांनी रेणुका आजी यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना सांगितले की आर्जी-चे कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या संपूर्ण जीवन प्रवासात मोलाचा सहभाग होता त्याच प्रमाणे संस्थेच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे सहकार्य होते. तर अध्यक्षीय मनोग तात प्राचार्य दिघावकर यांनी आजींचा जीवनातील महत्त्वाचे प्रसंग उलगडून सांगितले याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल सावळे उपप्राचार्य प्रा. डॉ. मनीष सोनवणे शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. नरेंद्र डोखे, प्रा चेतन येवले यांनी परिश्रम घेतले.

16/12

21/12

# एमएसजी महाविद्यालयास 'नॅक'कडून अ+ मानांकन

लोकनामा प्रतिनिधी

**मालेगाव कॅम्प** : महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगाव संचलित येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून (नॅक) अ+ (३.२६) मानांकन मिळाले आहे. याबाबतचे पत्र शुक्रवारी, ८ डिसेंबर २०२३ ला महाविद्यालयास प्राप्त झाले, अशा प्रकारे नॅककडून अ+ मानांकन प्राप्त करणाऱ्या देशातील मोजक्याच महाविद्यालयापैकी महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय एक ठरले आहे.




नॅक समितीने १९ व २० ऑक्टोबरला दोन दिवस महाविद्यालयाशी संबंधित विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रशासकीय कर्मचारी व संस्थेचे प्रतिनिधी तसेच इतर घटकांबरोबर संवाद साधला व महाविद्यालयाविषयी त्यांच्या अपेक्षा व मते जाणून घेतली. त्याचबरोबर महाविद्यालयातील आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा, महाविद्यालयात सुरू असलेले रिसर्च वर्क, प्रयोगशाळा, ग्रंथालय, जिमखाना, परीक्षा विभाग, निरामय आरोग्य केंद्र कार्यालय, तांत्रिक सुविधा, इंटरनेट सुविधा त्याचबरोबर महाविद्यालयात सुरू असलेल्या विद्यार्थिकेंद्रित विविध योजना यांसारख्या अत्यंत सूक्ष्म बाबींची शहानिशा करून महाविद्यालयाचे मूल्यांकन केले. या दोन दिवसांत महाविद्यालयाचे निरीक्षण, परीक्षण करून केलेला गोपनीय अहवाल बंगरूळच्या नॅक कार्यालयात सादर केला, त्यानुसार महाविद्यालयाच्या गुणवत्तेविषयी प्राप्त गुणांकानुसार अ + श्रेणी मिळाली आहे.

महाविद्यालयास नॅक अ + मानांकन मिळाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा पुष्पाताई हिरे, जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांतदादा हिरे, कोशाध्यक्षा डॉ. स्मिताताई हिरे, समन्वयक मा.आ.डॉ. अपूर्वभाऊ हिरे, डॉ. अद्वयआबा हिरे पाटील, जनसंपर्क विभागप्रमुख डॉ. संपदादीदी हिरे, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. हरिष आडके, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, विश्वस्त प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे व इतर पदाधिकाऱ्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल जावळे, डॉ. मनीष सोनवणे, नॅक कोऑर्डिनेटर डॉ. कल्याण कोकणे, आयक्यूएसी कोऑर्डिनेटर प्रा. सईद अन्सारी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, संपूर्ण नॅक टीम व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

8/12

9/12

# मसगा महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**मालेगांव ।**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे दि.०६ डिसेंबर २०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रा एन.डी. पगार यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी त्यांनी सांगितले की, डॉ . बाबासाहेब आंबेडकर हे सर्वसामान्य वंचित, उपेक्षित, शोषित माणसांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील करून घेणारे, महामानव होते, अतिशय प्रतिकुल परिस्थीत शिक्षण घेत त्यांनी आपल्या देशातील वंचित ,गरीब समाजा साठी कार्य केले. तर अध्यक्षीय मनोगतात डॉ. दिघावकर यांनी सांगितले की डॉ. आंबेडकर यांनी प्रज्ञा, शिल, व करुणा या वर काम करताना समजातील अंधार ,अज्ञान व अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम केले. शिका लढा व संघटीत व्हावा हा विचार त्यांनी देशातील वंचित समाजापुढे ठेवला . स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्रस्थापित करून सामाजिक न्यायाची स्थापना करणारे, विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ आणि बुद्धिवादाचा स्वीकार करणारे होते. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे शैक्षणिक समन्वयक प्रा.डॉ. प्रविन पाटील, कुलसचिव श्री रघुनाथ शेलार कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. बी.एम सोनवणे यांनी केले.

झाडे लावा झाडे जगवा

## ात संविधान ण गौरव परीक्षा



# मसगा कॉलेजात डॉ. बाबासाहेबांना महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे दि.०६ डिसेंबर २०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा एन.डी. पगार यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी त्यांनी सांगितले की, डॉ . बाबासाहेब आंबेडकर हे सर्वसामान्य वंचित, उपेक्षित, शोषित माणसांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील करून घेणारे, महामानव होते, अतिशय प्रतिकुल परिस्थीत शिक्षण घेत त्यांनी आपल्या देशातील वंचित, गरीब समाजा साठी कार्य केले. तर अध्यक्षीय मनोगतात डॉ. दिघावकर यांनी सांगितले की डॉ. आंबेडकर यांनी प्रज्ञा, शिल, व करुणा या वर काम करताना समजातील अंधार, अज्ञान व अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम केले. शिका लढा व संघटीत व्हावा हा विचार त्यांनी देशातील वंचित समाजापुढे ठेवला . स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्रस्थापित करून सामाजिक न्यायाची स्थापना करणारे, विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ आणि बुद्धिवादाचा स्वीकार करणारे होते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे शैक्षणिक समन्वयक प्रा.डॉ. प्रविन पाटील, कुलसचिव श्री रघुनाथ शेलार कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविदयालयातील सर्व प्राध्यापक बंधु भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. बी.एम सोनवणे यांनी केले.

# समाजात संविधानिक मुल्य रुजवणे ही काळाची गरज :डॉ. जयवंत कट्यारे

**मालेगांव ।**

मसगा महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून प्रा. एन. डी. पगार यांच्या सोबत भारतीय राज्यघटनेच्या सरनामाचे सामुहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कटारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. ब्रिटिशांच्या जोखडातून भारताला स्वातंत्र्य मि ळाल्यानंतर देशात संविधान निर्माण करण्यासाठी संविधान सभेची स्थापना करण्यात आली. पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी, मौलाना अबुल कलाम आझाद, आदी. मान्यवर संविधान सभेचे सदस्य होते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. डॉ. आंबेडकरांनी जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करून भारतीयांसाठी सर्वो त्तम अशा संविधानाची निर्मिती केली म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे संबोधले जाते. भारतीयांसाठी विधानाची निर्मिती २६ नोव्हेंबर १९४९ पूर्ण झाली. या दिनाचे औचित्य साधून सन २०१५ पासून शासनाने २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. संविधानामुळे भारतातील विविध जाती-धर्मातील लोकांना समान न्याय, समान हक्क व समान कर्तव्य प्राप्त झाले आहेत. संविधानामुळे देशातील विविध जाती-धर्मांच्या लोकांना एकत्र जोडण्याचे बहुमूल्य काम केले जाते. संविधानिक मूल्य समाजामध्ये रुजवणे ही आता काळाची गरज आहे. असे विचार कटारे यांनी आपल्या व्याख्यानात व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रतिभा पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिक्य ठाकरे, प्रा. रविंद्र मोरे, डॉ. कुणाल वाघ, वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व अध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सी. डी. राजपूत यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अशोक वाघचौरे यांनी केले.

# मसगा महाविद्यालयाचे यश



मालेगांव कॅम्प:-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने विद्यापीठ स्तरीय केंद्रीय युवा महोत्सवात मसगा महाविद्यालयातील संघाला घवघवीत यश मिळाले. ही स्पर्धा संगमनेर येथे आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत नाशिक, अहमदनगर, पुणे शहर व पुणे ग्रामीण मधून प्रत्येकी तीन जिल्हा स्तरीय विजेता संघ सहभागी झाले होते. विद्यापीठ स्तरावर अत्यंत अटीतटीच्या स्पर्धेत महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे नऊ स्पर्धक सात कलाप्रकारांमध्ये सहभागी झाले होते त्यात रांगोळी व कात्रण कला स्पर्धेत कल्याणी रवींद्र बागुल हिने प्रथम, प्रसाद शंकर महाजन (भारतीय ताल वाद्य) यात प्रथम, कुंदन विशाल ठाकूर (भारतीय स्वर वाद्य) यात प्रथम तर समूह गान भारतीय या स्पर्धेत मसगा महाविद्यालयीन संघ (विनय प्रजापत ,हर्षल बेडेकर, महिमा जाधव, सायली बागुल , कुंदन ठाकूर, प्रसाद महाजन, ओम जाधव) यांनी तृतीय पारितोषिक पटकावले.

तसेच नाशिक जिल्हा पातळीवर उपविजेता संघ आणि पुणे विद्यापीठ स्तरावर विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन महाविद्यालयाचे नावलौकिक केले सर्व विद्यार्थ्यांना डॉ. डी. बी. सोनवणे, डॉ. सी.एम. निकम, डॉ.राज त्रिभुवन, डॉ.ए.जी .नेरकर , पोफळे मॅडम यांचे बहु मोल मार्गदर्शन लाभले यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी .जी दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्मा.

कार्यालयांमध्ये वास्तव्यात स्वतंत्र कक्ष स्थापन सदस्य असणार आहेत.

– प्रभाकर वारुळे, मालेगाव

# मेरी माटी मेरा देश– आझादी का अमृत महोत्सव उपक्रम यशस्वी

मालेगाव । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत वरील एक अत्यंत स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला. राजेश पांडे, डॉ संजय चाकणे, डॉ. सदानंद भोसले सर या सर्वांच्या अतीव परिश्रमातून हा कार्यक्रम उत्तम तऱ्हेने संपन्न झाला. सर्व महाराष्ट्र तसेच इतर विद्यापीठे यातील राष्ट्रीय सेवा अधिकारी, स्वयंसेवक संघ या सर्वांच्या नवी दिल्ली येथील उपस्थितीने या कार्यक्रमाला चार चाँद लागले मेरी माटी मेरा देश या नावातच स्वतः च्या देशाबद्दलचे प्रेम दिसून येत आहे ज्या देशात माझा जन्म झाला.आपण भारताचे नागरिक आहोत. त्या बद्दलची कृतज्ञता दाखविण्यासाठी माझी भूमिका काय असावी याचे आकलनही झाले. माझ्या देशातील मातीपासून माझे पोषण झाले आहे त्यासाठी माझ्या देशा- तील मातीच्या प्रत्येक कणा बद्दल मला आदर, प्रेम वाटले पाहिजे, ती माती कशी जतन करावी याबद्दल मी सतत विचार केला पाहिजे, माझ्या देशा- तील मातीच्या प्रत्येक कणाचे संगोपन, संवर्धन करण्यासाठी मी काय केले पाहिजे याचे विचारमंथन मी केले पाहिजे. माझ्या बरोबर इतरांनाही त्याची जाणीव करून दिली तरच या उपक्रमाअंतर्गत घेतलेल्या श्रमाचे चीज होईल. देशा- तील सर्वांनाच या कार्यक्रमाचे आवाहन केले होते. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे ही मातीच आपली पॉलिसी आहे.

या आवाहनाला भरघोस प्रतिसाद मिळाला. देशातील अनेक राष्ट्रीतून ८५००० हजार मातीचा अमृतकलश कार्यक्रमात अर्पण केले. अमृत वाटिका बनविण्यात मोलाचा वाटा दिला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत जवळ जवळ १३०० जनसमुदाय विविध भटातून, महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजना विभागातून, विद्यापीठातून ३१ ऑक्टोबर २३ रोजी झालेल्या समारोपाच्या कार्यक्रमात दिल्ली येथे सहभागी झाले. महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव महाविद्यालयाच्या १ कार्यक्रम अधिकारी व २ स्वयंसेवक, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय पंचवटी नाशिक येथील २ कार्यक्रमाधिकारी व ८ स्वयंसेवक, समाजश्री प्रशांत दादा हिरे महाविद्यालय नामपुर येथील १ कार्यक्रमाधिकारी व ३ स्वयंसेवक, कर्मवीर भाऊसाहेब हिरे महाविद्यालय निमगाव येथील २ स्वयंसेवक, कला व वाणिज्य महाविद्यालय देवळा येथील १ कार्यक्रमाधिकारी व २ स्वयंसेवक, सहभागी होते. पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी देशाला या उपक्रमाचे महत्त्व समजावून दिले. देशातील सर्व लोकांना विकसित देशासाठी आवाहन केले. सर्वांचा उत्कृष्ट सहभाग व देशाविषयीचा अभिमान दिसून आला २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर२३ या ५ दिवसाच्या कालावधीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे इथून स्वतंत्र रेल्वेचे आरक्षण करण्यात आले असून या रेल्वेत पुणे विद्यापीठ, कोल्हापुर विद्या- पीठ, सोलापूर विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठ, जळगाव विद्यापीठ नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा व कार्यक्रमाधिकाऱ्यांचा समावेश होता. तर मुंबई येथून स्वतंत्र रेल्वेचे आरक्षण करण्यात आले होते. यात बॉम्बे विद्यापीठ कोकण ठाणे कल्याण इत्यादी स्वयंसेवकांसाठी आरक्षित होते. या दोन्ही आरक्षित



रेल्वेमध्ये भोजनासह सर्व सोय आयोजकांनी केलेली होती. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे भोजन व निवास व्यवस्था अत्यंत उत्कृष्ट रीतीने केलेली होती. २० ते २५ हजारांच्या जमावाची व्यवस्था करणे इतके सोपे काम नाहीच परंतु सर्वांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी संयोजक पराकाष्ठा करीत होते. प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी स्वतंत्र वैद्यकीय सुविधा उप- लब्ध करण्यात आलेली होती. त्याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक, आभार व धन्यवाद. विविध घटातून आलेल्या लोकांची राजधानी दिल्ली पाहण्याची अंतरीक इच्छाही संयोजकांनी पूर्ण केली. आपल्याला असलेल्या सीमित वेळामधून वेळ देऊन त्यांनी सर्वांना दिल्लीतील प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्याची अनुमती दिली त्यामुळे लाल किल्ला, राजघाट, दर्गा, इंडिया गेट, चांदणी चौक, सरोजिनी मार्केट अशा प्रसिद्ध ठिकाणी भेट देण्याचे भाग्य सहभागी सर्वांना लाभले. पुणे ते दिल्ली हा प्रवास खास रेल्वे केल्यामुळे व पुणे विद्यापीठ हे यजमान विद्यापीठ असल्यामुळे सर्व सहभागी लोकांची आणण्याची व पोहचविण्याची जबाबदारी असल्यामुळे थोडा प्रवास लांबला पण सर्व लोक हव्या त्याठिकाणी सुखरूप पोहोचले. या सर्व कार्यक्रमाची आठवण म्हणून पांडे सरांनी सर्वांची चौकशी करून सर्वांना मोमेंटो व आम्राचा पेढा देऊन आभार मानले.

दै.शहर समाचार

# मसगा महाविदयालयात भष्ट्राचार निर्मूलन विषयक वकृत्व स्पर्धा संपन्न



मालेगांव कॅम्प:-३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत भ्रष्टाचार मुक्ती व दक्षता जनजागृती सप्ताहाचे सर्वत्र आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प व भ्रष्टाचार विरोधी (अँटी करप्शन) विभाग नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना याची माहिती व्हावी यासाठी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.अनिल बडगुजर डी वाय एस पी नासिक व श्री.विश्वजीत जाधव डी.वाय.एस. पी .अँटी करप्शन विभाग नाशिक हे उपस्थित होते. या वकृत्व स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना भ्रष्टाचार मुक्ती व माझी भूमिका हा विषय देण्यात आला होता यावेळी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण व निर्भीड पणे या विषयावर आपले मते मांडली.

या स्पर्धेवेळी प्रास्ताविक श्री अनिल बडगुजर यांनी केले यात त्यांनी भ्रष्टाचार मुक्ती व दक्षता जनजागृती सप्ताह आयोजन करण्यासंदर्भात पार्श्व भूमी स्पष्ट केली तर अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य.डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत भ्रष्टाचार मुक्ती विषयक समाजाची काय भूमिका असावी याविषयी विवेचन केले .स्पर्धे साठी परिक्षक म्हणून प्रा. लिना पगारे यांनी काम बघितले ,या स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी तर आभार श्री विश्वजीत जाधव यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे,शैक्षणिक समन्वयक डॉ.प्रवीण पाटील यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा. कुलदीप पडियार व प्रा. डॉ. डी. बी.सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सकाळ

# मसगा महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

▸ सकाळ वृत्तसेवा

मालेगाव शहर, ता. ५ : मसगा महाविद्यालय आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संयुक्त विद्यमाने वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर होते. यावेळी प्रमुख अतिथी पोलिस उपअधीक्षक अनिल बडगुजर, विश्वजित जाधव उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना भ्रष्टाचार मुक्ती व माझी भूमिका हा विषय होता. प्रास्ताविक श्री. बडगुजर यांनी केले स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून प्रा. लीना पगारे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी तर आभार श्री विश्वजीत जाधव यांनी मानले. उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा. कुलदीप पडियार व प्रा.डी. बी.सोनवणे यांनी पुढाकार घेतला.

Nashik, Malegaon
06/11/2023 Page No. 3

सकाळ



**मालेगाव शहर :** येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या समाधिस्थळी स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर व शिक्षक.

# कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**मालेगाव शहर, ता.६ :** महात्मा गांधी विद्यामंदिर आणि आदिवासी सेवा समितीचे संस्थापक, सहकार आणि शिक्षणमहर्षी, कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांची ६२ वी पुण्यतिथीनिमित्त महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी कर्मवीरांच्या समाधिस्थळी व पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.

प्रा. एन. डी. पगार यांनी कर्मवीरांच्या कर्तृत्वाचा आढावा घेताना सांगितले, की त्यांनी गोरगरीब जनतेसाठी शिक्षणाची गंगा आदिवासी भागात तसेच खेड्यापाड्यां कशी पोहचेल यावर जास्त काम केले. गरीब जनता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात कशी येईल त्यासाठी त्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांची तळमळ याविषयी त्यांनी माहिती दिली. वंचित दुर्लक्षित वर्गात शिक्षणाची ज्योत आदिवासी सेवा समितीच्या माध्यमातून पेटवून त्यांनी आदिवासी समाजामध्ये शिक्षण विषयक जागृती घडून आणली असे विचार व्यक्त करत कर्मवीरांना अभिवादन करण्यात आले.

डॉ. बी. एम. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, समन्वयक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, अजिंक्य ठाकरे यांच्यासह वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Nashik, Malegaon
07/11/2023 Page No. 4

# मसगा महाविद्यालयात आरोग्याबाबत व्याख्यान



**मालेगाव ।** येथील मसगा महाविद्यालयात समाजश्री प्रशांत हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. संदीप खैरनार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सी.जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने सेवानिवृत्त कर्मचारी तथा कार्यरत कर्मचारी यांच्यासाठी आरोग्य शिबिर व आरोग्याची काळजीसाठी डॉ. खैरनार यांचे व्याख्यान झाले. यावेळी बोलतांना डॉ. संदीप खैरनार यांनी दैनंदिन जीवनात उत्तम आरोग्यासाठी नेहमीच व्यायाम व योग्य आहार घेणे महत्त्वाचे आहे तसेच पूर्वीचे जीवन व आताचे जीवन मानात फरक झाला आहे, जीवनशैली बदलली जवळपास सर्वांनाच मधुमेह आजार हौण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत कशी काळजी घेता येईल यावर मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम यांनी आपल्या अवती-भवतीच्या औषधी वनस्पतींचे महत्व स्पष्ट केले. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन प्रा. मिलिंद पवार यांनी तर प्रस्तावना पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे यांनी केली. प्रा. हेमराज भामरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. अभिजीत पाटील, प्रा. अशोक खांडेकर, प्रा. हितेश पवार यांनी परिश्रम घेतले. यावेळी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यायालयातील बहुसंख्य प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

21/10

12/10

सकाळ

# मूल्यवर्धित अभ्यासक्रमामुळे मूल्यांची जोपासना

## डॉ. हिरामण क्षीरसागर : 'मसगा' महाविद्यालयात अभ्यासक्रमाची सुरवात

▸ **सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव शहर, ता. १० : आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी मानवी मूल्ये जोपासली व वाढवली पाहिजेत, त्याशिवाय कौशल्ये विकसित करता येत नाहीत. कौशल्ये नसलेली व्यक्ती आजच्या स्पर्धेच्या युगात टिकू शकत नाही. अशा मूल्यवर्धित अभ्यासक्रमामुळे मानवी मूल्यांची जोपासना होत असल्याचे प्रतिपादन सोयगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिरामण क्षीरसागर यांनी केले.

मसगा महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाद्वारे 'ॲडव्हान्स बँकिंग एनवोर्मेन्ट' हा मूल्यवर्धित अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य चंद्रकांत दिघावकर अध्यक्षस्थानी होते. डॉ क्षीरसागर म्हणाले, 'ॲडव्हान्स बँकिंग एनवोर्मेन्ट' या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशातल्या सार्वजनिक व खासगी क्षेत्रातल्या वित्तीय संस्थांमध्ये व बँकांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. मसगा महाविद्यालयाने अर्थशास्त्र विभागामार्फत पदवी व पदव्युत्तर वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे.



**मालेगाव शहर : येथील मसगा महाविद्यालयात मूल्यवर्धित अभ्यासक्रम उद्घाटन समारंभात बोलताना सोयगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिरामण क्षीरसागर. शेजारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर आदी.**

प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांपुढे संधी आणि आव्हाने या अनुषंगाने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांकडून मोठे आव्हान निर्माण होत असल्याचे सांगितले. संगणकशास्त्र, अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेले अनेक युवक - युवती आता वित्तीय क्षेत्राकडे वळू लागलेले आहेत. आयबीपीएस तसेच इतर वित्तीय क्षेत्रातील स्पर्धात्मक परीक्षेच्या माध्यमातून हे व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी यशस्वी होताना दिसत आहेत.

मंचावर उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. डी. एन. सोनवणे, डॉ. एस. पी. देवरे, डॉ. आर. के. जाधव, मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा. तेजस बागडे, प्रा. अमोल गरुड, सोयगाव महाविद्यालयाचे प्रा. जयवंत पवार उपस्थित होते.

प्राध्यापक व पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. सोनवणे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. रामेश्वर पवार यांनी आभार मानले.

# मूल्यवर्धित अभ्यासक्रमामुळे मानवी मूल्यांची जोपासना होते–प्राचार्य.डॉ.एच.एम.क्षिरसागर

मालेगाव:–मसगा महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाद्वारे ॲडव्हान्स बँकिंग एनवोर्मेन्ट हा मूल्यवर्धित अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या उद्घाटन समारंभा प्रसंगी उद्घाटक म्हणून उपस्थित असलेले मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सोयगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



एच. एम. क्षिरसागर त्यांनी आपल्या मनोगतात वरील उद्गार व्यक्त केले.

उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. क्षीरसागर यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी मानवी मूल्य जोपासली व वाढवली पाहिजेत त्याशिवाय कौशल्य विकसित करता येत नाहीत. कौशल्य नसलेली व्यक्ती आजच्या स्पर्धेच्या युगात टिकू शकत नाही. ॲडव्हान्स बँकिंग एनवोर्मेन्ट या मूल्य वर्धित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशातल्या सार्वजनिक व खासगी क्षेत्रातल्या वित्तीय संस्थांमध्ये व बँकांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. मसगा महाविद्यालयाने अर्थशास्त्र विभागामार्फत पदवी व पदव्युत्तर वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. असे गौरवपूर्ण मनोगत प्राचार्य डॉ. शिरसागर यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात मसगा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांपुढे संधी व आव्हाने या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

त्यांनी आपल्या मनोगतात कला, वाणिज्य व विज्ञान या पारंपरिक विद्याशाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांकडून मोठे आव्हान निर्माण होत असल्याचे सांगितले. संगणक शास्त्र, अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेले अनेक युवक - युवती आता वित्तीय क्षेत्राकडे वळू लागलेले आहेत. आय.बी.पी.एस. तसेच इतर वित्तीय क्षेत्रातील स्पर्धात्मक परीक्षेच्या माध्यमातुन हे व्यवसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी यशस्वी होताना दिसत आहेत. कला व वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थ्यांपुढे हे मोठे आव्हान आहे. विद्यार्थ्यांनी हे आव्हान ओळखून मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आपले कौशल्य व क्षमता सिद्ध करावी. असे मार्गदर्शन अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. दिघावकर सरांनी व्यक्त केले.

या प्रसंगी विचार मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनिष सोनवणे, डॉ. अनिल सावळे, डॉ. प्रविण पाटील, डॉ. डी.एन.सोनवणे, डॉ. एस.पी.देवरे, डॉ. आर. के. जाधव, मूल्यवर्धित अभ्यास क्रमाचे समन्वयक प्रा. तेजस बागडे, प्रा. अमोल गरुड सोयगाव महाविद्यालयाचे प्रा. जयवंत पवार हे उपस्थित होते. उद्घाटन समारंभाला महाविद्यालयातील प्राध्यापक व पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. रामेश्वर पवार यांनी केले.

## । आहे?

करून पूर्वजांना आदरपूर्वक निरोप दिला जातो. सर्वपित्री अमावस्या तिथीला केले जाणारे श्राद्ध कुटुंबातील सर्व पितरांच्या आत्म्यांना प्रसन्न करण्यासाठी पुरेसे असते, असे म्हटले जाते.

**सर्वपित्री अमावस्येला या लोकांचे श्राद्ध करा**

सर्वपित्री अमावस्येला, अमावस्या तिथी, पौर्णिमा तिथी आणि चतुर्दशी तिथीला मरण पावलेल्या कुटुंबातील सदस्यांसाठी श्राद्ध केले जाते. जर काही कारणास्तव त्याला मृत्यू तिथीला श्राद्ध करता येत नसेल तर केवळ अमावस्या तिथीलाच श्राद्ध करता येते. ज्या पितरांची मृत्यु तारीख माहित नाही. त्यांचे श्राद्धही अमावस्या तिथीला करता येते, म्हणूनच अमावस्या श्राद्धाला सर्वपित्री मोक्ष अमावस्या असेही म्हणतात.

## साथ सोडली

ी के.पी. मुनुसामी म्हणाले की,

मोहन:- मुंबई रिलीज ४ शो

# महाविद्यालयीन विकासास न्याक तपासणीमुळे मोठा हातभार-डॉ.कोकणे

मालेगांव :- नवीन शिक्षण पद्धतीला सामोरे जाताना नॅक तपासणीचे महत्व अधिकाधिक वाढत चालले असून या निमित्ताने महाविद्यालयीन कामकाजाचा सर्वांगीण विकास होत असल्याचे प्रतिपादन डॉ. कल्याण कोकणे यांनी केले.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे आयोजित आभासी चर्चासत्रामध्ये महाविद्यालयाच्या विकासात नॅकचे महत्व या विषयावर डॉ. कोकणे हे बोलत होते. कोणत्याही महाविद्यालयामध्ये या तपासणीच्या अंतर्गत होणारे मूल्यमापन हे त्या महाविद्यालयाच्या विकासामध्ये मोलाची भूमिका बजावत असते आणि त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने न्याकला सामोरे जाण्याची गरज आहे असेही ते पुढे म्हणाले.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक विकासाच्या वाटेवर पुढे सरकणारे उपयुक्त विकासकार्य नियमितपणे होत असल्याने येथील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला गुणवत्तापूर्वक पैलू पडत असतात असेही डॉ. कोकणे शेवटी म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे होते. त्यांनी या उपक्रमास आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख संयोजिका प्रा . डॉ.अनिता नेरे यांनी केले व या प्रास्ताविकात कार्यक्रमाची अनिवार्यता विशद केल. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. टी. एस. सावळे व डॉ. मनीष सोनवणे हे उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विनोद गोरवाडकर यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आला.

# मसगा महाविद्यालयात अविष्कार संशोधन स्पर्धेचे उद्घाटन



मालेगांव कॅम्प:- आजचा विद्यार्थी हा उद्याचा संशोधक असू शकतो विविध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीजागृत केल्यास त्यातून देशासाठी नवीन संशोधक व नवउद्योजक तयार होण्यास मदत होईल असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे अविष्कार संशोधन स्पर्धे च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्यामार्फत दरवर्षी या स्पर्धे चे आयोजन करण्यात येते शैक्षणिक संशोधक समन्वयक प्रा.डॉ. संदीप पठाडे यांनी प्रास्ताविकेतून विद्यापीठाची स्पर्धेसंबंधीची भूमिका स्पष्ट केली.

स्पर्धेसाठी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली समाज उपयोगी असे सात विभागातून विविध संशोधन संकल्पना सादर केल्या. स्पर्धेत ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत ४२ संशोधन प्रकल्प सादर केले अविष्कार स्पर्धेच्या निकषा नुसार १४ प्रकल्पाची जिल्हास्तरावर निवड करण्यात आलेली आहे. या स्पर्धेसाठी तज्ञ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. सुनील पाटील प्रा. डॉ.देवराम जाधव प्रा.डॉ.पंकज पवार प्रा.डॉ.व्ही.एस मिस्त्री, प्रा. यु.के. टेके प्रा.नंदकुमार माळी यांनी काम पाहिले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ.एन ,. बी. शिरसाठ यांनी मानले.

# आजचा विद्यार्थी हाच उद्याचा संशोधक- प्राचार्य दिघावकर



मालेगांव । आजचा विद्यार्थी हा उद्याचा संशोधक असू शकतो विविध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीजागृत केल्यास त्यातून देशासाठी नवीन संशोधक व नवउद्योजक तयार होण्यास मदत होईल असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी केले ,महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे अविष्कार संशोधन स्पर्धे च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्यामार्फत दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते शैक्षणिक संशोधक समन्वयक प्रा. डॉ. संदीप पठाडे यांनी प्रास्ताविकेतून विद्यापीठाची स्पर्धेसंबंधीची भूमिका स्पष्ट केली.स्पर्धे साठी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली समाज उपयोगी असे सात विभागातून विविध संशोधन संकल्पना सादर केल्या. स्पर्धेत ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत ४२ संशोधन प्रकल्प सादर केले अविष्कार स्पर्धेच्या निकषा नुसार १४ प्रकल्पाची जिल्हास्तरावर निवड करण्यात आलेली आहे या स्पर्धेसाठी तज्ञ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. सुनील पाटील प्रा. डॉ.देवराम जाधव प्रा. डॉ.पंकज पवार प्रा. डॉ.व्ही .एस मिस्त्री, प्रा. यु.. के टेके, प्रा नंदकुमार माळी यांनी काम पाहिले याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे शैक्षणिक समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नरेंद्र डोखे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. एन. बी. शिरसाठ यांनी मानले

३

# मसगा कॉलेजात म. गांधी व शास्त्रींना अभिवादन



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमा प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले, या वेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनिष सोनवणे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांची आज संपूर्ण देशाला गरज असून आज देखील आपल्या देशाची ओळख महात्मा गांधींमुळे आहे असे सांगताना दीडशे वर्ष ज्यांनी आपल्यावर राज्य केले त्यांना अहिंसेच्या मार्गाने महात्मा गांधींमुळे चालते व्हावे लागले. या वेळी एस वाय बीकॉम या वर्गाची विद्यार्थ्यांनी समीक्षा शिंदे हिने राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान स्वर्गीय लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत ला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रा. प्रफुल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, एम.सी.वी.सी विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, महाविद्यालयाचे कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे यांच्या सह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधु, भगिनी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ.बी. एम. सोनवणे यांनी केले.

# मसगा कॉलेजात स्वच्छता ही सेवा उपक्रम



मालेगांव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे स्वच्छता ही सेवा अंतर्गत श्रमदान कार्यक्रम महाविद्यालयीन परिसरात यशस्वी पणे राबविण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्याल यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व एनसीसी चे कॅडेट यांच्या मदतीने स्वच्छता ही सेवा श्रमदान कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. यात महाविद्यालयीन परिसराचे वेगवेगळे विभाग गटानुसार विभागणी करून स्वच्छता करण्यात आली. तसेच एनसीसी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कॉलेज गेटच्या बाहेर कॅम्प रोड लगत रस्त्याच्या दोन्ही कडा स्वच्छ करण्यात आल्या. हे श्रमदान यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उप प्राचार्य डॉ. अनिल सा–वळे, डॉ. मनिष सोनवणे, डॉ प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार, लेखापाल राजू निकम, कार्यक्रमाधिकारी डॉ. अर्जुन नेरकर, डॉ. चंद्रसिंग राजपूत, प्राध्यापिका वैशाली साळुंके, एन सी सी चे प्रा. सूर्यभान सांगळे, प्राध्यापिका बी.बी वाघमारे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल निकम, प्रा.रविंद्र मोरे आणि महाविद्यालयातील सर्व अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भाग घेऊन हा श्रमदान उपक्रम यशस्वीपणे राबविली.

३

# शाश्वत पर्यटनासाठी नागरिकांनी जबाबदार नागरीक म्हणून भूमिका पार पाडावी– डॉ.पवार



मालेगाव । येथील, महात्मा गांधी विद्या मंदिर संस्थेच्या म.स. गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. २७ सप्टेंबर २०२३ रोजी, एम. जी. व्ही. भूगोल अभ्यास मंडळ, आय. क्यू. ए. सी. व भूगोल विभागाद्वारे जागतिक पर्यटन दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन, महाविद्याल याचे प्राचार्य डॉ. सी. व्ही. दिघावकर यांच्या प्रेरणेतून करण्यात आले. या कार्यक्रमा साठी म. स. गा. महाविद्यालयातील भूगोल विभागातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. ए. डी. पवार हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. पवार यांनी सांगितले कि पर्यटकांना नवनवीन ठिकाणी जाऊन तेथील निसर्ग सौंदर्य अनुभवणे आणि लोकांचे राहणीमान संस्कृती जाणून घेणे आवडत असते, लोकांचा पर्यटन अनुभव वाढवणे आणि पर्यटनातून स्थानिकांना रोजगार मिळावा, स्थानिक विकास साधने अशा बाबी शक्य करण्यासाठी सर्वप्रथम लोकांना पर्यटनाचे महत्त्व माहीत असणे गरजेचे आहे, त्यानिमित्ताने पर्यटनाची जाणीव आणखी दृढ होण्यासाठी जागतिक पर्यटन दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेची स्थापना २७ सप्टेंबर १९७० रोजी झाली होती त्यामुळे २७ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगभरात जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो २७ सप्टेंबर १९८० रोजी पहिला जागतिक पर्यटन दिन साजरा केला गेला प्रत्येक वर्षी जागतिक स्तरावर पर्यटन विषयक एकरूप रेषा ठरवली जाते त्यानिमित्ताने एक प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून वर्षभर एक योजना आखली जाते त्या योजने–नुसार प्रत्येक देशाचे सरकार पर्यटन विषयक कृती अमलात आणत असते २०२२ साली पर्यटनाचा पुनर्विचार अशी रूपरेषा जाहीर केली होती यावर्षी पर्यटन व हरित गुंतवणूक ही रुपरेषा जाहीर केली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी अध्यक्षीय मनोगतात आपण पर्यटनाला चालना देण्या साठी, पर्यटन विकासासाठी जागतिक पातळीवरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी हातभार लावू शकतो असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. यू. पी. सूर्यवंशी यांनी केले व सूत्रसंचलन डॉ. सुनिल देवरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अनिल गायकवाड यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. अनिल सावळे व डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, विभागाचे विभाग प्रमुख सी. एम. निकम, भूगोल विभागाचे प्राध्यापक, महाविद्यालयातील विभाग प्रमुख, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

27/9

सकाळ

# 'मसगा' महाविद्यालयात 'रासेयो' दिनानिमित्त स्पर्धा

**मालेगाव शहर, ता. ३ :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त विविध स्पर्धा झाल्या. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धांचे आयोजन यशस्वीपणे करण्यात आले. रांगोळी स्पर्धा, पाककला, मेंदी स्पर्धा, मेरी माटी-मेरा देश आधारित भित्तिचित्र, सांस्कृतिक कार्यक्रम, वैयक्तिक नृत्य, सामुदायिक नृत्य, लोकसंख्येवर आधारित पथनाट्य, युवा संवादावर आधारित पथनाट्य अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. परीक्षक म्हणून डॉ. भारती खैरनार, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, डॉ. देवेंद्र सोनवणे यांनी गुणदान केले. प्रथम व द्वितीय विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. डॉ. अर्जुन नेरकर, डॉ. चंद्रसिंग राजपूत प्रा. वैशाली साळुंखे, कनिष्ठ विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी पंकज पाटील व कविता पाटील यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेऊन स्वयंसेवकांच्या माध्यमाने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.



**मालेगाव शहर : येथील 'मसगा' महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे व विविध स्पर्धांतील कलाकार.**

Nashik, Malegaon
04/10/2023 Page No. 4

# म.स.गा. विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा



मालेगाव । महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध स्पर्धांच्या आयोजनाने साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा प्रफुल्ल निकम, यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनाने विविध स्पर्धांचे आयोजन यशस्वीपणे राबविले. १. रांगोळी स्पर्धा २. पाककला ३. मेहंदी स्पर्धा ४. मेरी माटी मेरा देश आधारित भिंती चित्र ५. सांस्कृतिक कार्यक्रमात अ. वैयक्तिक नृत्य ब. सामुदायिक नृत्य क. लोकसंख्येवर आधारित पथनाट्य ड. युवा संवाद आधारित पथनाट्य. अशा वेगवेगळ्या स्पर्धांचा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. भारती खैरनार, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, डॉ. देवेंद्र सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना योग्य गुणदान देऊन परीक्षण केले. प्रथम व द्वितीय ये णारे विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यासाठी डॉ .अर्जुन नेरकर,डॉ. चंद्रसिंग राजपूत प्राध्यापिका वैशाली साळुंखे कनिष्ठ विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी पंकज पाटील व पाटील मॅडम यांनी विशेष परिश्रम घेऊन स्वयंसेवकांच्या माध्यमाने हा कार्यक्रम यशस्वीपणे साजरा केला.

24/9

# राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा



मालेगाव:-महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध स्पर्धांच्या आयोजनाने साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्राध्यापक प्रफुल निकम, यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनाने विविध स्पर्धांचे आयोजन यशस्वीपणे राबविले. १. रांगोळी स्पर्धा, २. पाक कला, ३. मेहंदी स्पर्धा, ४. मेरी माटी मेरा देश आधारित भिंती चित्र, ५. सांस्कृतिक कार्यक्रमात- अ. वैयक्तिक नृत्य, ब. सामुदायिक नृत्य, क. लोक संख्येवर आधारित पथनाट्य, ड. युवा संवाद आधारित पथनाट्य

अशा वेगवेगळ्या स्पर्धांचा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. भारती खैरनार, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, डॉ. देवेंद्र सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना योग्य गुणदान देऊन परीक्षण केले. प्रथम व द्वितीय येणारे विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यासाठी डॉ .अर्जुन नेरकर,डॉ. चंद्रसिंग राजपूत प्राध्यापिका वैशाली साळुंखे कनिष्ठ विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी पंकज पाटील व पाटील मॅडम यांनी विशेष परिश्रम घेऊन स्वयंसेवकांच्या माध्यमाने हा कार्यक्रम यशस्वीपणे साजरा केला.

24/9

मोक्षिणी वार्ता

# जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत मसगा कॉलेज उपविजयी



मालेगाव । बिटको महाविद्यालय नाशिक रोड या ठिकाणी झालेल्या अंतर महाविद्यालय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये मसगा महाविद्यालय मालेगाव च्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले आहे.

सदर स्पर्धेतून अन्सारी साद अंजुम व शेख इरफान अकील यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी नाशिक विभागाच्या संघात निवड झाली आहे. सदर खेळाडूला महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. संतोष जाधव व श्री संदीप कोडुलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाज डॉ. प्रशांत दादा हिरे, संस्थेचे समन्वयक मा. शिक्षक आमदार डॉ. अपूर्व हिरे, युवा नेते डॉ अद्वय हिरे पाटील, संस्थेच्या विश्वस्त तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख संपदा हिरे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. हरिष आडके सह सचिव डॉ. व्ही. एस. मोरे, व महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर उपप्राचार्य डॉ.मनिष सोनवणे डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील कुलसचिव रघुनाथ शेलार यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हास्तरीय अंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत मसगा महाविद्यालय उपविजयी



**नाशिक:–बिटको महाविद्यालय नाशिक रोड या ठिकाणी झालेल्या अंतर महाविद्यालय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये मसगा महाविद्यालय मालेगाव च्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत स्पर्धे चे उपविजेतेपद पटकावले आहे.**

सदर स्पर्धेतून अन्सारी साद अंजुम व शेख इरफान अकील यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धे साठी नाशिक विभागाच्या संघात निवड झाली आहे सदर खेळाडूला महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. संतोष जाधव व श्री संदीप कोडुलकर यांचे मार्गदर्शन लाभले. सदर खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाज श्री. डॉ. प्रशांत दादा हिरे, संस्थेचे समन्वयक मा. शिक्षक आमदार डॉ .अपूर्व हिरे, युवा नेते डॉ अद्वय हिरे पाटील, संस्थेच्या विश्वस्त तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख संपदा हिरे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.हरिष आडके सह सचिव डॉ. व्ही. एस. मोरे, व महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर उपप्राचार्य डॉ.मनिष सोनवणे डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील कुलसचिव श्री. रघुनाथ शेलार यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

दि.२१/९/२०२३

22/9

दै.शहर समाचार

# शोधामुळे संशोधकाची जिज्ञासा वाढते–डॉ.परदेशी



मालेगांव कॅम्प:-तीन सर्वात प्रभावी आणि सामान्य उद्दिष्टे म्हणजे अन्वेषण, वर्णन आणि स्पष्टीकरण. संशोधनामध्ये एखाद्या विषयाशी संशोधकाची ओळख करून देणे समाविष्ट असते. शोधामुळे संशोधकाची जिज्ञासा आणि चांगल्या प्रकारे समजून घेण्याची इच्छा पूर्ण होते. संशोधनाचा उद्देश म्हणजे काय ज्ञात आहे, काय नाही आणि आपण पुढे काय विकसित करू शकतो हे शोधणे हा आहे , असे उद्गार मा डॉ.जगदिश परदेशी यांनी रिसर्च मेथोडॉलॉजी या विषयावर व्याख्यान देतांना काढले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या हिंदी संशोधन केंद्र कडून आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी चांगल्या संशोधनाची वैशिष्ट्ये संशोधक विद्यार्थ्यांना समजावून सांगितले ते म्हणाले की पद्धतशीर, अनुभवजन्य, तार्किक, अनुकरणीय आणि वस्तुनिष्ठ या ३ मूलभूत टप्प्यांचा समावेश संशोधनात करण्यात आला आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा.डॉ.अनिल साळवे व डॉ.मनीष सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संशोधन केंद्र प्रमुख प्रो. डॉ.अनिता नेरे यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.व्ही.डी.सूर्यवंशी यांनी करून दिला .आभार संशोधक विद्यार्थी अखिलेश जैसल यांनी मानले .यावेळी हिंदी संशोधन केंद्राच्या शोधार्थींनी आपल्या संशोधन प्रक्रियेत येणाऱ्या अनेक प्रश्नांचे समाधान डॉ परदेशी यांचे कडून

21/9

# मसगात जागतिक ओझोन दिवस साजरा

मालेगाव । येथील, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या म स गा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. १६ सप्टेंबर २०२३ रोजी, एम जी व्ही भूगोल अभ्यास मंडळ, आय क्यू ए सी व भूगोल विभागाद्वारे जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी जी दिघावकर यांच्या प्रेरणेतून करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी म. स. गा. महाविद्यालयातील भूगोल विभागश्रतील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. यु पी सूर्यवंशी हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. सुर्यवंशी यांनी 'ओझोन' म्हणजे काय, तो कसा तयार होतो, त्याचे महत्त्व काय, त्याचा क्षय कशामुळे होतो, त्याला अपायकारक घटक कोणते, त्यामुळे पृथ्वीतलावर काय परिणाम होतात, तसेच 'ओझोनचे' संवर्धन कशा प्रकारे करता येईल, त्यात आपली भूमिका काय असावी याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी अध्यक्षीय मनोगतात आपण स्थानिक पातळीवर पर्यावरण संवर्धन करून जागतिक पातळी वरील समस्यांचे निराकरण करण्या साठी हातभार लावू शकतो असे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. ए.डी. पवार यांनी केले. प्रास्ताविक व प्रमुख वक्त्यांचा परिचय भूगोल विभागप्रमुख डॉ. सी. एम निकम यांनी केले तर आभार प्रदर्शन भूगोल विभागातील डॉ. सुनिल देवरे यांनी केले.



याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, भूगोल विभागाचे प्राध्यापक महाविद्यालयातील विभाग प्रमुख, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16/9

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# म.स.गा.महाविद्यालयात अमृत कलशाचे उद्घाटन



**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव । प्रतिनिधी :**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव कॅम्प मालेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना पार्क मध्ये महाराष्ट्र बँक चे रिजनल मॅनेजर श्रीराम भोर साहेब यांच्या शुभहस्ते मेरी माटी मेरा देश अंतर्गत अमृत कलशाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ. भारती खैरनार, डॉ.देवराम जाधव, डॉ. कल्याण कोकणे, यांच्या उपस्थितीत अमृत कलश याचे उद्घाटन करण्यात आले.

सदर प्रसंगी बँकेचे रिजनल मॅनेजर भोर साहेबांनी विद्यार्थ्यांना माननीय पंतप्रधान यांच्या योजनेचे महत्त्व पटवून दिले. आदरणीय प्राचार्यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कलशाचे मनापासून कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्यात. महाविद्यालयीन परिसरात तयार केलेल्या या अमृत कलशात तालुक्यातील संदीप महाविद्यालय झोडगे,सिटी कॉलेज मालेगाव,मराठा विद्या प्रसारक समाजाचे सोयगाव महाविद्यालय,संस्थेचे महिला महाविद्यालय येथील सर्व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी या अमृत कलशात त्यांनी संग्रहित केलेला अमृत कलश समर्पित केला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी देखील सर्व कार्यक्रमा अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी मोठ्या संख्येने स्वयंसेवक व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी व विभागीय समन्वयक डॉ. अर्जुन नेरकर यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

17 Sep 2023 - Page 6

# म.स.गा.महाविद्यालयात अमृत कलेशाचे उद्घाटन



मालेगाव:-महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगाव कॅम्प मालेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना पार्क मध्ये महाराष्ट्र बँक चे रिजनल मॅनेजर श्रीराम भोर साहेब यांच्या शुभ हस्ते मेरी माटी मेरा देश अंतर्गत अमृत कलशाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ.भारती खैरनार, डॉ.देवराम जाधव, डॉ. कल्याण कोकणे, यांच्या उपस्थितीत अमृत कलश याचे उद्घाटन करण्यात आले. सदर प्रसंगी बँकेचे रिजनल मॅनेजर भोर साहेबांनी विद्यार्थ्यांना माननीय पंतप्रधान यांच्या योजनेचे महत्त्व पटवून दिले.

आदरणीय प्राचार्यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कलशाचे मनापासून कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्यात. महाविद्यालयीन परिसरात तयार केलेल्या या अमृत कलशात तालुक्यातील संदीप महाविद्यालय झोडगे,सिटी कॉलेज मालेगाव, मराठा विद्या प्रसारक समाजाचे सोयगाव महाविद्यालय, संस्थेचे महिला महाविद्यालय येथील सर्व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी या अमृत कलशात त्यांनी संग्रहित केलेला अमृत कलश समर्पित केला.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी देखील सर्व कार्यक्रमा अधिकाऱ्याचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी मोठ्या संख्येने स्वयंसेवक व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी व विभागीय समन्वयक डॉ. अर्जुन नेरकर यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

# मसगा महाविद्यालयात हिंदी भाषा दिवस उत्साहात साजरा

मालेगांव कॅम्प:-हिंदी भाषा केवळ भारतापुरती मर्यादित नसून ती आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाली असून हिंदी भाषेतील साहित्य जगात अतुलनीय आहे. विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेवर विशेष प्राविण्य संपादन केले तर त्यांना देशातील कोणत्याही क्षेत्रात हिंदी अधिकारी किंवा इतर पदांवर नक्कीच नोकरी मिळू शकते.अशा अनेक संधी हिंदी भाषेतून विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. मात्र यासाठी विद्यार्थ्यांमध्ये इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रम घेण्याची आवश्यकता आहे . विविध स्पर्धा परीक्षांमध्येही हिंदी भाषेला माध्यम बनवण्यात आले आहे आणि असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे हिंदी भाषा प्रचलित नाही.

सामान्य माणूसही हिंदी भाषेत आपले विचार मांडू शकतो किंवा दुसऱ्याचे विचार समजू शक तो . हिंदी ही आपल्या देशाची राजभाषा असल्याने देशातील प्रत्येक नागरिकाला हिंदी भाषेचा अभिमान असायला हवा.असे विचार प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी व्यक्त केले. ते महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित मालेगाव कँम्प येथील महाराजा




सयाजीराव गायकवाड महाविद्यालय आणि डॉ. वीरमभाई राजाभाई गोढाणिया महिला महाविद्यालय, पोरबंदर (गुजरात) च्या हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने लिंकेज अंतर्गत १४ सप्टेंबर, २०२३ रोजी व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवर हिंदी दिवस कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून डॉ. वीरमभाई राजाभाई गोढाणिया महिला महाविद्यालय, पोरबंदर चे मा. प्राचार्य डॉ. केतन शहा उपस्थित होते. त्यांनी हिंदी विभागाला हिंदी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या. अतिथी वक्ते म्हणून उपस्थित बँक ऑफ बडोदा पोरबंदरचे मुख्य व्यवस्थापक अनुराग बजाज यांनी राजभाषा हिंदीचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर हिंदी विभागप्रमुख डॉ.मनिष वाघेला यांनी हिंदीतील रोजगाराच्या संधी या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.अनिता नेरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयातील हिंदी विभागाने घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

समारंभा चे आभार प्रदर्शन हिंदी विभागाचे डॉ. व्ही. डी सूर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचालन हिंदी संशोधन केंद्राच्या संशोधक अर्चना कदम यांनी केले.यावेळी दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14/9

# मसगा हिंदी दिवस कार्यक्रम संपन्न



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प हिंदी विभाग अनुसंधान केंद्र एवं अंचल कार्यालय बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव के संयुक्त तत्वावधान मे चेण च्या अंतर्गत राष्ट्रभाषा हिंदी दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव चे अंचल कार्यालय चे मुख्य प्रबंधक माननीय श्री श्रीराम भोर मुख्य वक्ता म्हणून उपस्थित होते याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करताना हिंदी भाषा बोलताना किती आनंद वाटतो ऐकायला सुंदर लिहायला सोपी बोलण्यात संस्था इतकी सोपी भाषा कुठेच सापडणार नाही म्हणून हिंदी भारताची राष्ट्रभाषा आहे भारतीय नागरिकांची ध्वनी आहे एकटाच तिकडे आहे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सीजी दिघावकर होते ते आपल्या मार्गदर्शनपर विचार मांडताना म्हणाले कि हिंदी भाषेचा आज देश विदेश मध्ये मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे .संगणकाची महत्त्वाची भाषा आहे. भारतीय नागरिकांनी आपल्या राष्ट्रभाषेचा आपण सन्मान करून त्या भाषेचा प्रचार केला पाहिजे. विशेष अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.मनीष सोनवणे डॉ. अनिल सावळे . नवदीप रंजन या कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सेप्रास्ताविक हिंदी विभाग एवं संशोधन केंद्राच्या प्रमुख प्रोफेसर डॉ. अनिता नेरे यांनी केले .सूत्रसंचालन डॉ. व्ही .डी. सूर्यवंशी यांनी केले कार्यक्रमाच्या प्रारंभी राहुल मोरे यांनी स्वागत गीत सादर केले या प्रसंगी प्राध्यापक डॉ. अनिल पवार, डॉ. राजपूत, भगवान निकम, डॉ. बी. एम सोनवणे, प्रा विनोद आयनोर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख प्राध्यापक प्राध्यापिका ,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते एम. ए. हिंदीचा विद्यार्थी कुमार अमोल केदा सोनजे यांनी उपस्थितांचे आभार मानले

# औचित्य हिंदी दिनाचे

## हिंदी भाषेत रोजगाराच्या अनेक संधी – प्रा.डा.अनिता नेरे

**मालेगांव ।**

हिंदी दिनाचे औचित्य साधून १४ सप्टेंबर हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार म.स.गा महाविद्यालयामध्ये प्राचार्य डा.चंद्रकांत दिघावकर सर यांच्या मार्गदर्शनाने हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी *हिंदी में रोजगार की संभावनाएँ* या विषयावर बोलतांना प्रमुख वक्त्या हिंदी विभाग प्रमुख प्रा.डा.अनिता नेरे यांनी हिंदी भाषेच्या माध्यमातुन रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत त्यात आपण रोजगार प्राप्त करु शकतो तसेच केंद्र सरकारच्या सर्व रोजगार हिंदी व इंग्रजीतून असतात हिंदी भाषा देशाचा अभिमान आहे रेल्वे ,हवाई वाहतूक पोस्ट ऑफिस असे अनेक संधी आहेत असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य प्रा.प्रफुल्ल निकम होते ,प्रमुख अतिथी पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चित्रपट सृष्टीत सवांद लेखन, दिग्दर्शक, लेखक, अभिनेता पत्रकार असे अनेक पर्याय हिंदी भाषेमुळे उपलब्ध होवू शकतात असे सांगितले हिंदी विभागाचे प्रा.मिलिंद पवार, प्रा.तेजराज सोनवणे , प्रमुख प्रा.किरण खैरनार प्रा.जितेंद्र पाटील प्रा.मनोहर निकम उपस्थित होते. यावेळी विकास रांकुडे या विद्यार्थ्याने हिंदी साहित्याचे महत्त्व प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये आहे असे मत व्यक्त केले.आभार मिलिंद पवार यांनी मानले सुत्रसंचालन ईश्वर कानडे यांनी केले.

**के.बी.एच.विद्यालय**

के.बी.एच.विद्यालय मालेगाव कॅम्प येथे राष्ट्रभाषा हिंदी दिन निमित्ताने वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कैलास दाभाडे होते.

यावेळी उपप्राचार्या पी.एस. शेवाळे ,एस.एल. शिंदे, जे.एस. बच्छाव ,प्रा. विश्वास पगार, राजेश धनवट, राजेंद्र शेवाळे, ी.यू. देवरे, संजय नेरकर, हेमंत पगारे ,ए.के. खेडकर ,आर.बी. बच्छाव,आर.व्ही. पगार, श्रीकांत पाटील, एस. एस. ठाकरे उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख आर.बी. बच्छाव यांनी केले तसेच विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा दिली.यावेळी उन्मय कांदळकर ,वैष्णव बच्छाव , सोहम मोरे , प्रेम बोरसे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. ज्येष्ठ हिंदी शिक्षक ए.के. खेडकर यांनी मनोगत व्यक्त केले. हिंदी विभागाच्या वतीने प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक यांचा सत्कार करण्यात आला तसेच सर्व हिंदी विषय शिक्षकांचा गौरव करण्यात आला. वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा पेन देऊन गौरव करण्यात आला .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर यांचे सहकार्य लाभले.

**अजिंठा शाळा**

१४ सप्टेंबर "हिंदी दिवस" अजिंठा प्राथमिक शाळेत उत्साहात संपन्न झाला, हिंदी दिवस निमित्ताने हिंदी सप्ताह साजरा करण्यात आला या सप्ताहात



विद्यार्थांनी शालेय परिपाठ दिनविशेष,सुविचार व बातमी हिंदीत सादर केला. हिंदी सप्ताह समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते सरस्वती देवी प्रतिमा पुजनाने प्रारंभ झाला शालेय आवारात हिंदी साहित्यातील गाजलेले कवी व लेखक श्री.हरिवंशराय बच्चन, श्री.मुंशी प्रेमचंद व श्री.रामचंद्र शुक्ल याच्या कार्याची माहिती पोस्टर लावण्यात आली, रांगोळी द्वारे घोषवक्य काढण्यात आली, हिंदी कविता गायन स्पर्धा घेण्यात आली. इ.५ वी,६ वी, व ७ वी विद्यार्थीनी बुंदे,बसंती हवा व फुल और काटे कविता सादर केली या स्पर्धेत इयत्ता ५ वी विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले व वक्तृत्व स्पर्धाही घेण्यात आली या स्पर्धेत इयत्ता ५ वी तील दक्ष यशोद, चंचल मोरे व इयत्ता ७ वी अनुष्का सोनवणे या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष सखाराम घोडके, व सेक्रेटरी यशवंत लिंगायत यांनी हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्यात, दीपक अहिरे यांनी हिंदी दिवसाचे महत्व विषद केले,प्रस्तावना निलेश लिंगायत यांनी केली व शतल श्रीखंडे यांनी आभार मानले.

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# म.स.गा. कनिष्ठ महाविद्यालयात हिंदी दिन

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव । प्रतिनिधी :**



हिंदी दिनाचे औचित्य साधून १४ सप्टेंबर हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार म.स.गा महाविद्यालयात प्राचार्य मा.डा.चंद्रकांत दिघावकर सर यांच्या मार्गदर्शनाने हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हिंदी में रोजगार की संभावनाएँ या विषयावर बोलतांना प्रमुख वक्त्या प्रा.डा.अनिता नेरे मडम यांनी हिंदी भाषेच्या माध्यमातुन रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत त्यात आपण रोजगार प्राप्त करु शकतो असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य प्रा.प्रफुल्ल निकम सर, प्रमुख अतिथी पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे सर हे उपस्थित होते. हिंदी विभागाचे प्रा.मिलिंद पवार, प्रा.तेजराज सोनवणे , कला विभाग प्रमुख प्रा.किरण खैरनार सर,वाणिज्य विभागप्रमुख प्रा.जितेंद्र पाटील सर ,विज्ञान विभाग प्रमुख प्रा.मनोहर निकम मंचावर उपस्थित होते.

यावेळी विकास रांकुडे या विद्यार्थ्याने हिंदी साहित्याचे महत्त्व प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये आहे असे मत व्यक्त केले. यावेळी बोलताना पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे यांनी असे म्हटले की हिंदी सामान्य ची भाषा आहे व हिंदी दिनाच्या माध्यमातून हिंदी साहित्याचा प्रसार व प्रचार करणे ही आपली जबाबदारी आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रावण कानडे याने केले.व्या कार्यक्रमामध्ये आरजु शेख, रोहित सुर्यवंशी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी प्रा.हेमराज भामरे,प्रा.अशोक खांडेकर, प्रा.बन्सीलाल हिरे , प्रा.विजय पाटील प्रा.अभिजित पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधु भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत मसगा महाविद्यालयाचे यश



**मालेगांव ।**
प्रताप महाविद्यालय अमळनेर आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत म.स.गा. महाविद्यालयाचे विद्यार्थी दीपेश रौंदळ व गौरव ठाकरेयांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व सन्माचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे नाव राज्यपातळीवर गाजवणाऱ्या या गुणी विद्यार्थ्यांचे महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी, समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक डॉ. अपूर्वभाऊ हिरे ,डॉ.अद्वय आबा हिरे-पाटील, विश्वस्त व जनसंपर्क प्रमुख मा.संपदादीदी हिरे, सहसचिव डॉ.व्ही. एस. मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार व महाविद्यालयीन परिवारातर्फे या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.प्रा.डी. बी सोनवणे व प्रा.अंकुश मयाचार्य ह्यांचे मार्गदर्शन ह्या विद्यार्थ्यांना लाभले.

10/9

# मसगा कॉलेजात मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन

मालेगाव । म स गा महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने १५ दिवसांचा मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मोडी लिपीचे अभ्यासक व संशोधक डॉ रामदास भोंग तसेच मोडी लिपी तज्ञ भावना शिंदे आणि अनिता अहिरे या उपस्थित होत्या या प्रसंगी डॉ रामदास भोंग यांनी मराठाकालीन व ब्रिटिशकालीन कागदपत्रांचे, इनाम जमिनी, वारस हक्क, जातीच्या नोंदी

करण्यासाठी या अभ्यासक्रमाचा उपयोग होत आहे तरी विद्यार्थ्यांना ही संधी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिल्या बद्दल महाविद्यालयाचे व इतिहास विभागाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन सरकारी कागदपत्रांचा संशोधनासाठी अभ्यास करावा संशोधनातील लिपीचे महत्त्व त्यांनी आपल्या मनोग तात मांडले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर,

उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, इतिहास विभाग प्रमुख अजय अहिरे, प्रा सुभाष अहिरे, प्रा.सुमित वाघ, प्रा. राहुल देसले आणि विद्यार्थी मोठ्या



अभ्यासक्रम हा ज्ञानदुर्ग इतिहास संशोधन संस्था नाशिक यांच्या

6/9

# महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरू

मालेगाव कॅम्पः- महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या म. स. गा. महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने बेस्ट प्रॅक्टिस म्हणून गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरू करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ अनिल सावळे, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील. डी. पाटील, डॉ ए. के. सोनवणे, डॉ. आर. एस. काळे डॉ. कपिल पाटील डॉ. विजय. डि. पवार, राहुल गायकवाड, प्रतिक्षा पवार, हितेश पवार, प्रकाश गायकवाड, देवेंद्र मगर, जयवंत देवरे, अजय कचवे इतर सहकारी व प्राणीशास्त्र विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते.



महाविद्यालयातील पालापाचोळा वापरून सेंद्रिय खत तयार करणे बाबत शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. व सेंद्रिय खताचे वापराबाबत समाजात जाणीव जागृती करण्यात येईल. महाविद्यालयात गांडूळ खत प्रकल्प निर्मिती करिता कृषी विज्ञान केंद्र वडेल येथून गांडूळ आणण्यात आले जे गांडूळ खत निर्माण होईल ते महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र उद्यान व महाविद्यालयीन परिसरातील वृक्षांसाठी वापरण्यात येईल, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी जाहीर केले.

2/9

# विविध स्पर्धामध्ये मसगाचे खेळाडु विभागीय स्तरावर निवड

मालेगांव:–क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक व मालेगाव महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्यामध्ये कुस्तीच्या जिल्हास्तरीय स्पर्धा फ्री स्टाईल व ग्रीको रोमन प्रकारातील मालेगाव तालुका क्रीडा संकुल येथे संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेसाठी मनपा क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या कुस्तीगिरांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये मसगा कनिष्ठ महाविद्यालयाच्या कुस्तीगिरांचाही समावेश होतो.



ग्रीको रोमन क्रीडा प्रकारातील निखिल बावा १७ वर्षा आतील ४७ कि. ग्रा. वजनी गटात प्रथम, अनिकेत बागुल. १९ वर्ष आतील ५२ की.ग्रा. वजनी गटात प्रथम, गौरव देवरे १९ वर्ष आतील ८५ की. ग्रा. वजनी गटात प्रथम, दर्शन अहिरे १७ वर्ष आतील ६० की. ग्रा. वजनी गटात प्रथम, देवेंद्र महाजन १९ वर्ष आतील ६३ की. ग्रा.वजनी गटात प्रथम, तर फ्री स्टाईल क्रीडा प्रकारात उज्वल बागुल १७ वर्ष आतील ५१ की. ग्रा. वजनी गटात प्रथम, गौरव इंगळे १९ वर्ष आतील ६६ की. ग्रा. वजनी गटात प्रथम, अमोल पवार १९ वर्ष आतील ६५ की. ग्रा. वजनी गटात प्रथम, रूपाली रौंदळ १९ वर्ष आतील ५० की. ग्रा. वजनी गटात प्रथम आले. बुद्धिबळ पटूंचाही समावेश होता. गौरव पगारे, अथर्व बोराडे, प्रेम अहिरे यांची १९ वर्ष आतील मुलांमधून विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड झाली. जुदो क्रीडा प्रकारात अनिकेत बागुल मृणाल जगताप प्रथम आले तर शिकाई मार्शल आर्ट मध्ये साक्षी सुराशे, प्रतीक कोठावदे प्रथम येऊन विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड झाली.

क्रीडा स्पर्धांसाठी उपस्थित म.न.पा. क्षेत्र क्रीडा अधिकारी करिता प्रा. शहीद अख्तर, व क्रीडा शिक्षक शशिकांत पवार होते. पंच म्हणून श्री पै. प्रवीण यादव (धुळे) यांनी कार्य केले. स्पर्धेचे संयोजक म्हणून पै. दिपक पाटील यांनी काम पाहिले.

खेळाडूंच्या या अभूतपूर्व, उल्लेखनीय यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक डॉ. अपूर्वभाऊ हिरे, समन्वयक मा. डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील, संस्थेच्या विश्वस्त मा. डॉ संपदादीदी हिरे, संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे , क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर डॉ सुभाष निकम उपप्राचार्य डॉ. टी. एस. साळवे, डॉ. मनीष सोनवणे, कुलसचिव रघुनाथ शेलार, कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम , पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक संदिप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत

# मसगाच्या खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालेगाव** : राज्य जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व मालेगाव महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन तालुका क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते. यात कुस्तीच्या जिल्हास्तरीय स्पर्धा फ्री स्टाईल, ग्रीको रोमन प्रकारातील कुस्त्या झाल्या.

या क्रीडा स्पर्धेसाठी मनपा क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या कुस्तीगिरांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये मसगा कनिष्ठ महाविद्यालयाच्या कुस्तीगिरांचाही समावेश होता. ग्रीको रोमन क्रीडा प्रकारातील निखिल बावा १७ वर्षांआतील ४७ किलो ग्रॅम वजनी गटात प्रथम, अनिकेत बागुल १९ वर्षे आतील ५२ किलोग्रॅम वजनी गटात प्रथम, गौरव देवरे १९ वर्षे आतील ८५ किलोग्रॅम वजनी गटात प्रथम, दर्शन अहिरे १७ वर्षे आतील गटात प्रथम, देवेंद्र महाजन १९ वर्षे आतील गटात प्रथम तर फ्री स्टाईल क्रीडा प्रकारात उज्ज्वल बागुल १७ वर्षे आतील गटात प्रथम, गौरव इंगळे १९ वर्षे आतील गटात प्रथम, अमोल पवार १९ वर्षे आतील गटात प्रथम, रूपाली रौंदळ १९ वर्षे आतील गटात प्रथम आले. गौरव पगारे, अथर्व बोराडे, प्रेम अहिरे यांची १९ वर्षे आतील मुलांमधून विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड झाली. जुदो क्रीडा प्रकारात अनिकेत बागुल, मृणाल जगताप प्रथम आले तर शिकाई मार्शल आर्टमध्ये साक्षी सुराशे, प्रतीक कोठावदे यांची विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड झाली. यावेळी मनपा क्षेत्र क्रीडा अधिकारी प्रा. शहीद अख्तर, क्रीडा शिक्षक शशिकांत पवार उपस्थित होते. पंच म्हणून प्रवीण यादव यांनी काम पाहिले.

# मसगा कॉलेजात उद्योजकता विकास यात्रा



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात स्वालंबी भारत अभियान पश्चिम महाराष्ट्र प्रांत व महाविद्यालयातील कौशल्य विकास योजना यांच्या माध्यमातून उद्योजकता विकास यात्रेचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उत्तर महाराष्ट्रातील उद्योजक सम्यक लोढा हे होते त्यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की ही यात्रा आपण संपूर्ण देशभर काढत असून, संपूर्ण देशात औद्योगिक क्षेत्रासंदर्भात प्रोत्साहन व विविध रोजगार विषयक शासकीय योजना अधिकाधिक प्रमाणात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा यात्रेचा मूळ उद्देश आहे, तसेच भारत हा युवाशक्ती असलेला देश आहे त्यामुळे युवक हे नोकरी करणारे नव्हे तर नोकरी देणारे तरुण तयार करणे गरजेचे आहे.याप्रसंगी अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर चंद्रकांत दिघावकर हे होते त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की आज नोकरी मिळवणे दुर्मिळ झाले आहे नोकरी मिळाली तर मनास-रखी मिळत नाही व मनास-रखी मिळाली तर टिकत नाही म्हणून तरुणांनी उद्योग, व्यवसाय, स्टार्टअप, लघुउद्योग स्वयंरोजगार इत्यादी सुरू करणे काळाची गरज आहे. याप्रसंगी मालेगांवातील उदयोजक तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल रावळे, डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अविनाश नेरकर, प्रा. डॉ. अरुण गर्दे, प्रा. डॉ.सुषमा तिवारी, प्रा. डॉ. एन.बी. शिरसाठ, प्रा. चेतन येवले यांनी परिश्रम घेतले.

30/8

दि.३१/८/२०२३

# मसगा महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा




मालेगाव:-येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर उप प्राचार्य डॉ. टी.एस. सावळे डॉ. मनीष सोनवणे कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे परीक्षा विभागाचे इन्चार्ज प्रा. मिलिंद कुलकर्णी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. महाविद्यालयाचे प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना ध्यानचंद प्रमाणेच जिद्द चिकाटी व जिंकण्याची असूया अंगी असणे हे खूप महत्त्वाचे आहे, आधुनिक जगामध्ये त्याची नितांत गरज आहे हे पटवून दिले. कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य यांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा जीवनावर, कारकिर्दीवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयात क्रीडा विभागाच्या वतीने विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्यामध्ये टेबल टेनिस, फुटबॉल, मैदानी क्रीडा स्पर्धा, वरिष्ठ विभाग व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन वरिष्ठ क्रीडा विभागाचे क्रीडा मार्गदर्शक प्रा. संतोष जाधव यांनी केले तर कनिष्ठ विभागाचे क्रीडा मार्गदर्शक प्रा. संदिप कोंडूरकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

दि.३१/८/२०२३

# मसगा महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



मालेगाव:-येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे क्रीडा प्रेमी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर उप प्राचार्य डॉ. टी.एस. सावळे डॉ. मनीष सोनवणे कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे परीक्षा विभागाचे इन्चार्ज प्रा. मिलिंद कुलकर्णी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. महाविद्यालयाचे प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना ध्यानचंद प्रमाणेच जिद्द चिकाटी व जिंकण्याची असूया अंगी असणे हे खूप महत्त्वाचे आहे, आधुनिक जगामध्ये त्याची नितांत गरज आहे हे पटवून दिले. कनिष्ठ विभागाचे उप प्राचार्य यांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा जीवनावर, कारकिर्दीवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयात क्रीडा विभागाच्या वतीने विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्यामध्ये टेबल टेनिस, फुटबॉल, मैदानी क्रीडा स्पर्धा, वरिष्ठ विभाग व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन वरिष्ठ क्रीडा विभागाचे क्रीडा मार्गदर्शक प्रा. संतोष जाधव यांनी केले तर कनिष्ठ विभागाचे क्रीडा मार्गदर्शक प्रा. संदिप कोंडूरकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# मसगा महाविद्यालयात आरोग्य संवाद



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर मंदिर संस्था संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात डॉक्टर प्रशांत दादा हिरे निरामय आरोग्य केंद्रा मार्फत आरोग्य संवाद ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मालेगावातील प्रसिद्ध नाक, कान घसा तज्ञ डॉ. शुभांगी अहिरे यांनी उपस्थित विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्याशी नाक, कान व घसा यांचे आरोग्य व काळजी याविषयी संवाद साधत मार्गदर्शन करताना सांगितले की आपल्या बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्याला नाक, कान व घसा यांच्या समस्यांना सामोरे जावे लागत असून यामध्ये कानात पाणी व तेल टाकल्यामुळे कमी ऐकू येणे, त्याचबरोबर अंतर्कर्णाचे आजार, कर्णरोपण तंत्रज्ञान, कानांची व नाकाची निगा, कानाची रचना व कार्य धनीप्रदूषणामुळे येणारी बधिरता, बाह्‌ व मध्य कानाचे आजार, श्रवणयंत्रे यांची सविस्तर माहिती सांगताना या अवयवांची काळजी कशी घ्यावी हे सांगितले या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे होते त्यांनी सांगितले की आपले मानसिक आरोग्य हे आपल्या शारीरिक आरोग्यावर अवलंबून असते त्यामुळे डॉक्टर हे आपल्या आजारान विषयक समस्या योग्यरीत्या ओळखू शकतात व आपल्याला बरे होण्यासाठी मार्गदर्शन करू शकतात. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे शैक्षणिक समन्वय डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, एमसीव्हीसी विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, कुलसचिव रघुनाथ शेलार, कार्यालयाने अधीक्षक जयवंत कट्यारे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी पालक व शिक्षक उप-स्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अतुल वाघ यांनी तर प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. भारती खैरनार यांनी करून दिला. तर आभार प्रा. किरण शेळके यांनी मानले, कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. यांनी परिश्रम घेतले

27/8

✲ सुविचार ✲
सवय ही एक एकनिष्ठ सेवक बनू शकते किंवा निष्ठूर मालक बनते.

दैनिक
महाराष्ट्र सारथी
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

वर्ष ३ रे | अंक : ११९ | रविवार, २७ ऑगस्ट २०२३ | पाने ८ | किंमत ५ रु.

# मसगाचे विद्यार्थी क्रिकेट स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव । प्रतिनिधी :**

कल्लू स्टेडियम, मालेगाव येथे क्रिकेट स्पर्धेत १९ वर्ष आतील मुले यांच्या शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. त्यामध्ये वयोगट १९ वर्षे आतील मुले ह्या क्रीडा प्रकारांमध्ये म.स.गा. महाविद्यालयातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला सार्थक पवार याने संघनायक म्हणून उत्तम कामगिरी केली व संघाला धैर्य देत वाटचाल विजयाच्या दिशेने नेली. सर्व खेळाडूंनी त्याला साथ देत व चांगली कामगिरी बजावत विजय संपादन केला. त्यांची निवड विभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धांमध्ये झाली आहे. कार्यक्रमासाठी उपस्थित म.न.पा. क्षेत्र क्रीडा अधिकारी करिता प्रा. शहीद अख्तर, व क्रीडा शिक्षक शशिकांत पवार



होते. पंच म्हणून कौसेन सर यांनी कार्य केले. स्पर्धेचे संयोजक म्हणून क्रीडा शिक्षक कौसेन कादरी यांनी काम पाहिले.

खेळाडूंच्या या अभूतपूर्व, उल्लेखनीय यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक डॉ. मा अपूर्वभाऊ हिरे, डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील, संस्थेच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ संपदादिदी हिरे, संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड तसेच प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम , पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, विज्ञान शाखा प्रमुख् प्रा. मनोहर निकम, शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. प्रवीण पवार, प्रा. अजय ठाकरे, प्रा. अजित मगर यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी दिल्या. खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक श्री. संदिप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

25/8

दै.शहर समाचार

# जी-२० प्रेसिडेंसी कार्यक्रम संपन्न



मालेगाव-जी-२० ला ग्रुप ऑफ ट्वेंटी असे ही म्हणतात. हा युरोपियन युनियन आणि १९ देशांचा अनौपचारिक गट आहे. त्याचे नेते दरवर्षी जी-२० शिखर परिषदेत एकत्र येतात आणि जागतिक अर्थव्यवस्थेला पुढे कसे आणायचे यावर चर्चा करतात. त्याची स्थापना १९९९ साली झाली. तसेच, हा एक मंत्री मंच आहे जो जी-७ ने विकसित आणि विकसनशील दोन्ही अर्थव्यवस्थांच्या सहकार्याने स्थापन केला होता. ऋ-२० ची स्थापना, उद्देश इत्यादी बाबी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात नमूद केले.

सदर कार्क्रमासाठी प्रमुख पाहुणे ४८ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर (राष्ट्रीय छात्र सेना, धुळे) कर्नल शैलेंद्र कुमार गुप्ता हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी जी २०- प्रेसिडेंसीमध्ये भारताची भूमिका काय हे त्यांच्या मनोगतात व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ.मनिष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच कार्यक्रमासाठी ४८ महाराष्ट्र बटालियनचे (राष्ट्रीय छात्र सेना,धुळे) सुभेदार मेजर सुभाष सिंग, नायब सुभेदार रमेश कुमार, मालेगाव सेक्टर मधील सेकंड ऑफिसर-रिझवान अहेमद मालेगांव हाय स्कूल,हवलदार लखविंदर सिंग, हवलदार राजेंद्र पवार, हवलदार भगवान उगले, हवलदार मनजीत पटियाल उपस्तिथ होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेकंड ऑफिसर - रवींद्र बोरसे के बी एच विद्यालय, मालेगांव कॅम्प, प्रास्ताविक लेफ्टनंट बी.बी. वाघमारे यांनी केले तसेच आभार सी टी ओ एस. ए. सांगळे यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी कार्य क्रमासाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे महाविद्यालयातील ५५ छात्र तसेच के बी एच विद्यालय, मालेगांव कॅम्प येथील ३० छात्र उपस्तिथ होते.

# → अवतीभवती



मालेगाव शहर : येथील मसगा महाविद्यालयातील प्रवेश सावळे याची विभागीय पातळीवर जलतरण स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे.

## 'मसगा'च्या प्रवेश सावळेची विभागीय जलतरणसाठी निवड

मालेगाव शहर : जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यातर्फे जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा झाल्या. वयोगट १७ वर्षांखालील मुले या क्रीडा प्रकारांमध्ये ५० मीटर फ्री स्ट्रोक, १०० मीटर फ्री स्ट्रोक या क्रीडा प्रकारात मसगा महाविद्यालयातील खेळाडू प्रवेश सावळे याने प्रथम क्रमांक मिळविला. विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आली. प्रा. शहीद अख्तर, शशिकांत पवार, प्रा. नितीन खैरनार यांनी पंच म्हणून काम केले. स्पर्धेचे संयोजक म्हणून अब्दुल खालिक यांनी काम पाहिले. खेळाडूच्या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, समन्वयक डॉ. अद्वय हिरे, संस्थेच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख संपदा हिरे, संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष डॉ. हरीश आडके, क्रीडा समन्वयक डॉ. दिनेश कराड, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक रवींद्र मोरे यांनी कौतुक केले. या विद्यार्थ्यास क्रीडा मार्गदर्शक संदीप कोंडूरकर व प्रा. संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

24/8

दै.शहर समाचार

# म.स.गा महाविद्यालयात ३ नवीन पीएच.डी. संशोधन केंद्राना मान्यता

मालेगाव कॅम्प :- महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात नव्याने राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इंग्रजी या तीन विषयांच्या पीएच.डी.संशोधन केंद्रास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मान्यता मिळाली आहे.

महाविद्यालयात या आधी नऊ विषयांचे पीएच.डी . संशोधन केंद्र कार्यरत आहेत, या नव्याने मान्यता मिळालेल्या ३ पीएच.डी. संशोधन क्रेंद्रामुळे महादिद्यालयात आता १२ विषयांचे पीएच. डी. संशोधन केंद्र सुरु आहेत. या सर्व संशोधन केंद्रामुळे पंचक्रोशीतील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, या पीएच.डी. संशोधन केंद्राच्या मिळालेल्या मान्यतेबद्दल संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, संस्थेचे समन्वयक तथा महाविद्यालयाचे सीडीसी चेअरमन डॉ.अपूर्व हिरे, डॉ. अद्वय हिरे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील, महाविद्यालयाचे रिसर्च कॉर्डिनेटर प्रा.डॉ. अरुण गर्दे यांच्यासह विभाग प्रमुख, डॉ. एम.बी सोनवणे. डॉ.बी.एम.सोनवणे, डॉ.भारती खैरनार यांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# कु. तनिष्का खैरनार योगामध्ये जिल्ह्यात प्रथम



**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा मालेगांव । प्रतिनिधी :**

१४ वी जिल्हास्तरीय योगा चॅम्पियनशिप २०२३ दि- ११ ऑगस्ट २०२३ शिशुविहार बालकमंदिर नाशिक, येथे संपन्न झाली, त्यामध्ये वयोगट १६ ते १८ मुली, या वयोगटात अंदाजे ३३ खेळाडू सहभागी झाले होते, त्यामध्ये म.स.गा. कनिष्ठ महाविद्यालयाची कु. तनिष्का रवींद्र खैरनार चा प्रथम क्रमांक आला व तिची निवड राज्यासाठी होणाऱ्या योगा क्रीडा स्पर्धेसाठी झाली आहे व तिचा सत्कार प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते करण्यात आला व तिचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे. तिच्या भविष्यातील वाटचालीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, शाखाप्रमुख प्रा. मनोहर निकम, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. मिलिंद कुलकर्णी, प्रा. अजय ठाकरे, प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. अभिजित पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. खेळाडूला महाविद्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक प्रा. संदिप कोंडूरकर, प्रा. संतोष जाधव यांचे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# लॅपटॉप व मोबाईल च्या अतीवापरामुळे झोपेवर परिणाम – डॉ. मनीष सुर्यवंशी

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगांव । प्रतिनिधी :**



म.स.गा.कनिष्ठ महाविद्यालयात सामान्य मानसिक आरोग्य या विषयावर प्रमुख वक्ते डॉ. मनिष सूर्यवंशी नाशिक सिव्हिल हॉस्पिटल चे मानसिक आरोग्य सहकारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ.मनिष सोनवणे, प्रमुख व्याख्याते डॉ.मनिष सूर्यवंशी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांची ओळख कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम यांनी केले.

डॉ.मनिष सूर्यवंशी सर यांनी विद्यार्थी अवस्थेतील भेडसावणारे व समाजातील ज्वलंत प्रश्न अतिशय सोपा करून सांगितला. लॅपटॉप,मोबाईल च्या अतिरिक्त वापरामुळे झोपेवर, विचार करण्याच्या क्षमतेवर होणाऱ्या विपरीत परिणामांची कारणमिमांसा केली व मानसिक दडपण, मानसिक भीती, अति चिंता,भ्रम व भास यामुळे मानसिक आरोग्यात बिघाड होतो व त्याचा मानसिक आरोग्यावर व शारीरिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची सखोल माहिती दिली. शेवटी असे रुग्ण आत्महत्या सारखे निर्णयापर्यंत कसे पोहोचतात.याला आपण वेळीच मानसिक आरोग्य जोपासले तर पुढे सुरू होणाऱ्या शृंखला थांबवू शकतो व सरांनी याबाबतची हेल्पलाइन सुरू झाली आहे, विद्यार्थ्यांना हेल्पलाइन नंबर देऊन सांगितले. सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विज्ञान शाखा प्रमुख प्रा.मनोहर निकम, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.मिलिंद कुलकर्णी, प्रा.योगेश सावंत, कला शाखा प्रमुख प्रा.किरण खैरनार, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा.जे. एस.पाटील, प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. अभिजीत पाटील यांनी सहकार्य केले.

21 Aug 2023 - Page 5

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मसगा महाविद्यालयाचे यश

**मालेगांव ।**

एरंडोल नगरपरिषद एरंडोल, जि. जळगाव येथील स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव अंतर्गत आयोजित, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव येथील विद्यार्थीनी कोमल शेलार हिने तृतीय क्रमांक पटकावला व गीतांजली निकम या विद्यार्थीनीने चतुर्थ क्रमांक पटकावला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व सन्माचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.

महाविद्यालयाचे नाव राज्यपातळीवर गाजवणाऱ्या या गुणी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर,



उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार व महाविद्यालयीन परिवारातर्फे या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.प्रा.रमेश निकम,प्रा.डी. बी सोनवणे व प्रा.अंकुश मयाचार्य ह्यांचे मार्गदर्शन ह्या विद्यार्थ्यांना लाभले.

17/8

# म.स.गा. महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

मालेगांव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे भारताचा अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.



या वेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी संचालन केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व कविता सादर केल्या. याप्रसंगी प्राचार्य दिघावकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की आपल्याला स्वातंत्र्य काही सहजासहजी मिळालेले नाही, यासाठी कितीतरी लोकांनी आपल्या आयुष्याचे बलिदान दिले आहे त्यामुळे स्वातंत्र्याचा आपण सर्वांनी आदर व अभिमान बाळगावा. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे विविध रांगोळ्या व देखावे सादर केले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉंक. मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वय डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे ,एमसीव्हीसी विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, कुलसचिव रघुनाथ शेलार , कार्यालयीन अधीक्षक जयवंत कट्यारे, श्री राजेश निकम, राष्ट्रीय छात्र सेनेच्या लेफ्टनंट भाग्यश्री वाघमारे, सी.टी.ओ .सूर्यभान सांगळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. डॉ.अर्जुन नेरकर, प्रा.डॉ. चंद्रसिंग राजपूत ,प्रा. वैशाली साळुंखे, प्रा.डॉ. नरेंद्र डोखे यांच्या सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म.स.गा.महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटन



मालेगाव कॅम्प:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय व आय क्यू ए सी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात दिनांक ११ ऑगस्ट रोजी विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी कमलदीप गॅस एजन्सीचे संचालक श्री संजय जाधव व श्री.दिनेश जाधव हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे होते. या प्रसंगी श्री जाधव बंधू यांनी कुकिंग गॅस सेफ्टी या विषयावर मार्गदर्शन करताना स्वयंपाक व इतर कारणासाठी अतिशय सुखकारक आहे परंतु त्याचा वापर करताना आपण तेवढीच काळजी घेतली पाहिजे, जर काळजी घेतली नाही तर तो गॅस आपल्यासाठी हानिकारक होऊ शकतो, सिलेंडर वापरताना कुठली काळजी घेतली पाहिजे, काही अडचण आल्यास एल.पी.जी. वितरक किंवा १९०६ या नंबर वर संपर्क साधावा असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. दिघावकर यांनी सांगितले की कुकिंग गॅस वापरताना कंपनीच्या गाईडलाईन्स आपण वापरल्या पाहिजे व काही दुर्घटना झाल्यास आपल्याला विम्याचा

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते. या कार्यक्रमा चे प्रास्ताविक विज्ञान मंडळाचे चेअरमन डॉ. एस. डी. पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. एन. बी. शिरसाट यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा. कुलदीप पडयार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. डी. जी. जाधव यांनी मानले. कार्य क्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. ए. के. सोनवणे, प्रा. सी. आर.

# मसगात डॉ.रंगनाथ जयंती साजरी



मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प जि.नाशिक येथील ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे पितामह डॉ. एस.आर. रंगनाथन यांची १३१ वी जयंती शनिवार दिनांक १२ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.चंद्रकांत दिघावकर यांचे शुभहस्ते डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.मनीष सोनावणे, डॉ.टी.एस. सा-वळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.प्रवीण पाटील, नॅक समन्वयक डॉ. कल्याण कोकणे, रघुनाथ शेलार, प्रा.अशोक वाकचौरे, ग्रंथपाल प्रा.निलेश नागरे के.यु.अहिरे व सर्व प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी श्री. बोराळे, श्री.शेलार, श्री.पवार, श्री.वाघ तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्रा.निलेश नागरे यांनी डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या कार्याचा परिचय करून दिला. ग्रंथालयांना जास्तीत जास्त लोकाभिमुख बनवणं, त्याचा फायदा सर्व वाचकांना व्हावा यासाठी डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालयाची पंचसूत्री तयार केली. ज्याआधारावरच ग्रंथालयशास्त्राचा पाया रचला गेला आहे.भारतातच नाही तर जगभरातल्या सर्वच ग्रंथपालांना डॉ. रंगनाथन यांच्या तत्त्वांचा अभ्यास करावाच लागतो. भारतात ग्रंथालयशास्त्र म्हटलं की डॉ. एस. आर. रंगनाथन यांचं आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव सर्वांत आधी घेतले जातं. भारतात ग्रंथालयाची चळवळ ही सरकारी अनुदानाशिवाय उभी राहू शकत नाही ही गोष्ट त्यांनी सुरुवातीलाच हेरली. त्यामुळेच पूर्ण देशभरातच असा कायदा असावा ज्यामुळे ग्रंथालयांचे नियमन आणि व्यवस्थापन सुलभ होऊन ग्रंथालयं सर्वांसाठी खुले होतील, असा विचार त्यांनी केला. आज भारतामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये जी काही प्रगती झालेली दिसत आहे त्यामध्ये सर्वाधिक मोठं योगदान डॉ. एस. आर. रंगनाथन यांचं आहे. या प्रसंगी सर्व मान्यवरांनी ग्रंथालय कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

12/8

दि.१२/८/२०२३

# मेरी मिट्टी मेरा देश अंतर्गत पंचप्रण शपथ



मालेगांव:-महाराजा सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत देशाच्या ७० व्या अमृत महोत्सव वर्धापन दिनानिमित्त मेरी मिटी मेरा देश या उपक्रमांतर्गत पंचप्रणची शपथ देण्यात आली.

सदर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना पार्क मध्ये साफसफाई, वृक्ष लागवड व पंचप्रणची शपथ स्वयंसेवकांना देण्यात आली. प्राचार्य दिघावकर यांनी एनएसएस मधील स्वयंसेवकांची कर्तव्य व जबाबदारी याविषयीची सखोल माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक जीवनात कुठेही यशस्वी होतो समाजसेवेचे व्रत अंगीकार तो मानवता जपतो अशा विविध अंगाने प्राचार्य दिघावकर यांनी मार्गदर्शन केले.या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.अनिल सावळे, डॉ. मनीष सोनवणे, डॉ. प्रवीण पाटील तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ. अर्जुन नेरकर , डॉ. चंद्रसिंग राजपूत,प्राध्यापक वैशाली साळुंखे यांनी विशेष परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
महाराष्ट्र सारथी

# भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान महत्वाचे - डॉ. दिघावकर

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव । प्रतिनिधी :**



म.स.गा महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ .सी .जी. दिघावकर यांनी आपल्या मनोगतात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान महत्वाचे आहे असे मत मांडले. बिरसा मुंडा तंट्या भिल्ल ,उमाजी नाईक, भागोजी नाईक ख्वाजा नाईक ,गुलाब्या फरारी यांनी ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणा विरुद्ध उठाव केला होता. दिनांक ९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात इतिहास विभागातील प्रा सुभाष अहिरे यांनी या प्रसंगी छोडो भारत या ब्रिटीशांच्या विरोधात पुकारलेल्या महात्मा गांधी च्या चळवळीत नाशिक जिल्ह्यातील आदिवासी बांधव सामान्य जनमानस ,राष्ट्रसेवा दलातील कार्यकर्ते आणि मालेगावातील कर्मवीर भाऊसाहेब हिरेंच्या नेतृत्व खाली अंदाजे ३४ स्वातंत्र्यसैनिकांनी भाग घेतला असे प्रतिपादन केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या वतीने माझी माती माझा देश या उपक्रम अंतर्गत देशाला बलशाली बनवण्या करिता पंचप्राण शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजय अहिरे यांनी केले, आभार प्रदर्शन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ मनीष सोनवणे , डॉ आर के जाधव , डॉ. एस पी देवरे , प्रा. रामेश्वर पवार, प्रा. नरेंद्र डोखे आणि विद्यार्थी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासींच्या समस्या स्त्रियांनी खऱ्या जाणल्या

**लोकनामा प्रतिनिधी**

## नवले : रोकोडोबानगरला आदिवासी दिन



**मालेगाव** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित मसगा कनिष्ठ महाविद्यालय व विशाखा समितीअंतर्गत जागतिक आदिवासी दिन रोकोडोबानगर येथे झाला. यावेळी जाणीव फाउंडेशनच्या अध्यक्षा सविता नवले यांनी स्त्रियांना आरोग्यविषयक घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. महिलांनी आजार लपवू नयेत. संकोच न पाळता आरोग्यावर लक्ष द्यावे. आदिवासी महिला भक्कम असल्यामुळेच आपले आदिवासी बांधव खऱ्या अर्थाने जंगल व जमिनीचे संरक्षण करू शकले, असे त्या म्हणाल्या.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त, तसेच महिला कल्याण व तक्रार निवारण समिती अध्यक्षा, मधुरा एम्पॉवरमेंट ट्रस्टच्या संचालिका संपदा हिरे यांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रा. रवींद्र मोरे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचा उद्देश आदिवासी महिलांच्या समस्या जाणून घेऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, हा होता.

यावेळी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्या कमला मोरे, विद्या ठाकरे, अंगणवाडी सेविका वंदना सूर्यवंशी, मदतनीस संगमा सुपारे उपस्थित होत्या. प्रा. योगिता पवार यांनी, आदिवासी महिलांनी प्रत्येक अडचणींवर मात करत सर्वांगीण विकास करून शिक्षणाच्या प्रवाहात येणे, ही काळाची गरज आहे. त्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे, असे सांगितले. प्रा. कविता गांगुर्डे यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. सुवर्णा पाटील यांनी करून दिला. प्रा. कामिनी पवार यांनी आभार मानले. प्रा. संदीप सावंत, प्रा. अभिजित पाटील आदींनी परिश्रम घेतले.

8/8/

9/8

दैनिक
शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज
# महाराष्ट्र सारथी

# आदिवासींच्या समस्या खऱ्या स्त्रियांनी जाणल्या – सविताताई नवले

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**मालेगाव । प्रतिनिधी :**



महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित म.स.गा. कनिष्ठ महा विद्यालय व विशाखा समिती अंतर्गत दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी जागतिक आदिवासी दिन रोकोडोबा नगर येथे साजरा करण्यात आला. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त तसेच महिला कल्याण व तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा मधुरा एम्पावरमेंट ट्रस्टच्या संचालिका मा. संपदादीदी हिरे यांच्या प्रेरणेतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमा च्या आयोजनासाठी महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, कनिष्ठ महा विद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा.रविंद्र मोरे यांचे मार्गदर्शन याप्रसंगी लाभले. सदर कार्यक्रम हा मालेगाव जवळील रोकडोबा वस्ती येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम आदिवासी महिलांच्या समस्या जाणून घेउन शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणा च्या प्रवाहात आणण्या साठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमा साठी माजी पंचायत समिती सदस्य कमलाताई मोरे सौ. विद्याताई ठाकरे, अंगणवाडी सेविका सौ. वंदना सूर्यवंशी,मदतनीस सौ. संगमा सुपारे या उपस्थित होत्या.व क्रांतिवीर व वीरनायक बीरसा मुंडा यांचे प्रतीमेचे पुजन करण्यात आले प्रमूख वक्तया जाणीव फाउंडेशनच्या अध्यक्षा सविताताई नवले यांनी आपल्या मनोगतात स्त्रीयांनी आरोग्य विषयक घ्यावायची काळजी तसेच महिलांनी आजार लपवु नये व संकोच न पाळता आरोग्यावर लक्ष द्यावे व आदीवासी महिला या भक्कम असल्यामुळेच आपले आदीवासी बांधव ख-या अर्थाने जंगल व जमीनीचे संरक्षण करु शकले .सखोल असे मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. योगिता पवार यांनी आपल्या मनोगतातून आदिवासी महिलांनी प्रत्येक अडचणींवर मात करत सर्वांगीण विकास करून शिक्षणाच्या प्रवाहात येणे ही काळाची गरज आहे. त्या साठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमांचे अध्यक्ष प्रा. रविंद्र मोरे हे होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.कविता गांगुर्डे, प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. सुवर्णा पाटील यांनी करून दिला आणि आभार प्रदर्शन प्रा.कामिनी पवार यांनी केले. कार्यक्रमासाठी परिसरातील आदिवासी महिला खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. संदीप सावंत, प्रा. अभिजीत पाटील आदींनी परिश्रम घेतले.

नीस
ाहिला
देवा'



देवा हा
सांपासून
धुमाकूळ
त्रपटाचं
नुकतेच
न शोचे
होते.
त्यांसाठी
त्यांसाठी
त्रपटाचा
करण्यात
पटातील
आणि
दिग्दर्शक
अजित
टुडिओज
ल साने
ल शोचा
ार शिंदे
ोडियावर

# स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान महत्वाचे



मालेगाव । म.स.गा महाविद्यालयात इतिहास विभागा तर्फे क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी आपल्या मनोगतात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान महत्वा चे आहे असे मत मांडले. बिरसा मुंडा तंट्या भिल्ल, उमाजी नाईक, भागोजी नाईक ख्वाजा नाईक, गुलाब्या फरारी यांनी ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणा विरुद्ध उठाव केला होता. दिनांक ९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात इतिहास विभागातील प्रा सुभाष अहिरे यांनी या प्रसंगी छोडो भारत या ब्रिटीशांच्या विरोधात पुकारलेल्या महात्मा गांधी च्या चळवळीत नाशिक जिल्ह्यातील आदिवासी बांधव सामान्य जनमानस, राष्ट्र सेवा दलातील कार्यकर्ते आणि मालेगावातील कर्मवीर भाऊसाहेब हिरेंच्या नेतृत्व खाली अंदाजे ३४ स्वतंत्र्य सैनिकांनी भाग घेतला असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी विध्यार्थ्यानी भारत सरकारच्या वतीने माझी माती माझा देश या उपक्रम अंतर्गत देशाला बलशाली बनवण्य करिता पंच प्रण शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा अजय अहिर यांनी केले, आभार प्रदर्शन अर्थशास्त्र बिभाग प्रमुख डॉ बी एम सोनवणे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ मनीष सोनवणे, डॉ आर के जाधव, डॉ एस पी देवरे, प्रा रामेश्वर पवार आणि विध्यार्थी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म.स.गा.महाविद्यालयात युवा संवाद



मालेगांव कॅम्प:- महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला विज्ञान व महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात महसूल विभाग मालेगाव शाखेतर्फे युवा संवाद व मतदार नोंदणी या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या चर्चासत्राप्रसंगी मालेगावचे तहसीलदार श्री नितीन कुमार देवरे व त्यांचे सहकारी उपस्थित होते यांप्रसंगी तहसीलदार देवरे यांनी विविध प्रकारचे प्रमाणपत्र कशा पद्धतीने प्राप्त करावीत तसेच मतदार नाव नोंदणी ऑनलाइन, ऑफलाइन कसे करावे, मतदार झाल्माचे फायदे तसेच स्पर्धा परीक्षा संबंधी मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी युवकांनी मतदार झाल्यानंतर मतदानाचा हक्क आवश्य बजावला पाहिजे व आपल्या लोकशाहीची मूल्य जपली पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. चंद्रसिंग राजपूत यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. एस. एल. अहिरे तर आभार डॉ. रमेश निकम यांनी मानले . कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ.मनीष सोनवणे, शैक्षणिक समन्वयक डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भौतिकशास्त्राच्या माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम



मालेगाव । महाराजा सयाजीराव गायकवाड .कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माले–गाव कॅम्प येथील भौतिकशास्त्र विभागातील माजी विद्या र्थी अंकुश मायाचार्य, सतीश मांडवडे, सूर्यकांत तिवारी आणि इतर माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने, आपण या महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागात शिक्षण घेतले असून आपण या विभागाचे, महाविद्यालयाचे काही देणे लागतो या समर्पक भावनेतून विभागास डिजीटल व्हाइट बोर्ड, दहा खुर्च्या, फॅन व इतर साहित्य भेट म्हणून दिले, याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर,उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उप प्राचार्य डॉ. मनीष सोनवणे, अकॅडेमिक सुपरवायझर डॉ. प्रवीण पाटील, भौतिकशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. अरुण गर्दे, नॅक कॉर्डिनेटर डॉ. कल्याण कोकणी, आय क्यू एसी कॉर्डिनेटर डॉ. सईद अन्सारी, डॉ. के. एस. ठाकरे, प्रा. सी. आर. येवले, प्रा. डी. जे. देवरे, रघुनाथ शेलार, आर. आर. निकम, ईश्वर संसारे यांच्यासह महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा मतदारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे मतदार नोंदणी करावी : देवरे

**मालेगाव ।** दि.२ (उमाका):

तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व मतदानाचा हक्क बजावण्यासाठी ऑनलाईन प्रणालीद्वारे फॉर्म नंबर ६ भरुन जास्तीत-जास्त युवक-युवतींनी मतदार यादीत नाव नोंदणी करावी, असे आवाहन सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी ११५ मालेगाव बाहय तथा तहसिलदार नितिनकुमार देवरे यांनी केले.



महसुल सप्ताहानिमित्ताने मालेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय येथे युवा संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्राचार्य चंद्रकांत दिघावकर, निवडणूक नायब तहसिलदार वरदा सोमण, निवडणूक कर्मचारी धिरज अहिरे, मास्टर ट्रेनर सुनिल बागड यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

तहसिलदार देवरे म्हणाले की, महसुल विभागाकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे विविध प्रकारचे दाखले, प्रमाणपत्र या सप्ताहाच्या माध्यमातून तत्काळ मिळणार आहेत. तसेच मतदान नोंदणी करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीद्वारे नमुना नंबर ६ भरुन घेण्याबाबत आवश्यक प्रक्रियेची सविस्तर माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी ११५ मालेगाव बाहय तथा तहसिलदार देवरे यांनी यावेळी दिली.

# प्रेमचंद यांच्या साहित्यातून जगण्याचे बळ मिळते-प्राचार्य चंद्रकांत जी.दिघावकर

मालेगाव:-हिंदी साहित्याचे युग प्रवर्तक कथासम्राट प्रेमचंद यांचे साहित्य हे शेतकरी, श्रमिक वर्ग यांच प्रतिनिधित्व करते. या साहित्यातून जीवन जगण्यासाठी बळ मिळते. जागतिक स्तरावर कथाकार प्रेमचंद यांच्या साहित्याच खूप महत्व आहे. म्हणूनच त्यांच्या नावाने कथा साहित्य ओळखले जाते. आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथलयात प्रेमचंद यांचे खूप कथा संग्रह व कादंबरी उपलब्ध आहे, त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाचे प्राचार्य मा.चंद्रकांत जी. दिघावकर यांनी केले.

ते हिंदी संशोधन केंद्र द्वारा आयोजित प्रेमचंद जयंती कार्यक्रमात अध्यक्ष स्थाना




वरून बोलत होते. प्रमुख पाहुणे प्रा. दिपक अहिरे (कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, रावळगाव) यानी प्रेमचंद साहित्य की प्रासंगिकता या विषयावर मार्गदर्शन केले तर डॉ.गणेश शेकोकर (एच.पी.टी. महाविद्यालय नाशिक) यांनी प्रेमचंद साहित्य का वैश्विक स्तर पर महत्व या विषयावर आपले विचार मांडले. या प्रसंगी मा. उपप्राचार्य डॉ मनीष सोनवणे , मा.उपप्राचार्य डॉ . साळवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . हिंदी विभागाकडून संपादित हिंदी साहित्य :किसान विमर्श या पत्रिकेचे प्रकाशन ही या कार्यक्रमात करण्यात आले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. अनिता नेरे यांनी तर परिचय डॉ. वाल्मीक सुर्यवंशी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना कदम हिने केले व आभार सच्चिदानंद मौर्य यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. एस एल अहिरे, डॉ राजपूत, डॉ ए.जी नेरकर, डॉ.ए. यू.पाटील, डॉ सोनवणे, प्रा एन डी पगार, प्रा चेतन पाटील, डॉ विष्णु राठोड या प्राध्यापकांसह हिंदी संशोधन केंद्राचे शोधार्थी व ३७ विद्यार्थी उपस्थित होते

दै.शहर समाचार

# मसगा महाविद्यालयाकडून विविध वनस्पतींच्या १ लाख बियाचे प्रसारण

**मालेगाव:**–महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या वनस्पती शास्त्र विभागातर्फे पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी विविध उपक्रम राबवले जातात. दरवर्षी विभागातर्फे सीड ब्रॉडकास्टिंग या उपक्रमांतर्गत विविध वनस्पतींच्या सुमारे एक लाख बियांचे प्रसारण करण्यात येते.

या वर्षी मा. आ. अपूर्वभाऊ हिरे यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून हा उपक्रम राबविण्यात आला. निम, सीताफळ, आंबा, जांभूळ, चिंच इ. वनस्पतीच्या बियांचे रोपण पिंपळगाव जवळील मुंढऱ्या डोंगर परिसरात करण्यात आले. मागील पाच वर्षात मालेगाव परिसरातील तळवाडे, कुकाणे, गाळणा, वरदळी ह्या ठिकाणी सुमारे पाच लाख बियांचे रोपण व प्रसारण विद्यार्थी व निसर्गप्रेमींच्या सहकार्याने करण्यातआले आहे. निसर्ग संपन्नतेसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत आहे. विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, उपप्रचार्य डॉ. टी. एस. सावळे, डॉ. मनिष सोनवणे यांनी या उपक्रमाला प्रोहत्साहन देऊन शुभेच्छा दिल्या.विभागप्रमुख डॉ.जे.टी. जाधव , डॉ. प्रविण पाटील, डॉ. डी.यु.अहिरे, डॉ.डी.जे. जाधव, डॉ. योगेश शास्त्री व इतर सहकारी यानी या उपक्रमाचे नियोजन केले.

28/7

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० गुणवत्ता पूरक शिक्षणाच्या संधी पुरवण्यास सक्षम-डॉ.आरीफ अंजुम

मालेगाव कॅम्प : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराज सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे स्टाफ अकॅडमीच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते सिटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आरिफ अंजुम ते होते या प्रसंगी ते म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०-२० हे गुणवत्ता पूरक शिक्षणाच्या संधी पुरवण्यात सक्षम असून या धोरणामध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील तसेच या धोरणामध्ये विज्ञान-तंत्रज्ञाना बरोबरच, समाज संस्कृती आणि प्रगती साधनाच्या संधी देखील



उपलब्ध होतील. विद्यार्थ्यांना मातृभाषा तसेच इतर भाषेतून देखील शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील असे ते म्हणाले.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०-२० याकडे आपण सकारात्मक दृष्टीने बघणे व शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या नवीन आव्हानांचा स्वीकार करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ.प्रवीण पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख तथा एनइपी कॉर्डिनेटर डॉ. भारती खैरनार यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. सी .डी .राजपूत यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. एस .एल. आहिरे यांनी मानले.

**CHANGE OF NAME**
I have changed my name from **DOSANI AMINA MOHAMMED HUSAIN** to **AMINA TABANI MOHAMMED YUSUF** as per New Passport Rules.
Add:- New ward, Dhobi Galli, House No.287, Malegaon. 423203, Dist Nasik. MS.

27/7

# महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा




मालेगाव-१९९९ मध्ये कारगिल युद्धा दरम्यान असामान्य शौर्य दाखवणाऱ्या शूर सैनिकांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून राष्ट्रीय छात्र सेनेने दि.२६ जुलै २०२३ रोजी अत्यंत आदराने आणि श्रद्धेने कारगिल विजय दिवस साजरा केला. हा दिवस कारगिलच्या भूभागात घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानी सैन्यावर भारताच्या शानदार विजयाचा २४ वा वर्धापन दिन होता. सदर कार्क्रमासाठी ४८ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर (राष्ट्रीय छात्र सेना, धुळे) कर्नल शैलेंद्रकुमार गुप्ता हे लाभले होते. ते स्वतः ऑपिरेशन विजय कारगिल-१९९९ (ऑपिरेशन पराक्रम-२००१) मध्ये सहभागी होते. कार्यक्रमादरम्यान त्यांनी कारगिल युद्धाची पार्श्व भूमी तसेच युद्धादरम्यान केलेले कार्य व विविध अनुभव सांगितले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनीष सोनवणे यांनी कारगिल विजय हा भारताच्या दृष्टीने किती महत्त्वपुर्ण होता हे त्यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील, कुलसचिव रघुनाथ शेलार उपस्थित होते. तसेच कार्यक्रमासाठी ४८ महाराष्ट्र बटालियनचे (राष्ट्रीय छात्र सेना, धुळे) सुभेदार इंदर कुमार व हवालदार गुरनेक सिंग उपस्थित होते.

कार्यक्रमास महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ.टि.एस.सावळे यांच्या मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन हिंदी विभागाचे डॉ. वि. डी. सूर्यवंशी, प्रास्ताविक लेफ्ट नंट बी . बी . वाघमारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व आभार सी टी ओ एस. ए. सांगळे यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी मालेगाव सेक्टर मधील फस्ट ऑफिसर -संजय धोंडगे मुनिसिपल हाय स्कूल, मालेगांव फस्ट ऑफिसर- स्मिथ वाघ टी आर हाय स्कूल,दाभाडी, सेकंड ऑफिसर - रवींद्र बोरसे के बी एच विद्यालय, मालेगांव कॅम्प, सेकंड ऑफिसर - रिझवान अहेमद मालेगांव हाय स्कूल,मालेगांव, सेकंड ऑफिसर - किरणकुमार पाटिल टी के आर एच विद्यालय, निमगाव सी टी ओ - जिशान सिद्दीकी ए ए टी हाय स्कूल, मालेगांव हेही उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे महाविद्यालयातील ५३ मुले व मुली, के बी एच विद्यालयातील ४६ मुले उपस्थित होते.

26/7

१६/७/२०२३

दैनिक लोकमत

सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक



# मसगा महाविद्यालयात हिमोग्लोबिन तपासणी शिबिर

**मालेगाव** : येथील मसगा महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभाग व सामान्य रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या कोशाध्यक्षा डॉ. स्मिताताई हिरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थिनींसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. प्राचार्य डॉ. चंद्रकात दिघावकर यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम घेण्यात आला. उपप्राचार्य डॉ. टी. एस. सावळे, उपप्राचार्य डॉ. डी. के. हलवर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. अनिल सावळे अध्यक्षस्थानी होते. मुलींनी हिमोग्लोबिन नियंत्रित ठेवण्याकरिता, सकस आहार व नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. आहारात हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, खजूर, गूळ, शेंगदाणे, शेवगा शेंगा, बिट, ब्रोकोली आदींचा वापर करण्याचे आवाहन केले. कनिष्ठ महाविद्यालयातून १२० व वरिष्ठ महाविद्यालयातून १५० विद्यार्थिनींनी शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे, जे. टी. जाधव, पी. ए. अहिरे, प्रा. ए. जी. नेरकर, प्रा. सी. डी. रजपूत. डॉ. भारती खैरनार, डॉ. ए. के. सोनवणे, डॉ. कपिल पाटील, डॉ. विजय पवार, प्रा. गायकवाड, प्रा. प्रकाश गायकवाड, प्रा. चंद्रमा शिवदे, प्रा. हितेश पवार, प्रा.योगिता पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अनुषंगाने रांगोळी मंजूषा ढेपे व तिची सहकारी हिने रेखांकित केली होती.

# नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांसाठी तयार रहा: अपूर्व हिरे



**मालेगांव । म.स.गा.महाविद्यालयात सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची सहविचार सभा महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा संपन्न झाली. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक मा आ. डॉ. अपूर्वभाऊ हिरे यांनी सहविचार सभेला संबोधित करताना मूल्यांकनावर भर दिला.**

महाविद्यालय असो किंवा शाळा किंवा सारखे मूल्यांकन करून घेणे काळाची गरज आहे. त्यामुळे गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी मदत होईल. तसेच नवीन शैक्षणिक धोरणाला आपल्याला सर्वांना सामोरे जावे लागेल व जगाच्या बरोबरीने जाण्यासाठी व महासत्ता बनण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. म्हणून भविष्यातील शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना सज्ज राहणे आवश्यक आहे असे आपल्या मनोगतातून कार्यशाळेला संबोधित डॉ.अपूर्व भाऊ हिरे यांनी केले. प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी, पालक व आपली सर्व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून येणाऱ्या काळात सर्वांना त्याची गरज आहे असे प्रतिपादन केले.याप्रसंगी प्रा.प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, कुलसचिव रघुनाथ शेलार, अधिक्षक जयवंत कट्यारे, राजेश निकम, सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी सूत्रसंचालन डॉ.अनिल सावळे यांनी केले.तर आभार प्रदर्शन डॉ.डी.के.हलवर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. नरेंद्र डोखे, प्रा. प्रमोद बच्छाव आदींनी प्रयत्न केले.

12/7

सकाळ



मालेगाव : मसगा महाविद्यालयात सहविचार सभेत बोलताना डॉ. अपूर्व हिरे. शेजारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर.

# नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना तयार राहा

## डॉ. अपूर्व हिरे; मसगा महाविद्यालयात कार्यशाळा

**मालेगाव शहर, ता. १५ :** जगाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी येणाऱ्या काळात शैक्षणिक प्रवाहात गतिशीलता महत्त्वपूर्ण आहे. महासत्ता बनण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. भविष्यातील शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना सज्ज राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक, माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी केले.

मसगा महाविद्यालयात आयोजित सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहविचार सभेत नवीन शैक्षणिक धोरणावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर मसगा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. डी. के. हलवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. हिरे म्हणाले, की शैक्षणिकदृष्ट्या शाळा असो की महाविद्यालय नॅक सारखे मूल्यांकन करून घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे गुणवत्तेचा स्तर उंचावण्यासाठी मदत होईल. शैक्षणिक धोरणाच्या आव्हानांना सज्ज राहणे आवश्यक असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी, पालक व आपली सर्व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून येणाऱ्या काळात सर्वांना त्याची गरज आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी कनिष्ठचे उपप्राचार्य प्रफुल्ल निकम, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, कुलसचिव रघुनाथ शेलार, अधिक्षक जयवंत कटारे, राजेश निकम, सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सावळे यांनी केले.तर आभार डॉ. हलवर यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. नरेंद्र डोखे, प्रा. प्रमोद बच्छाव आदींनी प्रयत्न केले.

Nashik, Malegaon
16/07/2023 Page No. 3

सकाळ



मालेगाव : मसगा महाविद्यालयात 'माझी वसुंधरा' या विषयावर पथनाट्य सादर करताना इंदौर येथील पथकातील विद्यार्थी.

# मसगा महाविद्यालयात पथनाट्य

**मालेगाव शहर :** महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व मालेगाव महापालिकेतर्फे महाविद्यालयात नुकतेच पथनाट्य सादर करण्यात आले. 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत इंदोर (मध्य प्रदेश) येथील पथनाट्य संघाने हे पथनाट्य सादर केले. यामध्ये माझी वसुंधराची काळजी कशी घ्यावी, याविषयी विनोदी शैलीत सादरीकरण करण्यात आले. घरातील कचरा घंटागाडीत टाकताना कोणता कचरा कोणत्या डब्यात टाकायचा, दारूच्या व्यसनापासून कसे लांब राहायचे, शिक्षकाने वर्गात जाताना कोणती काळजी घ्यायची, रस्त्यावर गाडी चालवताना कसली दक्षता घेतली पाहिजे यासारखे विषय मांडण्यात आले. महापालिकेचे अधिकारी, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, डॉ. डी. के. हलवर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्जुन नेरकर, डॉ. चंद्रसिंग राजपूत यांच्यासह स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Nashik, Malegaon
12/07/2023 Page No. 4

दिव्य मराठी
नाशिक' जिल्हा पुलआउट 12-07-2023

# जागतिक लोकसंख्या वितरण्याच्या तुलनेने १८ टक्के लोक भारतात

## मसगा महाविद्यालयत लोकसंख्या दिनावर चर्चा



प्रतिनिधी | मालेगाव

लोकसंख्या वाढ ही संख्यात्मक असल्यास एक समस्या निर्माण होते गुणात्मक असल्यास देशातील साधन संपत्तीचा पुरेपूर विनियोग करून देशाची प्रगती साधली जाते, असे विचार निवृत्त भूगोल विभागप्रमुख प्रा. बी.डी. पगार यांनी व्यक्त केले.

मसगा महाविद्यालय भूगोल विभाग यांच्या वतीने मंगळवारी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त गुणात्मक लोकसंख्यवाढीवर चर्चा झाली. प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. त्यांनी अनेक पैलूंवर भाष्य केले, जगाची ८ अब्ज लोकसंख्या झाली आहे. त्यात भारताची १४२ कोटी लोकसंख्या असून जागतिक लोकसंख्येच्या वितरण्याच्या तुलनेने १८ टक्के लोक भारतात राहतात तर क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून २.४ टक्के क्षेत्र भारताला लाभले आहे, त्यामुळे भारतासाठी ही लोकसंख्या समस्याच आहे. यामुळे भारतात बेरोजगारी, दारिद्र्य, भूकमारी, वाढते प्रदूषण यासारख्या समस्या निर्माण झालेल्या असल्याचे प्रा. पगार यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी जागतिक लोकसंख्या दिन हा साजरा करण्यासाठी नव्हे तर इशारा देणारा दिन म्हणून आणि आत्मपरीक्षण करण्याचा दिन साजरा केला जातो. खऱ्या अर्थाने लोकसंख्या वाढ ही प्रत्येक समस्यांचे मूळ आहे, असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा प्रास्ताविक डॉ. यू. पी. सूर्यवंशी यांनी केले. तर डॉ. ए. डी. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी भूगोल विभाग प्रमुख डॉ. सी. एम. निकम, प्रा. बी. एस निकम, प्रा. शुभम दुकळे, प्रा. डॉ. सुनील देवरे, प्रा. अहिरे आणि प्रा. गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

10/7

# लोकनेते व्यंकटरावजी हिरे यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने वृक्षारोपण



**मालेगांव ।**

के.बी.एच. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मालेगाव कॅम्प येथे लोकनेते व्यंकटरावजी हिरे यांच्या पुण्यतिथी व गुरुपौर्णिमा निमित्ताने वृक्षारोपण व व्याख्यानाचे आयोजन.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कैलास दाभाडे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य प्रवीण पाटील,माजी उपप्राचार्य राजेंद्र पाटील उपप्राचार्या प्रतिभा शेवाळे, पर्यवेक्षक संजय शिंदे, जे. एस. बच्छाव, प्रा.विश्वास पगार, प्रा.शितल शिंदे, जितेंद्र विसपुते, संजय सूर्यवंशी, कैलास देवर, योगेश गांगुर्डे उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र शेवाळे आभार शशिकात पवार यांनी मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षक बंधू भगिनी शिक्षकेतर बंधू व विद्यार्थी उपस्थित होते.

**मसगा महाविद्यालय**

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात लोकनेते व्यंकटराव हिरे यांची ४३ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश शिरोडे यांच्या हस्ते लोकनेत्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ. एम. बी. सोनवणे यांनी लोकनेत्यांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली. प्राचार्य डॉ. दिनेश शिरोडे यांनी देखील लोकनेत्यांच्या कार्याची माहिती कथन केली. यानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यासाठी उपप्राचार्य डॉ. डी. के. हलवर, डॉ. अनिल सावळे, प्रा. प्रफुल्ल निकम, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रवीण पाटील, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे, कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कट्यारे, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**निमगाव महाविद्यालय**

निमगाव : कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय निमगाव येथे संस्था संवर्धक लोकनेते व्यंकटराव हिरे यांना ४३व्या पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रमांद्वारे अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आर.जी. शेवाळे हे होते. याप्रसंगी डॉ यु. के. कुडासे डॉ. आर.जी.शेवाळे डॉ. बी.यु.पवार,डॉ. उज्जन कदम यांनी वृक्षारोपन केले. सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## आजचा विनोद

SMS

विवाह मंडळाचे चालक : लग्नासाठी दुसरी एक मुलगी आहे. आपल्या शाखेचीच असून पत्रिका अगदी तंतोतंत जुळते आहे, पण-पण तिचे पुढचे दोन दात कृत्रिम आहेत.

# मसगात शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी

मालेगाव । महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची १४९ वी जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. के. हलवर यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. रविंद्र मोरे यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी आपल्या मनोगतात 'छत्रपती शाहू महाराज यांनी बहुजन समाजातील निरक्षरता व अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली, गरीब व दलित आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा तसेच शिष्यवृत्ती योजना सुरू करून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. मुलींसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत उपलब्ध करून देणारे ते पहिले छत्रपती होते.



समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छत्रपतींना जातीभेद मान्य नव्हता म्हणून त्यांनी आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली.तसेच पन्नास टक्के आरक्षणाचा निर्णय त्यांनी घेतला शेतकरी शेतमजूर यांच्यासाठी त्यांनी व्यापक स्वरूपात कार्य केले. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची दखल घेत समाजाला प्रेरित करण्याच्या उद्देशाने २००३ मध्ये महाराष्ट्र शासनाने छत्रपती शाहू महाराजांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल सावळे, शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ प्रविण पाटील, कार्यालयीन अधीक्षक श्री. जयवंत कट्यारे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम, किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एम. सोनवणे यांनी केले.

26/6

# मसगा महाविद्यालयात योग दिन साजरा



मालेगाव:-महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयात दि २१ जून २०२३ रोजी ९ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मालेगाव शहरातील योग आभ्यासक प्रचारक व प्रसारक सौ. मेधा किरण सूर्यवंशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

त्यांनी योगाचे महत्व सांगत सहज योगातून ध्यान धारणा करावयास लावले व विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांकडून योगासने करून घेत योगाचे मानवी जीवनातील महत्व पटवुन दिले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. टी. एस. साळवे सर शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा.प्रफुल्ल निकम पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक श्री. जयवंतराव कट्यारे यांच्या सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, प्रशासकीय कर्मचारी व विध्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व सूत्रसंचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव यांनी केले तर आभारप्रदर्शन कनिष्ठ महा विद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदीप कोंडूरकर यांनी केले. राष्ट्र गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

सकाळ

# मालेगाव शहरातील विविध शाळांमध्ये जागतिक योग दिन उत्साहात

# विद्यार्थ्यांनी गिरविले योगासनाचे धडे

▸ सकाळ वृत्तसेवा

**मालेगाव शहर, ता. २१ : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बुधवारी (ता. २१) शहरातील विविध शाळा, महाविद्यालये व संस्थांनी योगासने व प्राणायाम घेऊन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने योगशिक्षक व क्रीडाशिक्षक यांनी योगाचे महत्त्व सांगत विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून योगासनाचे प्रात्यक्षिके करून घेतली.**

## मसगा महाविद्यालय

[illegible]

## आरबीएच कन्या विद्यालयात

[illegible]

[illegible]

## राजस्थान शिक्षण संस्था

[illegible]

## लिटल एंजल्स स्कूल

[illegible]



मालेगाव शहर : येथील कावरा माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी योगाची चित्तथरारक प्रात्यक्षिके करताना.

[illegible]

## भारत विद्यालय

[illegible]

[illegible]

## सोयगाव महाविद्यालय

[illegible]

[illegible]

## विद्याविकास इंटरनॅशनल स्कूल

[illegible]

## काकाणी विद्यालये

[illegible]

Nashik Malegaon
22/06/2023 Page No. 4

21/6

# मसगा महाविद्यालयात योग दिन साजरा

मालेगाव । महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयात दि २१ जून २०२३ रोजी ९वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी मालेगाव शहरातील योग आभ्यासक प्रचारक व प्रसारक सौ. मेधा किरण सूर्यवंशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले त्यांनी योगाचे महत्व सांगत सहज योगातून ध्यान धारणा करावयास लावले व विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांकडून योगा सने करून घेत योगाचे मानवी जीवनातील महत्व पटवुन दिले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.टी. एस. साळवे सर शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. प्रविण पाटील कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा. प्रफुल्ल निकम पर्यवेक्षक प्रा. रवींद्र मोरे किमान कौशल्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. अजिंक्य ठाकरे महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक श्री. जयवंतराव कट्यारे यांच्यासह महाविद्याल यातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, प्रशासकीय कर्मचारी व विध्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व सूत्रसंचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष जाधव यांनी केले तर आभारप्रदर्शन कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदीप कोंडूरकर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.